९६६०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. ३६२

# भारताच्या थोर विभूती

भाग पहिला

REFBK-0013845

४०६३४
१३६२
चरित्र

# भारताच्या थोर विभूती

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
४०६३४ वि: चरित्र
१३६२ ता. नू. १०/५/६६

भाग पहिला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२८४५

REFBK-0013845

सत्यमेव जयते

पब्लिकेशन्स डिव्हिजन
माहिती व नभोवाणी मंत्रालय
भारत सरकार

श्रावण, १८८६ ( Sravana, 1886 )
जुलै, १९६४ ( July, 1964 )

Bharat Ke Gaurav (Part-I)
( Marathi )

किंमत : २ रुपये
Price : Rs. 2-00

प्रकाशक : डायरेक्टर, पब्लिकेशन्स डिव्हिजन, दिल्ली-६
मुद्रक : दी बंगाल प्रेस, दिल्ली-६

# प्रस्तावना

राष्ट्रनिर्मिती ही एक प्रदीर्घ प्रक्रिया आहे. ज्याप्रमाणे माणसाच्या मनावर निरनिराळ्या प्रसंगांचा व घटनांचा परिणाम होऊन त्याचे व्यक्तिमत्व तयार होते त्याचप्रमाणे, कोणत्याही राष्ट्रावर निरनिराळ्या घटनांचा परिणाम होऊन, त्याची घडण होत असते. राष्ट्रनिर्मितीवर ज्या गोष्टींचा परिणाम होतो त्यातील काही परस्परांशी एकरूप असतात, काही परस्परांना पूरक असतात तर काही परस्पर विरोधी असतात.

वस्तुत: काही मूठभर प्रभावी व्यक्तींमुळे राष्ट्र निर्माण होत नाही. उलट या व्यक्ती राष्ट्र निर्माण करतात. अर्थात थोर विभूती स्वत:च्या कर्तृत्वाने राष्ट्रावर आपला प्रभाव पाडते हेही तितकेच खरे आहे. परंतु येथे या वादात जास्त खोल न शिरता आपण एवढी एकच गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की इतिहास निर्माण करणारी सर्वात प्रभावी शक्ती जर कोणती असेल तर ती म्हणजे त्या राष्ट्रातील लोक. या दृष्टीने विचार केला असता, केवळ महापुरुष किंवा राजेरजवाडे यांच्याच चरित्रांवरून इतिहास माहीत करून घेण्याचा प्रयत्न एकांगी ठरेल. जेव्हा एखादी व्यक्ती लोकांमध्ये खळबळ निर्माण करून, त्यांना प्रगतीच्या किंवा अधोगतीच्या मार्गाने घेऊन जायला समर्थ होते तेव्हाच त्या व्यक्तीला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होते, एरव्ही नाही ही गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे. मोठमोठे विचार केवळ पुस्तकात राहिल्याने काहीही होणार नाही. परंतु त्या विचारांची ठिणगी लोकांच्या अंत:करणात पेटून क्रांतीचा वणवा पेटल्यानंतरच त्या विचारांना ऐतिहासिक महत्त्व लाभते.

या पुस्तकात काही विभूती अशा आढळतील की ज्यांचा आज मुळीच प्रभाव नाही. परंतु आपापल्या काळात त्या अत्यंत प्रभावशाली होत्या निदान त्यांनी समाजात खळबळ निर्माण केली यात शंकाच नाही. म्हणूनच या संग्रहात त्यांचा समावेश करणे योग्य वाटले. या संग्रहात नसलेले त्यांच्या इतकेच महत्त्वाचे आणखी थोर पुरुष कदाचित असतील. त्यांच्याविषयी जर आम्हाला सूचना मिळाली तर पुढील आवृत्तीत आम्हाला त्यांचाही समावेश करता येईल.

—संपादक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| महावीर | युगजीत नवलपुरी | १ |
| बुध्द | युगजीत नवलपुरी | ९ |
| पाणिनी | युगजीत नवलपुरी | १९ |
| पुरु | सत्या खुखरायण | २५ |
| चाणक्य | रमेशनारायण तिवारी | ३० |
| चन्द्रगुप्त मौर्य | रमेशनारायण तिवारी | ३६ |
| अशोक | युगजीत नवलपुरी | ४३ |
| विष्णुशर्मा | रमेशनारायण तिवार | ५२ |
| आर्यभट्ट | रमेशनारायण तिवारी | ५७ |
| नागार्जुन | प्रभाकर माचवे | ६० |
| समुद्रगुप्त | द्रोणवीर कोहली | ६५ |
| कुमारजीव | रमेशनारायण तिवारी | ७० |
| चन्द्रगुप्त विक्रमादित्य | रमेशनारायण तिवारी | ७५ |
| कालिदास | प्रयागनारायण त्रिपाठी | ८० |
| हर्ष | जगदीश गोयल | ८५ |
| पुलकेशी (दुसरा) | मंगलनाथ सिंह | ९० |
| शंकराचार्य | जगन्नाथ प्रभाकर | ९६ |
| आंडाल | सीता रामन | १०२ |
| राजराज चोल | रमेशनारायण तिवारी | १०६ |

# महावीर

१२८५

सुमारे अडीच हजार वर्षापेक्षा जास्त पूर्वीची गोष्ट आहे. हल्ली जेथे उत्तर बिहार आहे तेथे एके काळी लिच्छवींचे पंचायती गणराज्य होते. हे नेपाळच्या तराईच्या रानापासून गंगेपर्यंत आणि कोसीपासून राप्तीपर्यंत पसरलेले होते. याची राजधानी वैशाली होती. हल्ली त्या ठिकाणाला बसाढ म्हणतात. पाटण्याच्या उत्तरेस २७ मैलांवर हे गाव आहे.

वैशाली नगरीचे तीन भाग होते. मुख्य वैशाली आग्नेयेस होती. तेथे ब्राह्मणांची वस्ती होती. पश्चिमेकडे वाणिज्य ग्राम होते. तिसरा भाग होता कुंडग्राम. तो ईशान्येकडे होता. हल्ली त्या ठिकाणी मुझफ्फरपूर जिल्ह्यातील बसुकुंड हे गाव आहे.

जैन धर्माचे चोवीसावे तीर्थंकर महावीर यांचा जन्म याच कुंडग्रामातील एका क्षत्रिय कुलात झाला होता. त्यांच्या वडीलांचे नाव राजा सिध्दार्थ आणि आईचे नाव त्रिशला होते.

असे म्हणतात की महावीराच्या जन्मापूर्वी त्रिशलास चौदा स्वप्ने पडली होती. त्या स्वप्नांवरून ज्योतिषांनी असे भविष्य वर्तविले होते की, हा मुलगा ध्वजासारखा, दीपकासारखा, मुकुटासारखा, कपाळावरील टिळ्यासारखा व विशाल वृक्षासारखा होईल. याची सर्व लक्षणे उत्तम असतील, हा सर्वांग सुंदर असेल. हा सर्व विद्या जाणणारा होईल, हाती घेतलेले कार्य हा नेहमी तडीस नेईल, हा महापराक्रमी होईल, जनतेचा पुढारी होईल आणि विश्वविख्यात होईल. याचाच अर्थ असा की, मुलगा चक्रवर्ती राजा तरी होईल किंवा थोर महात्मा तरी होईल.

नऊ महिने साडे सात दिवस लोटल्यावर चैत्र शुध्द त्रयोदशीच्या दिवशी फाल्गुनी नक्षत्रावर महावीरचा जन्म झाला. ही शुभवार्ता देणाऱ्या दासीला सिध्दार्थ राजाने आपला मुकुट तर दिलाच शिवाय सर्व दागिने पण दिले आणि तिला दास्यत्वातून मुक्त केले.

महावीर जन्माच्या आनंदाप्रीत्यर्थ सिध्दार्थाने राज्यातील सर्व कैद्यांना सोडून दिले, सर्वांची कर्जे माफ करुन टाकली आणि दहा दिवस धूमधडाक्याने

उत्सव साजरा केला, तिसऱ्या दिवशी बाळाला चंद्रसूर्यदर्शन घडविण्यात आले. पाचवीची रात्र आईवडिलांनी जागून घालविली. बाराव्या दिवशी सर्व नातलगांना व दासदासींना जेवणावळी घालण्यात आल्या.

बाळाचे नाव वर्धमान असे ठेवण्यात आले. वर्धमानास नन्दिवर्धन नावाचा एक थोरला भाऊ होता आणि सुदर्शना नावाची थोरली बहीण होती. तिघांचेही लाडात पालनपोषण होऊ लागले. वर्धमान लहानपणापासूनच निरोगी, ताकदवान आणि निर्भय होता. एकदा सर्वजण बागेत खेळत असताना वर्धमान ज्या झाडावर चढला, त्याच झाडावर एक भला मोठा साप चढला. वर्धमानाला संकटात पाहून बाकीची मुले घाबरली. वर्धमानाने सापाजवळ जाऊन त्यास हाताने पकडून दूर भिरकावून दिले. वर्धमानाच्या साहसी वृत्तीची परीक्षा घेण्यासाठी देवच या सापाच्या रूपाने आला होता अशी जैनांची श्रध्दा आहे.

अशीच आणखी एक दंतकथा सांगतात. वर्धमान एकदा घोडा-घोडा खेळत होता. या खेळात जो मुलगा हारतो त्यास घोडा बनावे लागते आणि जिंकणाऱ्या मुलाला पाठीवर बसवून फिरवावे लागते. आपले रूप पालटून एका देवाने देखील खेळात भाग घेतला आणि तो देव मुद्दामच हारला. वर्धमान त्याच्या पाठीवर बसता क्षणीच त्याने जोरात धूम ठोकली. वर्धमाना रोवजी दुसरा कोणी मुलगा असता तर तो भिऊन आरडा-ओरड करू लागला असता. पण वर्धमान धीट होता. तो मुळीच घाबरला नाही. त्याने जोराने एक ठोसा लगावला. त्याबरोबर तो देव चीत होऊन खाली पडला. त्याने मग क्षमा मागितली आणि म्हटले—'तू महावीर आहेस.' वर्धमानाविषयी अशा अनेक गोष्टी सांगतात.

वर्धमान तरुण झाला त्या वेळी वसन्तपुरच्या राजाला असे वाटले की आपल्या मुलीचे लग्न वर्धमानाशी व्हावे. त्याने सिध्दार्थ राजाकडे निरोप धाडला परंतु वर्धमानाची लग्न करण्याची इच्छा नव्हती. आईने खूपच आग्रह धरला तेव्हा त्याने होकार दिला. वसन्तपुरचा राजा समरवीर आणि राणी पद्मावती यांची कन्या यशोदा हिच्याशी वर्धमानाचा विवाह झाला. काही दिवसांनी त्यांना एक मुलगी झाली. या बाबतीत मतभेद आहेत. काही लोकांचे असे मत आहे की वर्धमानाने लग्नच केले नाही. अखेरपर्यंत तो ब्रह्मचारीच राहिला.

वर्धमान संसारात दक्ष होता. तो बोलल्याप्रमाणे केल्याखेरीज राहात नसे. तो मनमिळाऊ व सालस होता. वडीलमंडळींना तो मान देत असे. तो दयाळू होता. परंतु कौटुंबिक मायापाशापासून तो चार हात लांबच राहात असे. खरे ज्ञान मिळविण्याच्या विचारात तो गढून जात असे.

वर्धमान अठ्ठावीस वर्षांचा झाला तेव्हा त्याचे आईवडील निवर्तले. आता साधू होण्यास वर्धमान पुरता मोकळा होता. मग थोरल्या भावाने, नन्दिवर्धनाने, त्यास अडविले. त्याने म्हटले—"तू दोन वर्षे आणखी थांब. आईवडिलांच्या मृत्यूमुळे झालेली दुःखाची जखम भरून निघू दे. तुझ्या जाण्यामुळे आमच्यावर जो आघात होणार आहे, तो सहन करण्याची ताकत आमच्यात येऊ दे."

वर्धमानाने थोरल्या भावाचे म्हणणे मान्य केले. वेळप्रसंग पाहून त्याप्रमाणे तो वागत असे. साधु होण्याचे त्याने दोन वर्षे लांबणीवर टाकले. पण तो घरातच साधुसारखा राहू लागला. लोक सुखाच्या मागे धावतात आणि त्यामुळेच दुःख निर्माण होते असे त्याला वाटत असे. यामुळे हिंसा घडते आणि माणसाला खऱ्या सुखाच्या मार्गावर वाटचाल करता येत नाही. म्हणूनच सुखाच्या मागे न लागण्यातच खरे सुख आहे असे त्याला वाटत असे.

हे विचारच पुढे वर्धमानाच्या धर्माचे आधारस्तंभ बनले. ज्याप्रमाणे अज्ञान दूर करणे हा वेदान्ताचा व लोभ-मोह नाहीसा करणे बौध्द धर्माचा मूलमंत्र आहे त्याचप्रमाणे हिंसा नाहीशी करणे हा जैन धर्माचा मूलमंत्र आहे.

दोन वर्षे घर सोडणार नाही असे वचन आपल्या थोरल्या भावाला दिले खरे पण पुरते वर्षदेखील झाले नाही तोच घर सोडण्यासाठी तो तळमळू लागला. त्याचा परिणाम असा झाला की, हळूहळू त्याने आपल्या वाट्याची सारी संपत्ती दान करून टाकली. दुसरे वर्षहि गेले. आणि मग वर्धमान घर सोडण्याची तयारी करू लागला.

वयाच्या तिसाव्या वर्षी वर्धमान संन्यासी झाला. तो समारंभ मोठ्या थाटामाटात करण्यात आला. द्युतिपलाश उद्यानात नगरीचे हजारो स्त्रीपुरुष जमले. वर्धमानाने आपल्या दाढीमिशा व डोक्यावरील केस उपटून काढले. थोरांनी

त्यास आशीर्वाद दिला आणि वर्धमान तेथून एकटाच पुढे निघाला. पहाट होण्या-पूर्वीच तो गंगा ओलांडून कुम्मार या गावी पोहोचला. हल्ली या गावाचे नाव कस्मर असे आहे.

संन्यासी झाल्यावर तपासाठी योग्य जागा निवडायची, कोणाशीही बोलायचे नाही, हातातच भिक्षा घेऊन खावयाची आणि कधीही कोणाची खुशा-मत करावयाची नाही असे त्याने ठरविले.

तेथून पुढे वर्धमान अस्थिक नावाच्या गावी गेला. तेथे त्याने भुतांविषयी-च्या लोकांच्या भ्रामक समजुती दूर केल्या. पावसाळ्यात तो तेथेच राहिला. तेथून मग मौराक येथे जाऊन मंत्रतंत्रविषयक अंधविश्वास नाहीसा केला.

तो श्वेतांबी येथे पोहोचला तेव्हा तेथील राजाने त्याचे स्वागत केले. आणि तेथेच थांबण्याचा आग्रह त्याला केला. पण वर्धमान तेथे न थांबता सुरभिपुरकडे निघाला. वाटेत गंगा ओलांडीत असताना मोठे वादळ झाले. नावेची डोलकाठी मोडली, शीड फाटले. त्यांची नाव कशीबशी किनाऱ्याला लागली. वर्धमान नावेत होता म्हणूनच आपले प्राण वाचले असे नावेतील प्रवाशांना वाटले.

अशा तऱ्हेने हिंडत फिरत वर्धमान नालन्दा येथे पोहोचला. दुसरा पावसाळा त्याने तेथे घालविला. तेथे मोखलिपुत्र गोसाल याच्याशी त्याची भेट झाली. गोसाल हा त्या युगातील सात धर्म प्रवर्तकांपैकी एक होता. वर्धमानाप्रमाणेच तो देखील नुकताच संन्यासी झाला होता आणि पावसाळा घालविण्यासाठी तेथे आला होता. दोघांना परस्पराविषयी ओढ वाटू लागली आणि मग सहा वर्षे दोघेही बरोबरच भ्रमण करीत राहिले.

असेच भ्रमण करीत असताना एके दिवशी दोघेही चोराक येथे पोहोचले. त्या दिवशी दोघांचे मौनव्रत होते. एका शांत निर्जन अशा जागी दोघेही ध्यान करीत बसले होते. गावाच्या कोतवालाने त्यांना पाहिले तेव्हा त्याला वाटले की, हे दोघेही शत्रूचे गुप्तहेर असावेत. विचारपूस केल्यावर दोघेही जेव्हा बोलेनात तेव्हा तर त्याची खात्रीच झाली आणि दोघांनाही दोरखंडाने बांधून एका

विहिरीच्या पाण्यात गटांगळ्या देण्यास त्याने सुरुवात केली. हा प्रकार बघायला लोकांची भयंकर गर्दी जमली. त्या गर्दीत सोमा व जयन्ती नावाच्या दोघी संन्यासिनी होत्या. या दोघांपैकी एक सिध्दार्थ राजाचा मुलगा वर्धमान आहे हे त्यांनी ओळखले. त्यांनी कोतवालाची कशीबशी समजूत घालून त्यांना सोडविले.

अशा तऱ्हेने भ्रमण करीत बारा वर्षे महावीराने अनेक कष्ट सहन केले. त्याला विवस्त्र पाहून मुले त्याला दगडविटा मारीत. पण तो मौन पाळी व सारे काही सहन करी. त्याने गार पाणी व पालेभाज्या यांचा देखील त्याग केला. त्याने शरीरावर इतका ताबा मिळविला की खाज सुटली तरी तो खाजवीत नसे व, अंग धुळीने माखून गेले तरी ती धूळ पुसत नसे. ओसाड भग्नावशेष, पाणपोई, सुतारलोहार यांची दुकाने, इत्यादि जागी व जंगलात झाडाखाली एकांतवासात तो बहुतेक वेळ घालवीत असे. अशा तऱ्हेने बारा वर्षात एकदाही तो आरामात झोपला नाही. झोप येऊ लागताच तो खाडकन उठून बसे. आणि एकाग्र चित्ताने चिंतन करू लागे. हिवाळयात तो उघड्यावर जाऊन कडाक्याची थंडी सहन करीत असे.

तपश्चर्यंच्या या कालखंडात त्याने दूर-दूर भ्रमण केले. बिहारमध्ये राजगृह भागलपूर, मोंगीर, बसाढ, जनकपूर इत्यादि भागात तो हिंडला. उत्तरप्रदेशात काशी, कोशाम्बी, अयोध्या, सहेट-महेट बंगालमध्ये राढ इत्यादि ठिकाणी, तो गेला. सर्वात अधिक त्रास राढ प्रदेशातच भोगावा लागला. येथील लोक श्रमण धर्माचे कट्टर विरोधी होते. ते महावीरावर कुत्रे सोडीत. बुक्क्यांनी काठ्यांनी, मातीच्या ढेकळांनी त्याला मारीत व भाल्यांनी त्याला टोचीत. त्याच्या मांसाचे लचके तोडत. त्याला जमिनीवर आपटीत व खड्यात ढकलीत. अशा रीतीने नाना प्रकारच्या यमयातना त्याला सहन कराव्या लागल्या.

बारा वर्षांच्या कठोर साधनेनंतर जंभिय नावाच्या, ऋजुवालिका नदीच्या काठी, वैशाख शुध्द दशमीला महावीराला बोध झाला.

बारा वर्षे हरतऱ्हेचे कष्ट सहन करून आणि सांसारिक माया-मोहापासून दूर राहून त्याने इतक्या एकाग्रतेने तपश्चर्या केली होती की तो,

'महावीर' म्हणून ओळखला जाऊ लागला. इंद्रियांवर ताबा मिळविल्यामुळे त्याला 'जिन' असेही म्हटले जाऊ लागले.

ज्ञान-प्राप्ती झाल्यावर महावीराने उपदेश करायला प्रारंभ केला. अपापा नगरीत अकरा पंडित त्याच्याशी वादविवाद करण्यास आले. महावीराने त्या सर्वांच्या शंकांचे समाधान केले. आपल्या विद्वत्तेचा अहंकार सोडून ते सर्व जण महावीराचे शिष्य झाले. त्यानंतर त्याचे उपदेशाचे कार्य अव्याहतपणे चालू झाले.

त्या अकरा पंडितांबरोबरच त्यांचे हजारो शिष्य देखील जैन झाले. महावीराने त्या अकरा पंडितांना आपापल्या शिष्यांच्या गणाचे प्रमुख नेमले. स्त्रियांमध्ये चंदना ही सर्वात अगोदर त्याची शिष्या बनली. ती अंग देशाची राजकन्या होती आणि दरवडेखोरांनी तिला पळवून विकून टाकले होते. महावीराने तिला सोडविले होते. जे लोक उपदेश ऐकून त्याला शरण जात पण प्रपंचाचा त्याग करणे ज्यांना जमत नसे ते श्रावक आणि श्राविका म्हणून ओळखले जाऊलागले. अशा तऱ्हेने संघाची स्थापना करण्यात आली.

अपापामध्ये बरेच दिवस राहिल्यावर महावीर राजगृह या नगरीत आला. ही त्या वेळी मगधची राजधानी होती. महावीरच्या प्रवचनाचा परिणाम होऊन तेथील राजा बिंबिसार याने जैन धर्म स्वीकारला. याच ठिकाणी चेटक राजाची धाकटी मुलगी सुज्येष्ठा हिने देखील जैन धर्म स्वीकारला. महावीराने तिला दीक्षा देऊन चंदना शिष्येच्या देखरेखीखाली ठेवले. महावीर लोकांशी साध्या भाषेत बोलत असे आणि कथा सांगून व दृष्टान्त देऊन आपले म्हणणे पटवून देत असे. कथादेखील लोकांना आवडतील अशाच सांगत असे. या सर्वांचा परिणाम होऊन मगध राज्यात अनेक लोक जैन साधू बनले. बिंबिसार राजाचा मुलगा मेघकुमार हा देखील जैन साधू बनला. पाच 'अनुव्रते' आणि सात 'शिक्षाव्रते' असलेला हाच उपदेश आजही संसारी लोकांच्या जैन धर्माचा मूलमंत्र आहे. जैन धर्माची पाच अनुव्रते अशी आहेत—हिंसा करू नये, खोटे बोलू नये वा बोलायला लावू नये, चोरी करू नये एक पत्नीव्रत घ्यावे, आपल्या इच्छांवर ताबा ठेवावा. कोणती कामे चांगली आहेत व कोणती वाईट आहेत ते सात व्रतांमध्ये सांगण्यात आले आहे.

राजगृहानंतर महावीर वैशाली येथे गेला. कित्येक वर्षांनी तो आल्याचे पाहून त्याच्या नातेवाईकांना अतिशय आनंद झाला. महावीराने आपला जावई जामालि व जामालीची पत्नी प्रियदर्शन (महावीरची मुलगी) या दोघांनाही जैन धर्माची दीक्षा दिली. प्रियदर्शनाला 'चंदना' शिष्येच्या देखरेखीखाली ठेवले. तिच्याबरोबरच वैशालीच्या एक हजार स्त्रियांनी जैन धर्माची दीक्षा घेतली. नंतर महावीराने जामालीस पाचशे जैन मुनींचे आचार्य नियुक्त केले.

येथून महावीर कोशाम्बीला गेला. तेथे उदयन राजाची बहीण जयन्ती हिला दीक्षा देऊन तिला त्याने आपल्या संघात घेतले. तेथून तो कोशल येथे गेला. त्या ठिकाणी सुमनोभद्र व सुप्रतिष्ठ नावाचे दोन शिष्य त्याने तयार केले. कालांतराने हे दोघे अत्यन्त सुप्रसिध्द जैन मुनी झाले.

चंपाहून श्रावस्तीला गेल्यावर महावीराची गोसालशी अखेरची भेट झाली. गोसाल हा तेथे एका विधवा कुंभारणीकडे राहात होता. त्या ठिकाणी या दोन धर्म प्रवर्तकांमध्ये काही मतभेद झाले. दंतकथा अशी आहे की, गोसाल याने आपल्या तपसामर्थ्याने महावीराच्या सहा खास शिष्यांना भस्म करून टाकले आणि महावीराला 'सहा महिन्यांच्या आत मृत्यू पावशील' असा शाप दिला. महावीराने शाप उलटून टाकला आणि गोसाल सहा महिन्यात मरण पावला. त्या काळी साधूंच्या निरनिराळ्या संप्रदायांमध्ये अशी भांडणे बहुधा होत असत. या घटनेनंतर सोळा वर्षे महावीर हयात होता.

या वेळे पावेतो महावीराचे अनेक आवडते शिष्य मरण पावले होते. कठोर तपश्चर्येमुळे व आजारामुळे त्याचा स्वतःचा देहदेखील जर्जर झालेला होता. राजगृहाहून पावापुरीला जाऊन महावीर आपल्या जीवनाचा अखेरचा पावसाळा घालवीत होता. आपण आता जगणार नाही याची त्याला खात्री वाटू लागली होती. उपदेश देण्याचे कार्य त्याने अखेरच्या रात्रीपर्यंत चालू ठेवले. पापाविषयीची व पुण्याविषयीची प्रत्येकी पंचावन सूत्रे आणि विचारण्यात न आलेल्या प्रश्नांविषयीची छत्तीस सूत्रे—अशी एकंदर १४६ सूत्रे महावीराने याच कालाखंडात सांगितली. दिवाळीच्या रात्री, सहा दिवसांच्या उपवासानंतर महावीराने देहत्याग केला.

महावीराचे निर्वाण झाल्यावर त्याच्या वचनांचा संग्रह करण्यात आला. बारा 'सुत्तां' मध्ये त्यांची गुंफण करण्यात आली. महावीराच्या पूर्वी जैन-धर्माचे चार यम ( व्रते ) होते—अहिंसा, सत्य, अस्तेय (चोरी न करणे) आणि अपरिग्रह महावीराने त्यात, ब्रह्मचर्य, हा एक यम आणखी घातला. संघामध्ये त्याने 'प्रतिक्रमण' हा नवा नियम सुरू केला. याचा अर्थ असा आहे की, साधूकडून एखादा अपराध झाला असो वा नसो, त्याने नेहमी 'प्रतिक्रमण' करावे, म्हणजेच आपला अपराध स्वीकारण्याच्या आणि त्याचे प्रायश्चित्त घेण्याच्या विधीमध्ये भाग घ्यावा.

नन्द वंशाच्या राजांनी व चंद्रगुप्त मौर्याने जैन धर्माचा विस्तार केला. चंद्रगुप्त मौर्याच्या काली जैन धर्म भारतात बहुतेक सर्वत्र फैलावला होता. पण नंतर चंद्रगुप्त मौर्याचा नातू सम्राट अशोक याने बौध्द धर्म स्वीकारला आणि त्याच्या राज्यात जैन धर्मापेक्षा बौध्द धर्म अधिक फोफावला. नंतर अशोकाच्या नातवाने गुजरात व काठेवाड या भागात या धर्माचा प्रचार केला. प्रचार करीत असताना त्याने जबरदस्ती देखील केली. वास्तविक जबरदस्ती करणे या धर्माच्या शिकवणुकीच्या विरुध्द होते. दक्षिणेत चालुक्य व पल्लव राजांनी देखील जैन धर्माचा बराच प्रचार केला.

महावीरानंतर सुमारे ६०० वर्षांनी जैन धर्माच्या दोन शाखा झाल्या—श्वेताम्बर आणि दिगम्बर. श्वेताम्बर जैन पांढरी शुभ्र वस्त्रे धारण करतात आणि दिगम्बर जैन कपडे घालीत नाहीत. जैन धर्माच्या या दोन शाखा आजही आढळतात.

सौराष्ट्रात गिरनार, बिहारमध्ये पारसनाथ व राजगृह, राजस्थानात श्री महावीरजी व दिलवारा मंदिर आणि म्हैसूर मध्ये गोमटेश्वर—ही सर्व जैनांची प्रसिध्द तीर्थ-क्षेत्रे आहेत.

# बुध्द

अडीच हजार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे.

नेपाळमध्ये कपिलवस्तु नावाचे एक नगर होते. तेथे शाक्य लोक राहात असत. त्यांचे पुरोहित गौतम कुळातील होते. त्या काळी पुरोहिताच्या कुळाच्या नावाने सुध्दा गोत्र ठरत असे. म्हणजे, शाक्य हे गौतम-गोत्री होते.

कपिलवस्तु हे काही फार मोठे राज्य नव्हतें. ते कोशलचे मांडलिक होते. तेथे अन्नधान्य विपुल होत असे. तेथील तांदूळ उत्कृष्ट प्रतीचा असे. तेथील राजाचे नाव शुध्दोदन असण्याचे कदाचित हेच कारण असावे. याच कारणामुळे शुध्दोदनाच्या इतर भावांची नावे देखील तांदुळ या शब्दाची अर्थवाचक होती. (उदाहरणार्थ, बलोदन) बुध्द त्याचा मुलगा होता. बुध्दाच्या आईचे नाव होतें—माया देवी. ती अत्यंत सुंदर होती. बुध्दाच्या जन्माच्या बाबतीत एक कथा अशी आहे की, एक शुभ्र हत्ती सोंडेत फूल घेऊन स्वर्गातून खाली आला आणि कुशीत शिरला असे स्वप्न मायादेवीला पडले. पुढे दिवस भरत आले तेव्हा ती, प्रसूतीसाठी आपल्या माहेरी-देवदह गावी जाण्यास निघाली. देवदह तेथून फार लांब नव्हते. मायादेवी मेण्यात बसून निघाली. वाटेत लुंबिनीचे वन लागले. तेथील निसर्गसौंदर्य पाहण्यासाठी मायादेवी मेण्यातून खाली उतरली आणि तेथेच बुध्दाचा जन्म झाला. तो दिवस वैशाखी पौर्णिमेचा होता.

लुंबिनी वनात ज्या ठिकाणी बुध्दाचा जन्म झाला त्या जागी सम्राट अशोकाने एक स्तंभ उभारलेला आहे. तो अजूनही आहे. हे स्थान ईशान्य रेल्वेच्या नोतनवा या स्टेशनापासून बारा मैलांवर आहे आणि रूम्मिनदेई म्हणून ते ओळखले जाते.

मुलगा झाल्यामुळे आईवडिलांची इच्छा पूर्ण झाली म्हणून मुलाचे नाव सिध्दार्थ असे ठेवण्यात आले. सिध्दार्थ दर्शनाला असित ऋषी आले. मुलाला पाहून अगोदर ते हसले आणि मग रडले. सर्वांनी याचे कारण विचारले तेव्हा ते म्हणाले—'महात्मा जन्माला आला आहे. म्हणून मी हसलो. हा थोर होण्यापूर्वीच मला मृत्यू येईल म्हणून मला वाईट वाटले. याला महात्मा झालेला बघण्याइतके दीर्घायुष्य मला नाही म्हणून मला रडू आले. ही कथा नंतर कोणीतरी रचली असावी असे वाटते.

सिध्दार्थाच्या जन्मानंतर सातच दिवसांनी मायादेवी इहलोक सोडून गेली. सिध्दार्थाचे पालन-पोषण त्याची मावशी व सावत्र आई प्रजापती गौतमी हिने केले.

सिध्दार्थाच्या बालपणच्या गोष्टींची काही विशेष माहिती हाती लागत नाही. जी काही माहिती मिळते तिच्यावरून एवढेच कळते की, लहानपणी तो अतिशय हुशार होता आणि अल्पावधीतच त्याने बरीच विद्या प्राप्त करून घेतली होती. खेळण्याऐवजी इतर मुलांपासून लांब बसून तो कसला तरी विचार करण्यात गढून जात असे.

देवदत्त नावाचा त्याचा एक चुलत भाऊ होता. एकदा त्याने एक हंस बाणाने मारून खाली पाडला. सिध्दार्थाला त्या जखमी हंसाची दया आली आणि त्याने औषध वगैरे लावून त्या हंसाला बरे केले. बरा होऊन तो हंस जेव्हा डौलाने फिरू लागला तेव्हा मात्र देवदत्ताला तो हवासा वाटू लागला आणि त्या हंसासाठी देवदत्त व सिध्दार्थ यांच्यामध्ये भांडण जुंपले. देवदत्त म्हणू लागला, 'हंस मी खाली पाडला. तेव्हा तो माझा आहे'.

सिध्दार्थ म्हणाला "हंस मरत असताता मी त्याचे प्राण वाचविले आहेत. तेव्हा तो माझाच आहे."

अखेर हंस सिध्दार्थालाच मिळाला. परंतु सिध्दार्थाने हंसाला मोकळे सोडून

सिध्दार्थाचे पालनपोषण मोठ्या वैभवात झाले. त्याला कसलीही कमतरता नव्हती. तीन ऋतूंमध्ये राहाण्याकरिता त्याच्यासाठी तीन भिन्न-भिन्न प्रकारचे, त्या त्या ऋतूला अनुकूल असे खास महाल बांधलेले होते. हिवाळ्याचा उन्हाळ्याचा, आणि पावसाळ्याचा असे तीन वेगवेगळे महाल होते. पण सिध्दार्थाला कशातच गोडी वाटत नसे. मुलाला असा दुर्मुखलेला बघून शुध्दोदन राजाने त्याचा विवाह करून टाकला. असे म्हणतात की, शुध्दोदनाने एक खास उत्सव केला. त्यात हजारो शाक्य मुली जमल्या. आणि त्या सर्वांमधून सिध्दार्थाने एकीची निवड करून घेतली.

पाली ग्रंथांमधून 'राहुलची आई' असा तिचा उल्लेख करण्यात आलेला आहे. पण गोपा, यशोधरा, उत्पलवर्णा, भद्रा, बिंबा इत्यादि नांवेही आढळतात.

लग्नाच्या वेळी सिध्दार्थाचे वय सोळा वर्षांचे होते. त्याच्या तारुण्याला बहर आला होता. सुख ओसंडून वाहात होते. पण सिध्दार्थाच्या मनाला सुख नव्हते. त्याच्या मनात नेहमी कसला ना कसला विचार चाललेला असे. एकदा त्याला एक म्हातारा माणूस दिसला तेव्हा त्याच्या मनात असा विचार आला 'तारुण्य क्षणभंगुर आहे. मी देखील काही दिवसांनी असाच म्हातारा होईन.' पुढे एक रोगी पाहून त्याच्या मनात असा विचार आला 'शरीर हे रोगांचे आगर आहे. मी काही सदैव निरोगी राहू शकणार नाही.' नंतर एकदा एक प्रेतयात्रा बघून त्याच्या मनात विचार आला 'शरीर नाशवंत आहे. मलाही एक दिवस मरावे लागणार आहे.' आणि हे सर्व विचार मनात येताच त्याचा यौवनसुलभ अहंकार नाहीसा झाला.

एका संन्याशाचा प्रफुल्ल चेहरा पाहून त्याला घरदार सोडून निघून जावेसे वाटू लागले. रोग, म्हातारपण, व मृत्यू यांच्या दुःखापासून सुटका करून घेण्याचा हाच एक मार्ग त्या वेळी प्रचलित होता.

विवाहानंतर तेरा वर्षांनी सिध्दार्थाला मुलगा झाला. मुलाला पाहून सिध्दार्थाच्या मनात आले—अरे, हा तर राहुल (बंधन) जन्माला आला. आताच जर संन्यास घेतला नाही तर तो पुढे घेणे जमणार नाही.

सिध्दार्थाने 'बंधन' या अर्थी मुलास राहुल म्हटले. पण शुध्दोदन राजाने मुलाचे ते नाव ठेवण्याची त्याची इच्छा आहे असे समजून त्याचे नाव राहुल ठेवले.

सिध्दार्थ लौकिक सुखे उपभोगीत होता खरा, पण त्या सुखोपभोगाच्या वेळी देखील त्याच्या मनाला टोचणी लागलेली असे की हे सर्व सुख क्षणिक आहे नश्वर आहे. म्हणूनच त्याचे मन शाश्वत टिकणाऱ्या सुखाच्या शोधात गुंतलेले असे. तो मनातून अस्वस्थ राही. आपला हा अस्वस्थपणा त्याने कधी कोणापासून लपविला नाही. त्याचा स्वभाव सरळ होता. तो आपल्या पत्नीशी व वडिलांशी

देखील संन्यास घेण्याची चर्चा करीत असे. असे म्हणतात की, त्याच्या या विचारांना वडिलांनी मोडता घातला. पण पत्नीने मात्र उत्तेजनच दिले. संन्यास घेण्याचे त्याच्या मनात बरेच दिवसापासून घोळत होते. राहुलच्या जन्मामुळे या विचारांना गती मिळाली आणि सिध्दार्थाला वाटले की आता फार वेळ घालविण्यात अर्थ नाही.

एका रात्री राहुल व राहुलची आई दोघेही झोपले असताना तो त्यांना सोडून निघून गेला. निघण्यापूर्वी त्यांना उठवून त्यांचा निरोप घेऊन जावे असे सिध्दार्थला वाटले.

पण लगेच त्याच्या मनात विचार आला, "निरोप घेण्याच्या वेळी मोह झाला तर ?" राहुलचा चेहरा त्याच्या आईच्या हाताखाली झाकला गेलेला होता. हात बाजूला सारून त्याचा चेहरा डोळे भरून पाहण्याची अनिवार इच्छा सिध्दार्थाला झाली. पण हात बाजूला करताना यशोधरा जागी झाली आणि तिने रडावयास सुरुवात केली तर ? त्यापेक्षा नकोच त्याचा चेहरा बघायला. सिध्दार्थाने आपले मन आवरले-गुपचुप आपला आवडता घोडा कन्थक तयार केला. बरोबर छन्न नावाच्या मोतद्दाराला घेतले आणि तो वैशालीकडे निघाला.

अनुप्रिय गांवी पोहोचल्यावर त्याने छन्नास माघारी पाठवून दिले. आपले कपडेलत्ते, दागदागिने त्यास देऊन टाकले आणि तलवारीने केस कापून टाकून संन्याशाचा वेष धारण केला. त्याच गावच्या आंबराईत त्याने काही दिवस मुक्काम केला आणि मन स्थिर झाल्यावर वैशालीची वाट धरली.

वैशाली हे त्या वेळी अतिशय प्रसिध्द नगर होते. लिच्छवी गणाची ती राजधानी होती. गणातील सर्व लोक एकोप्याने राज्य करीत होते. लोक सुखी व समृध्द होते. तेथे विविध विषयांवर वादविवाद व चर्चा होत असे. जैन साधू तेथे नेहमी राहात असत. मोठे-मोठे विद्वान तेथे जमत असत व दूरदूरहून विद्यार्थी येत असत. ज्ञानाच्या शोधार्थ सिध्दार्थ देखील तेथेच गेला. तेथे आलार कालाम नावाच्या ब्राह्मणाकडून त्याने योग शिकून घेतला. पण त्यानेही मानसिक अस्वस्थता दूर झाली नाही. म्हणून तो पुन्हा भटकू लागला. श्रावस्ती व राजगृह या जागी सुध्दा तो गेला. अनेक गुरूपासून त्याने दीक्षा घेतली व त्यांचे प्रेम

संपादन केले. त्यांच्याजवळ जे ज्ञान होते तें सारे सिध्दार्थाने घेतले आणि तो पुढे निघाला.

सुरुवातीला भिक्षेचे अन्न खाऊन त्याला ओकारी येत असे. पण हळूहळू त्याची संवय झाली. मगधचा राजा बिंबिसार याने जमीनजुमला देण्याची तयारी दर्शविली आणि तेथेच राहाण्याचा आग्रह सिध्दार्थाला केला. पण सिध्दार्थाने ऐकले नाही. बुध्द झाल्यावर काही दिवस येथे येऊन, राहीन असे वचन बिंबिसार राजाला देऊन, त्याचा निरोप घेऊन, सिध्दार्थ पुढे निघाला.

तेथून पुढे गेल्यावर गयेजवळ एका टेकडीवर काही दिवस त्याने साधना केली. ती जागा अतिशय भयंकर होती. तेथे एकाग्र चित्ताने साधना होऊ शकली नाही. म्हणून तेथून निघून नेरंजरा (निजलान) नदीच्या काठी उरुबेला गावी सिध्दार्थ गेला. या ठिकाणी आणखीही कित्येक तपस्वी होते. त्यापैकी पाच भिक्षू सिध्दार्थाला त्याच्या, साधनेच्या कार्यात मदत करीत असत.

त्या काळी ज्ञानप्राप्तीसाठी लोक तप करीत असत. सिध्दार्थानें देखील तेच केले. तो उपाशी राहून ध्यान करू लागला. परंतु काहीसुध्दा फळ मिळाले नाही. पण सिध्दार्थाने प्रयत्न सोडला नाही. खाणेपिणे वर्ज्य केल्यामुळे हाडांचा नुसता सांपळा राहीला. एकदा तो बेशुध्द पडला. तेव्हा तेथून गावातील नर्तकी नाचत गात चालल्या होत्या. त्यांच्या गाण्याचा अर्थ होता—वीणेच्या तारा फार सैल करू नका नाहीतर त्यातून सूर निघणार नाहीत; त्या तारा फार आवळूही नका नाहीतर त्या तुटतील. हाच होता मधला मार्ग—भोगविलासाच्या आणि कठोर तपाच्या मधील मार्ग—शुध्दीवर आल्यानंतर त्याच्या मनात विचार आला की शरीराला कष्ट देणें व्यर्थ आहे.

साधनेच्या या कालखंडात सुजाता नावाची एक गवळण सिध्दार्थाला रोज खीर देऊन जात असे. सिध्दार्थाला देव मानून ती त्याला नैवेद्य देत होती. पण त्या खिरीमुळे सिध्दार्थाला पोटाची चिंता करावी लागली नाही आणि एकाग्रतेने तपश्चर्या करणे सोयीचे झाले. म्हणूनच बौध्द लोक सुजाताचे फार उपकार मानतात.

सिध्दार्थाने उपास करायचे सोडून दिले. तो अन्नपाणी घेऊ लागला. म्हणून त्यास साहाय्य करणाऱ्या भिक्षूंना वाटले की, सिध्दार्थाने तपश्चर्या मोडली म्हणून ते सर्व त्यास सोडून निघून गेले. शरीरात थोडी ताकद आल्यावर सिध्दार्थ पुन्हा भिक्षा मागायला जाऊ लागला आणि उरुवेला सोडून जवळच्याच एका वनात राहू लागला.

प्रकृती बरी झाल्यावर साधना व्यवस्थितपणे होऊ लागली. साधनेच्या चौथ्या अवस्थेत तो कित्येक दिवस ध्यानमग्न राहू लागला. त्या वेळच्या त्याच्या मन:स्थितीचे वर्णन करणे अशक्य आहे. एकदा अशाच रीतीने संबंध दिवस आणि सबंध रात्र ध्यानमग्न राहिल्यावर पहाटेच्या वेळी त्याला त्याच्या प्रश्नाचे उत्तर मिळाल्यासारखे वाटले. त्याला ज्ञानप्राप्ती झाली. सहा वर्षांची तपश्चर्या सफल झाली. सिध्दार्थ 'बुध्द' झाला. ज्या ठिकाणी त्याला हा बोध झाला ते ठिकाण 'बोधगया' या नावाने सुप्रसिध्द आहे.

बोध मिळाल्यावरही बुध्द काही दिवस तेथेच राहिला. तो कधी या वनातून त्या वनात जात असे किंवा एका झाडाखालून दुसऱ्या झाडाखाली, राहात असे आपला धर्म, तत्त्वज्ञान, संघ व संघाचे नियम यांच्या संबंधीच्या बऱ्याचशा गोष्टींचा त्याने विचार केला.

नंतर बुध्द लोकांना भेटू लागला. सात आठवड्यानंतर उत्कलचे तपस्सु व भल्लिक या नावाचे दोन व्यापारी माल घेऊन तेथून जात होते. त्यांच्या बरोबर पाचशे गाड्या होत्या. त्यातील एक गाडी अडकली होती. ती बुध्दाने बाहेर काढून दिली. त्या व्यापाऱ्यांनी बुध्दाला अन्नपाणी दिले आणि त्याचा उपदेश ऐकला. हे व्यापारीच बौध्द धर्माचे पहिले उपासक बनले.

बुध्दाच्या मनात या वेळी संघर्ष चाललेला होता. मिळालेला बोध स्वत:पुरता मर्यादित ठेवायचा की, लोकांना समजावून सांगावयाचा ? समजावून सांगावयाचा म्हटले तरी तो कोण ऐकून घेईल ? लोक आपल्याला हसतील. पण नंतर हळूहळू मनातील शंकाकुशंका नाहीशा झाल्या. मनात विचार आला कीं, ज्ञानाचा लाभ घेऊ शकतील असे काही लोक जगात आहेत. आणि ज्ञानाचा प्रसार जर केला नाही तर ते अज्ञानीच राहतील.

मग प्रश्न निर्माण झाला की, सर्वात अगोदर कोणाला सांगावे ? त्याला गुरू चे स्मरण झाले. पण ते तर कधीच कालवश झालेले होते. तेथून निघून बुध्द काशी जवळच्या ऋषिपतन मृगदाव (सारनाथ) या ठिकाणी गेला.

बुध्दाला तपोभ्रष्ट समजून त्याचे जे पाच शिष्य त्याला सोडून गेले होते ते ऋषिपतन येथे त्याला भेटले. त्या पाच जणांनाच बुध्दानें सर्वात अगोदर दीक्षा दिली. यालाच 'धम्म चक्क पवत्तन'—म्हणजेच धर्मरूपी चाकास चालविणे असे म्हणतात. बुध्दाने या ब्राह्मणांना सांगितले की, जीवनातील एक मार्ग अतिशय विलासाचा आहे, आणि दुसरा मार्ग कठोर तपश्चर्येचा आहे. याशिवाय आणखी एक तिसरा मार्ग देखील आहे. तो फार विलासाचा वा तपश्चर्येचा नसून या दोघांच्या मधील मार्ग आहे. तथागताने तो पाहिलेला आहे—तो पहा, तो समजून घ्या. बुध्दानें दाखविलेला हा मार्ग, मध्यम मार्ग म्हणजेच 'दोन टोकांच्या मार्गांमधील मार्ग म्हणून ओळखला जातो. याचे आठ सिध्दान्त आहेत—समतोल दृष्टी राखणें, योग्य संकल्प करणे, योग्य बोलणे, योग्य काम करणें, उपजीविकेचा योग्य मार्ग अनुसरणें, योग्य प्रयत्न करणें, सावधानता आणि नीट समाधी लावणें. हे आठ सिध्दान्त पाळल्यास निर्वाण मिळतो. निर्वाण मिळाल्यावर व्यक्ती पुन्हा जन्म घेत नसते की पुन्हा मरत नसते.

हळूहळू बुध्दाच्या शिष्यांची संख्या वाढू लागली. बुध्दाने शिष्यांचा एक संघ तयार केला.

हे पाच भिक्षूच बुध्दाच्या संघाचे पहिले सभासद होते. हळूहळू संघ वाढू लागला. भिक्षू चोहोबाजूस जाऊन प्रचार करू लागले.

ऋषिपतनाहून निघून बुध्द उरुवेला येथे गेला. तेथे एक हजार साधू व त्यांचे गुरू यांनी बुध्दाचे शिष्यत्व पत्करले.

उरुबेलानंतर बुध्द राजगृहला गेला. बिंबिसार राजानं स्वहस्ते संघातील सर्व लोकांना भोजन दिले आणि वेणुवन दान दिले. याच ठिकाणी सारिपुत्त आणि मोग्गलान नावाचे दोन विद्वान पंडित बुध्दाचे शिष्य बनले. यामुळे संघाची प्रतिष्ठा वाढली, नावलौकिक वाढला. संघाचे नियम वैशालीचे गण आणि परंपरागत रूढी या सर्वांपासून घेण्यात आले होते. विश्वाचे

कल्याण करणे व लोकांना दुःखांपासून मुक्त करणे हे संघाचे उद्देश होते. संघातील साधू साधे राहात, भिक्षा मागून खात व लोकांकडून मिळतील ती वस्त्रे परिधान करीत.

संघाचा दुसरा मोठा मुक्काम कपिलवस्तु नगरीत झाला. शुध्दोदन राजाला व त्याच्या सर्व राण्यांना बुध्दाने उपदेश केला. इतकेच नव्हे तर आपला मुलगा राहुल यालादेखील दीक्षा देऊन टाकली. त्यामुळे शुध्दोदन राजाला अतिशय वाईट वाटले. त्याला दुःखी पाहून बुध्दाने नियम करून टाकला की आई-वडिलांच्या आज्ञेखेरीज कोणालाही भिक्षू करावयाचे नाही.

अशा तऱ्हेने गावोगावी हिंडून सतत पंचेचाळीस वर्षे बुध्दाने धर्मप्रचाराचे कार्य केले. त्याचा सर्व वेळ लोकांचे कल्याण करण्यात जात असे. त्याच्यासमोर नगरातील मोठे मोठे सावकार आणि राजे-महाराजे हात जोडून उभे राहात पण तो स्वतः मात्र रोज सकाळी नियमितपणे भिक्षा मागावयास जात असे आणि न बोलता, मान वर न करता दारासमोर जाऊन उभा राहात असे. भिक्षापात्र भरताच परत येऊन ते भिक्षान्न खात असे. भिक्षूंना ध्यान लावणे व त्यांची कामे, यासंबंधी सांगत असे. सर्वांच्या जेवण्याखाण्याची विचारपूस करीत असे. दुपारी चिंतन करीत असे आणि लोकांना उपदेश केल्यावर चिंतन करीत झोपी जात असे. मानवतेविषयी वाटणाऱ्या प्रेमामुळेच उपदेशाचे व प्रचाराचे कठीण कार्य बुध्दाने हाती घेतले. नाहीतर उगाच भ्रमण करण्याची त्याला काय गरज होती ? पाच-दहा शिष्य गोळा करून, मठ स्थापन करून त्याला आरामात राहाता आले असते, किंवा परत कपिलवस्तूला जाऊन राजर्षी म्हणवून घेता आले असते.

पण जगाच्या दुःखामुळे तो व्यथित झाला होता. समाजाचा अधःपात होत होता. आचाराच्या नावाखाली कर्मकांड वाढले होते. धर्माला अंधविश्वासाचे स्वरूप प्राप्त झाले होते. विद्वानांची वेगळी भाषा होती. ती म्हणजे संस्कृत. सारे ज्ञान या भाषेत लिहिलेले होते. बहुजन समाजाला ती भाषा समजत नव्हती.

बुध्दाने धाडस केले. रूढीविरुध्द बंड पुकारले. लोकांच्या रोजच्या व्यवहारातील भाषेत म्हणजे पालीभाषेत त्याने आपल्या धर्माचा उपदेश केला. ती भाषा विद्वान आणि अशिक्षित सर्वांनाच समजत असे. बुध्दाच्या शिष्यांमध्ये कालांतराने जरी दुराचार माजला आणि भारतातून बौध्द धर्माची उचलबांगडी झाली तरी आज सुध्दा आपल्या देशात बौध्द लोक हेच काय ते जातिभेदाला तीव्र विरोध करणारे लोक आहेत.

देवावर हवाला टाकून स्वस्थ बसून राहिल्यास नतिकदृष्ट्या मानव कुचकामी होतो. बुध्दाने सांगितले —स्वतःचा उध्दार किंवा अधःपात स्वतःच्याच हाती आहे. त्याने कर्म करण्याची शिकवण दिली. देशाला सक्रिय बनविले आणि जनतेला स्वतःच्या पायांवर उभे राहाण्याचे आवांहन केले.

बुध्दाने बुध्दीला पूर्ण स्वातंत्र्य दिले. त्याने सांगितले—विचारशक्तीवर विश्वास ठेवा. जे मनाला पटेल तेच मान्य करा. माझ्या उपदेशापैकीसुध्दा तुम्हाला समजू शकेल, तुमच्या बुध्दीला पटेल तेवढेच स्वीकारा.

बुध्दाने ज्ञानाची कवाडे सर्वांसाठी खुली केली. स्त्रियांना व शूद्रांना देखील ज्ञानामृत मिळू लागले. बुध्दाने कट्टरतेचे उच्चाटन केले आणि भारताला सहिष्णुता शिकविली. बौध्द धर्म सहजीवनावर आधारलेला आहे. आणि म्हणूनच जगात शांतता निर्माण करणारी ती एका प्रभावी शक्ती ठरली आहे.

वृध्दापकाळी बुध्द संघाविषयी उदास राहू लागला. संघात फूट पडली होती. स्वार्थी लोकांचा भरणा झाला होता. अनेक आवडते शिष्य मृत्यू पावले होते. आपला अंतकाळ जवळ आल्याचे बुध्दाने ओळखले होते आणि म्हणूनच संघापासून तो अलिप्त राहात होता.

ऐंशी वर्षांचे वृध्द शरीर आणि त्याचा भक्त चुंद लोहार याच्याकडील डुकराच्या मांसाचे भोजन ! त्यामुळे बुध्दाला जुलाब होऊ लागले. कुशीनारा (कसया, जिल्हा-देवरिया) येथे शाल वनात दोन वृक्षांच्या मध्ये त्याने आसन मांडले. आणि निजून अखेरची समाधी लावली.

त्याच्या निर्वाणाची वेळ येऊन ठेपलेली पाहून त्याचे शिष्य रडू लागले. तेव्हा बुध्दाने आपला आवडता शिष्य आनंद यास जवळ बोलावून उपदेश केला—आनंद, रडू नकोस, निराश होऊ नकोस. जन्माला आलेल्या प्रत्येकाला मरण ठेवलेलेच आहे. माझ्या नंतर तुला कोणीही गुरु राहाणार नाही, असे मनात आणू नकोस. मी दिलेला उपदेश हाच यापुढे तुझा गुरु राहील.

बुध्दाच्या मृत्यूनंतर कित्येक वर्षांनी बौध्द धर्माच्या दोन शाखा झाल्या—हीनयान आणि महायान. बौध्द धर्मविषयीची माहिती आपल्याला पाली भाषेतील 'त्रिपिटक' या ग्रंथात आढळते.

आज जगातील एक तृतीयांश लोक बौध्द धर्म मानतात. पण एक काम अजूनही तसेच राहिलेले आहे. ते म्हणजे आजच्या विज्ञानाच्या युगात बुध्दाच्या उपदेशाचे महत्त्व ओळखणे. अडीच हजार वर्षे होऊन गेलेली असली तरी आपले आजचे प्रश्नसुध्दा सोडवू शकतील असे अनेक सिध्दान्त बौध्द धर्मात आहेत, असे बऱ्याच विद्वानांचे मत आहे.

बुध्दाने ना देवालये बांधली ना स्मारके उभारली. त्याने कोणताही देश जिंकला नाही की साम्राज्य स्थापन केले नाही. त्याने लोकांची मने—त्यांची अंत:करणे जिंकण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच त्याने पेटवलेली ज्योत आजहि जगाला प्रकाशमान करीत आहे.

# पाणिनी

आजपर्यंत कितीतरी भाषा जन्मास आल्या, वाढल्या आणि बदलल्या. कित्येक नष्ट झाल्या. कित्येक भाषा नष्ट होऊन देखील पुन्हा नवे रूप धारण करून विकसित झाल्या पण कित्येकांचा तर मागमूस देखील राहिला नाही. आजसुध्दा जगात हजारो भाषा बोलल्या जातात. या सर्वांमध्ये हजारो वर्षांची प्राचीन अशीही एक भाषा आहे आणि ती कदाचित कधीच नष्ट होणार नाही. ती भाषा आहे संस्कृत. आणि ज्या व्यक्तीने तिला अमर करण्याचा मंत्र शोधून काढला तिचे नाव आहे—पाणिनी. पाणिनीनें संस्कृतचे सर्वांगसुंदर व्याकरण लिहिले.

तीन हजार वर्षांपूर्वी झेलम व चिनाब यांच्या वायव्येकडील भाग, गांधार या नावानें ओळखला जात असे. तो भाग हल्ली यूसुफजई पठाणांच्या ताब्यात आहे. त्या वेळी तेथे दक्ष नावाच्या जातीचे लोक राहात असत. दक्षांचे स्वतःचे संघराज्य होते. या दक्ष देशात काबूल नदी पश्चिमेकडून येऊन सिंधू नदीला मिळते. दोन्ही नद्यांच्या संगमापासून वरच्या अंगाला चार मैलांवर लहुर नावाचे गाव आहे. याच गावी पाणिनीचा जन्म झाला असावा, असा तर्क आहे. त्या काळी या गावाचे नाव शलातुर होते. पाणिनीच्या नंतरसुध्दा बाराशे वर्षे हे गाव शलातुर या नावानेंच प्रसिध्द होते. याचा पुरावा म्हणजे चिनी यात्रेकरू ह्युएनत्संग त्या सुमारास भारतात आला होता आणि त्यानें असे लिहून ठेवले आहे की शलातुर नगरातील ब्राह्मणांना व्याकरणाची चांगली माहिती आहे.

वास्तविक पाहता शलातुरला पाणिनीचे आजोळ होते. विष्णुशर्मन पणिन हे त्याचे आजोबा होते. ते वाल्हीककडील राहाणारे होते. या पणिन नावावरून त्याच्या कुळाचे नाव पाणिनी पडले. विष्णुशर्मनच्या मुलाचे नाव सामन पाणिनी होते. त्याचा मुलगा आहिक पाणिनी, इतका प्रसिध्द झाला की लोक त्याचे खरे नाव विसरून गेले. हा आहिकच व्याकरणकार पाणिनी म्हणून विख्यात झाला. त्याचा जन्म इसवी सनापूर्वी ५००च्या सुमारास झाला.

पाणिनीची आणखीही काही नावे होती. त्याचे गोत्र नाम शलांकि होते. गावावरून पडलेले नाव शालातुरीय होते. त्याचे कारण असे की सामन

पाणिनी आपल्या सासुरवाडीलाच म्हणजे शलातुर गावीच राहू लागला होता. त्याच ठिकाणी तो अध्यापन व्यवसाय करीत आसे. काही ऋचा रचून तसा तो ऋषी देखील झाला होता. आहिक आणि पिंगल या दोघांचा जन्म शलातुर गावीच झाला.

पाणिनीच्या गुरूचे नाव वर्ष असे होते. वर्ष अतिशय विद्वान होता. पाणिनी लहानपणीच त्याच्या जवळ शिकू लागला होता.

त्या काळी अध्ययन पूर्ण झाल्यावर विद्यार्थी देश-भ्रमणासाठी बाहेर पडत असत. अशा प्रकारच्या प्रवासाला 'चारिका' म्हणत असत. 'चारिका'मुळे विद्यार्थ्यांना आपल्या देशातील लोक, त्यांचे खाणेपिणे त्यांची राहाणी, त्यांच्या चालीरीती इत्यादि गोष्टींची माहिती मिळत असे; गुरूकडून मिळालेले ज्ञान प्रत्यक्ष व्यवहारात पडताळून पाहता येत असे आणि नाना तऱ्हेच्या कला शिकता येत असत.

अध्ययन पुरे झाल्यावर पाणिनी देखील 'चारिका' साठी निघाला. त्याच्या बरोबरच्या विद्यार्थ्यांमध्ये व्याडि आणि वररुचि हे देखील होते तिघांनीहि संशोधन केले आणि तिघेहि शास्त्रकार बनले. 'चारिका' करीत करीत पाणिनी हिमालयापर्यंत गेला. तेथे ईश्वरदेव नावाच्या विद्वान पंडिताशी त्याची गाठ पडली.

पाणिनीने ईश्वरदेवाला आपली योजना समजावून सांगितली. योजना अशी होती की, साहित्याच्या भाषेची आणि बोलभाषेची सुधारणा करावयाची. त्यासाठी पाणिनीने ठरविले होते की, भाषेचे जे अनिश्चित प्रयोग आहेत त्यांना निश्चित करण्यात यावे, जी अशुध्द रूपे आहेत त्यांना शुध्द रूप देण्यात यावे, नियमांना ज्या पळवाटा आहेत त्या पळवाटा बंद करण्यात याव्यात आणि ज्या नियमांमध्ये दोष आहेत ते नियम बदलण्यात यावेत किंवा त्यामध्ये सुधारणा करण्यात यावी. याखेरीज नवे नियम तयार करण्याचाहि त्याचा विचार होता.

ईश्वरदेवाला पाणिनीची नाविन्यपूर्ण योजना अतिशय आवडली व त्याने मदत करण्याचे आश्वासन दिले.

त्याने डमरूचे चौदा बोल काढले.

ईश्वरदेवाला भेटण्यापूर्वीच पाणिनीने संपूर्ण देशाचा दौरा करून टाकला होता. सिंधूच्या उगमापासून ते आसामपर्यंतचा आणि हिमालयापासून गोदावरी-पर्यंतचा सर्व प्रदेश त्याने पालथा घातला होता. प्रत्येक जनपदात वा संघात तो बरेच दिवस राहिला होता आणि तेथील धार्मिक, आर्थिक, सामाजिक, राजनैतिक, औद्योगिक व सांस्कृतिक संघटनांचा त्याने सखोल अभ्यास केला होता. ज्या ज्या ठिकाणी काही नाविन्य आढळले, नवी पध्दत, नवा व्यवहार, नवा शब्द वा एखाद्या जुन्या शब्दाचा नवा अर्थ किंवा जुन्या अर्थाची नवी छटा आढळली ते ते सारे त्याने नीट लक्षात ठेवले. अशा तऱ्हेने पाणिनीने प्रत्येक ठिकाणचे शब्द व त्यांचे प्रचलित अर्थ लक्षात घेऊन व त्या अर्थांचे गहन विश्लेषण करून त्यांची व्याख्या ठरवून टाकली.

या कार्यासाठी इतके धैर्य, अध्ययन, इतकी प्रतिभा, व अवलोकनशक्ती हवी होती की मी मी म्हणणाऱ्यांनी देखील मागे सरावे. पण पाणिनीने ते तडीस नेऊन दाखविले. हे सर्व साहित्य जमविताना पाणिनीला बरेच मनोरंजक अनुभव आले असतील हे सांगायला नकोच !

प्रवास पुरा झाला, आणि शब्दांचे शुध्द रूप ठरविण्यासाठी आवश्यक ते साहित्य गोळा करण्याचे काम पुरे झाले, तेव्हा पाणिनी हिमालयातील एका शांत निर्जन जागी बसून पुढील कार्यास लागला. स्वत:च्या सुखन्दु:खाची पर्वा न करता, रात्रंदिवस मेहनत करून अवघ्या शब्द-सामग्रीची वर्गवारी करण्याचे काम त्याने हाती घेतले. भाषेला नियमांनी बांधून टाकणे आणि त्या नियमांप्रमाणे शब्दांची शुध्द व अशुध्द रूपे ठरविणे हे अतिशय कष्टाचे काम होते.

शब्द म्हणजे काही निर्जीव वस्तू नाहीत की ज्या कांद्यबटाट्याप्रमाणे सहज वेगवेगळया करता येतील आणि तेवढे केले की काम संपले, असे मानता येईल. एकेका शब्दामागे त्याचा इतिहास असतो, त्याचे अनेकांगी व्यक्तित्व असते आणि त्याचे अनेक अर्थ असतात. याच कारणामुळे प्रत्येक शब्दाची किती तरी रूपे असतात, त्याचे किती तरी अर्थ असतात आणि तो एकच शब्द

कित्येक वर्गांमध्ये बसविता येतो. शब्दांची वर्गवारी करण्याचे काम इतके अवघड असते की कितीही मोठा विद्वान असला तरी हे काम एकट्याने हाती घेण्याचे धाडस तो करू शकत नाही.

पण पाणिनीने मात्र एकट्यानेच हे काम हाती घेतले आणि ते पुरे करून दाखविले.

पाणिनीने जे पुस्तक तयार केले त्याला 'गणपाठ' म्हणतात. पाणिनीची ही अभिजात कृती आहे. यापूर्वी जगात या विषयाचे कोठेही नाव देखील नव्हते.

गणपाठाचा हेतू असा आहे की, परस्परांशी कोणत्याही बाबतीत सादृश्य असणाऱ्या सर्व शब्दांना एका 'गणा'त वा वर्गात घालण्यात यावे. त्यामुळे विखुरलेले शब्दभांडार सुसूत्रपणे बांधले जाते.

गणपाठ पुरे झाल्याने एक मोर्चा सर केल्यासारखे झाले. पण हा तर कामाचा केवळ प्रारंभ होता. जे शास्त्र तयार करण्यासाठी पाणिनीने हा खटाटोप केला होता त्याची सुरुवात अद्यापि व्हावयाची होती. पाणिनीने मन, बुध्दी व शरीर यांची सर्व शक्ती एकवटून व्याकरणशास्त्राची रचना केली.

या व्याकरणात आठ अध्याय आहेत. म्हणून यास 'अष्टाध्यायी' म्हणतात. शब्दांच्या रूपात थोडा फेरफार केल्याने किंवा दुसऱ्या एखाद्या शब्दाशी तो जोडल्याने शब्दाचा अर्थ कमीजास्त होतो किंवा अगदी बदलून जातो. अर्थ संक्षिप्त करण्याची, विस्तृत करण्याची वा परिवर्तित करण्याची शक्ती शब्दातच असते. या शक्तीस वृत्ती म्हणतात. पाणिनीने तध्दित आणि कृदंत यांचा सिध्दान्त सांगितला. या सिध्दान्ताने भाषाशास्त्रात एक अपूर्व क्रांती केली असे मानावयास हरकत नाही. आधुनिक भाषाशास्त्राची जननी हीच आहे. हिचा आधार घेऊन युरोपातील विद्वानांनी एका नव्या शास्त्राचा पाया घातला. 'वृत्ती' च्या महत्त्वामुळेच पाणिनीच्या शास्त्राला 'वृत्तिसूत्र' आणि पाणिनीला 'वृत्तज्ञ आचार्य' असेही म्हणतात.

शास्त्र-रचना पुरी झाल्यावर पाणिनी हिमालयातून खाली आला आणि पाटलीपुत्र नगरात गेला. तेथे त्या वेळी नंद राजा राज्य करीत होता. नंद राजाच्या दरबारात सर्व विषयांचे प्रगाढ पंडित हजर होते.शिवाय दर वर्षी सर्व देशातून आणखीही कित्येक विद्वानांना आमंत्रण देऊन बोलावण्यात येत असे. ही सर्व विद्वान मंडळी एकत्र जमत, त्यास सभा असे म्हणत असत. कोणत्याही विषयावर संशोधन करणारा विद्वान आपले संशोधन-कार्यही त्या सभेपुढे मांडीत असे. सभेतील अन्य पंडित मग त्या संशोधन करणाऱ्या पंडिताशी वादविवाद करीत असत. त्या वादविवादात सर्वांच्या शंकांचे समाधानकारक रीतीने निरसन करणाऱ्या पंडिताचे संशोधन मान्य करण्यात येऊन त्यास शास्त्रकार म्हणून मान मिळत असे. या सर्व प्रकारास 'सन्नयन' म्हणत असत. हा एक मोठा मान समजला जात असे. सन्नयनानंतर शास्त्रकारास पारितोषिक मिळत असे आणि त्याचे सर्व कर माफ करण्यात येत असत.

पाणिनीचे गुरू आचार्य वर्ष आणि त्यांचे भाऊ उपवर्ष या दोघांनी हे सन्नयन केलेले होते. पाणिनीचा सख्खा भाऊ पिंगल आणि व्याडि व वररुचि यांनीदेखील हा मान मिळविला होता.

पण सभेने पाणिनीच्या सन्नयनात आणि इतरांच्या सन्नयनात एक फरक केला होता. सभेने पाणिनीचे शास्त्र ज्याला नीट समजेल अशा सर्व विद्वानांना देखील प्रत्येकी सोन्याच्या एक हजार मोहोरांचे इनाम बांधून दिले व अशा तऱ्हेने पाणिनीच्या शास्त्राचे महत्त्व मान्य केले. हे इनाम मिळविणाऱ्यांना 'हारी' म्हणत. त्यांना हजार मोहोरांच्या बरोबरच एक हत्तीदेखील देण्यात येत असे.

खरे पाहता पाणिनीच्या तोलाचा शब्दशास्त्रज्ञ आणि अष्टाध्यायीचा विशालपणा, त्याची क्रमबध्दता व विराट कल्पना यांच्या तोलाचे व्याकरण अजून जगात तयार झालेले नाही. अष्टाध्यायीच्या आधाराने किंवा अष्टाध्यायी विषयी जितके ग्रंथ लिहिले गेले आहेत, तितके जगातील कोणत्याही ग्रंथाविषयी लिहिले गेलेले नाही.

संस्कृत भाषेला कठिण परिस्थितीच्या वेळी पाणिनीच्या या अष्टाध्यायीची खूपच मदत झाली. वैदिक भाषेचे युग संपुष्टात आलेले होते. नवे विषय, नवे

साहित्य, नवे शब्द निर्माण होत होते. गोदावरीच्या उत्तरेकडील संपूर्ण भारतात संस्कृत भाषा प्रचलित झालेली होती. सर्वत्र विखुरलेल्या या भाषेला नियमबध्द करण्याचे सारे प्रयत्न व्यर्थ ठरले होते. अशा वेळी 'अष्टाध्यायी' रचली गेल्यामुळे साहजिकच तिचा उदोउदो झाला. पाणिनी हे 'भगवान पाणिनी' म्हणून ओळखले जाऊ लागले.

पाणिनी इ० स० पूर्वी ४८०-४१० च्या सुमारास होऊन गेला असे मानतात.

पाणिनीच्या मृत्यूविषयी पंचतंत्रात म्हटले आहे की त्याला सिंहाने मारून टाकले.

# पुरु

शिकंदर हा ग्रीसचा मोठा विजयी वीर होता. ग्रीसहून निघून वाटेत अनेक देशांवर विजय मिळवीत तो भारतापर्यंत येऊन ठेपला होता. शिकंदरचे नाव उच्चारताच आपल्या डोळ्यांसमोर एका पराक्रमी भारतीय वीराचे नावही उभे राहाते. तो वीरयोध्दा होता राजा पोरस !

पोरसला पुरु देखील म्हणतात. आपला पराजय नक्की होणार हे माहीत असूनही त्याने त्या जगज्जेत्याशी चार हात केले. प्राणपणाने तो शिकंदरशी लढला पण आपापसात एकजूट नसल्यामुळे तो भारतमातेला परकीय दास्यापासून वाचवू शकला नाही. असे असले तरी त्या काळी त्याने जे शौर्य व धाडस दाखविले त्यामुळे इतिहासात त्याचे नाव चिरकाल राहील.

इसवी सनापूर्वी सहाव्या शतकापासून ते चंद्रगुप्त मौर्यापर्यंत वायव्येकडील सरहद्दीचा पंजाब, सिंध आणि त्यांच्यापुढील सारा प्रदेश हा अनेक लहान लहान व दुर्बल राज्यांमध्ये विभागलेला होता. प्रत्येक राजा स्वतंत्रपणे राज्य करू इच्छित होता. या राजांमध्ये वैमनस्य होते. सर्वत्र फितुरी, दुही, वैर व स्वार्थ माजला होता.

म्हणूनच शिकंदर ज्या वेळी एका पाठोपाठ एक देश जिंकून घेत भारताच्या सीमेपर्यंत येऊन ठेपला त्या वेळी विश्वासघातकी लोकांना चांगलीच संधी मिळाली आणि शिकंदरच्या आक्रमणामुळे त्यांना मनापासून आनंदच झाला. अशा लोकांमध्ये तक्षशिलेचा राजा आम्भी याचे नाव प्रथम घ्यावे लागेल. पुरु आणि अभिसारचा राजा यांच्यातील मैत्री त्याला सहन होत नव्हती. त्यास त्यांचा मत्सर वाटत होता. आणि म्हणूनच त्यांचा अपमान करण्यासाठी त्याने शिकंदरचे स्वागत केले. असे म्हणतात की शिकंदरने तक्षशिलेच्या त्या लोभी राजाला अडतीस लाख रुपये दिले आणि त्याच्याशी मैत्री केली. याच्या मोबदल्यात तक्षशिलेच्या राजाने शिकंदरला भारतावर आक्रमण करू दिले आणि वेळप्रसंगी मदत करण्याचे वचन दिले. या सर्व तडजोडीमागे तक्षशिलेच्या राजाचा एकच हेतू होता आणि तो म्हणजे पुरु राजाची मानहानी करणे.

शिकंदरने भारतावर आक्रमण केले. शिकंदरला भारतात येऊ देऊ नये हीच बहुतेक राजांची इच्छा होती. म्हणून ते सर्व त्याच्याशी लढले. पण ते वेगवेगळे लढले, मिळून नव्हे ! साहजिकच त्या विश्वविजयी वीराच्या, अनुभवी सेनेपुढे या लहान लहान राजांच्या सेनेचा कसा टिकाव लागणार ? एका मागोमाग एक सर्वांचा पराजय होत गेला. त्या वेळी तक्षशिलेचा आम्भी, पुष्कलावतीचा संजय, काबूलचा कोफायस, अश्वजित आणि शशिगुप्त यांनी शिकन्दरचे नुसते स्वागतच केले असे नव्हे तर त्याच्याशी लढणाऱ्या राजांचा पराभव झालेला पाहून त्यांना फार आनंद झाला.

पुरु राजा अतिशय शूर होता. आपली मातृभूमी परक्याच्या ताब्यात जावी हे त्याला सहन होत नव्हते. आपले सर्व शेजारी, आजूबाजूचे सर्व राजे आपल्या विरुध्द आहेत हे त्याला माहीत होते. इतकेच नव्हेतर त्याच्या मित्राने—अभिसारच्या राजाने सुध्दा त्यास गुपचुप भेटी पाठविल्या. पुरु राजा एकटा पडला. पण तरीदेखील तो आपल्या निश्चयापासून ढळला नाही. आणि शिकंदरशी चार हात करण्याच्या तयारीला तो लागला.

शिकंदर, झंजावातासारखा पुढेयेत होता. कपिशा आणि तक्षशिला यांच्या दरम्यान काही स्वातंत्र्यप्रिय लोकांनी त्याच्याशी लढा दिला. पण त्यांचा पराभव झाला. शिकंदर ज्या वेळी सिंधू नदीपाशी आला त्या वेळी आम्भी राजाने त्याच्या मदतीसाठी ७०० घोडेस्वार पाठविले आणि माझी राजधानी, तक्षशिला आपल्या हवाली करतो, असा त्याला निरोप पाठविला. सिंधू ओलांडून, शिकंदर तक्षशिलेत आला.

तेथे आम्भी राजाने शिकंदरचे व त्याच्या सेनेचे थाटाने स्वागत केले. आम्भीला तर पुरूची मानहानी करायची होती. तक्षशिलेत राहून शिकन्दरने पूर्वेकडील प्रदेशावर आक्रमण करण्याची पूर्ण तयारी केली. आम्भी राजाने त्यास सर्वतोपरी साहाय्य केले.

नंतर शिकंदरने तक्षशिलेहून पुरु राजाला कळविले 'येथे येऊन माझे मांडलिकत्व कबूल कर.' पुरु राजा फक्त शूरच होता असे नव्हे तर अतिशय स्वाभिमानी देखील होता. त्याने शिकंदरला उलट कळविले की, रणभूमीतच मी तुम्हाला भेटेन.

पुरूच्या या उत्तरामुळे शिकंदर रागाने लाल झाला. शिवाय आम्भीने त्याला चिथावणी दिली. मग काय विचारायलाच नको ! आगीत जणू काही तेल पडले. आपली सेना आणि आम्भीचे ५० हजार सैनिक घेऊन शिकंदर निघाला. झेलम नदीच्या पश्चिमेकडील काठावर त्याने तळ ठोकला: नदीच्या पूर्वेकडील तटावर पुरूच्या सेनेने तळ ठोकला. नदीला पूर आलेला होता आणि पावसामुळे झेलम नदी ओलांडणे सोपे काम नव्हते. पुरूच्या सेनेमध्ये ३० हजार पायदळ, ४ हजार घोडेस्वार, ३०० रथ आणि २०० हत्ती होते. त्याची इतकी विशाल सेना पाहून शिकंदरची सेना भेदरून गेली होती.

पावसामुळे नदी ओलांडण्यात धोका होता आणि तो धोका पत्करून नदी ओलांडून गेले तरी लगेच धुव्वा उडविण्यासाठी पुरूची सेना सज्ज होती. म्हणूनच कित्येक आठवडे कोणीही नदी ओलांडली नाही, पण एके रात्री, मुसळधार पाऊस कोसळत असताना आणि पुरूची सेना बेसावध असताना, आपले निवडक सैनिक बरोबर घेऊन शिकंदरने झेलम नदीच्या वरच्या अंगाने १७ मैलांवर नदी ओलांडली. शिकंदरची सेना आणि पुरूची सेना यांच्यामध्ये एक छोटीशी टेकडी होती. त्यामुळे शिकंदर नदी ओलांडून आल्याचे पुरूला कळले नाही. पण थोड्या वेळाने जेव्हा पुरूला वस्तुस्थिती समजली तेव्हा त्याने आपल्या मुलाला २ हजार घोडेस्वार आणि १२० रथ बरोबर देऊन शिकंदरला अडविण्यासाठी पाठविले. पण बराच उशीर झालेला होता. शिकंदरची सर्व सेना नदी ओलांडून आली होती.

त्या वेळी झालेल्या चकमकीत पुरूचा मुलगा मारला गेला. याशिवाय ४०० सैनिक ठार झाले. पुरूला हे कळताच आपली बहुतेक सेना बरोबर घेऊन तो लढण्यासाठी निघाला. त्याचा आपल्या हत्तींवर फार विश्वास होता. म्हणून त्याने सर्वात पुढे हत्ती उभे केले आणि हत्तींच्या मागे पायदळ जय्यत ठेवले. या सैनिकांजवळ मोठमोठाले धनुष्य होते आणि त्यांनी दूरवर बाण फेकता येत असत. पायदळाच्या दोन्ही अंगांना घोडेस्वार होते आणि त्यांच्यापुढे रथ होते.

समोरून शिकंदर वेगाने चाल करून येत होता. पुरूच्या सेनेची व्यूहरचना पाहून तो थबकला. त्याचे पायदळ मागे राहिले होते. थोडा वेळ विश्रांती घेऊन

शिकंदर स्वतः हल्ला करण्याच्या तयारीला लागला. पुरूचे हत्ती निकामी करण्याची त्याची इच्छा होती. म्हणून त्याने स्वतः पुरूच्या डाव्या बाजूकडील तुकडीवर हल्ला करण्याचे आणि घोडेस्वारांच्या मदतीने पुरूच्या सेनेवर मागच्या बाजूने हल्ला करण्याचे ठरविले.

ठरविल्याप्रमाणे जेव्हा शिकंदरने हल्ला केला तेव्हा पुरूच्या घोडेस्वारांवर दोन्ही बाजूंनी मारा होऊ लागला. त्यामुळे त्याच्या सेनेत गोंधळ उडाला. शिकंदरने जारोत हल्ला केला तेव्हा बचावासाठी भारतीय सेना हत्तींच्या आड जमली. हत्तींनी शिकंदरची सेना पायांखाली तुडविण्यास सुरूवात केली. पण शिकंदरने आणखी जोराचा हल्ला चढविला त्यामुळे पुरूच्या सेनेचे हातपाय गळाले. पुरूची सेना मागे हटू लागली. मागे नदी होती. त्यामुळे हत्तींवर चारही बाजूंनीं मारा होऊ लागला. ते आटोक्या बाहेर गेले व त्यांनी येईल त्याला तुडविण्यास सुरूवात केली. पुरूचे सैनिक त्याच्याच हत्तींच्या पायाखाली तुडविले गेले. तरीही पुरु शौर्याने लढतच राहिला. त्याने माघार घेतली नाही. त्याच वेळी त्याला. समोरून आम्भी राजा येताना दिसला. त्याला पाहताच अनावर क्रोधाने पुरूने त्याच्यावर वार केला. पण त्यातून तो वाचला व पळून गेला.

या वेळेपावेतो पुरूची सर्व सेना विस्कळति झाली होती. पण पुरूने धीर सोडला नाही. शिकंदर देखील त्याचे शौर्य व रणकौशल्य पाहून थक्क झाला. त्याने पुरूला शस्त्रे खाली टाकण्याचा निरोप धाडला. पण पुरू स्वाभिमानी होता. त्याने काही एक ऐकले नाही आणि तो लढत राहिला. अखेर शिकंदरने पुरूच ा एका जुन्या मित्राला त्याच्याकडे पाठविले. पुरू तहानेने व्याकुळ झालेला होता आणि अगदी थकून गेल्यामुळे त्याच्यात त्राण राहिले नव्हते. हत्तीवरून खाली उतरून त्याने पाण्याचा एक घोट घेतला आणि मग तो शिकंदरला भेटण्यास निघाला. पुरुचे भारदस्त व्यक्तिमत्व पाहून शिकंदरला त्याच्याबद्दल फार आदर वाटला. शिकंदरने मोठ्या औदार्याने त्याला विचारले—'पुरू, तुझ्याशी मी कसे वागावे ?"

पुरूने अभिमानाने उत्तर दिले—'एक राजा दुसऱ्या राजाशी जसा वागतो तसेच तुम्ही माझ्याशी वागावे."

पुरूचे हे उत्तर शिकंदरला अतिशय आवडले. तो स्वतः शूर वीर होता. आणि वीराची गुणग्राहकता त्याच्यापाशी होती. त्याने पुरूला त्याचे राज्य परत देऊन त्याच्याशी मैत्री केली.

परकीय आक्रमणाला प्राणपणाने थोपविण्याचा प्रयत्न केलेल्या शूर वीराची ही कथा आहे. पुरूच्या सेनेशी लढून शिकंदरच्या सेनेला उमजले की, भारतीय फौजांशी लढाई करणे म्हणजे काही खेळ नव्हे. भारतीयांशी झालेल्या सर्व लढायांचा परिणाम हाच झाला की भारत जिंकण्याचा विचार सोडून देऊन, शिकंदरला माघारी जावे लागले.

# चाणक्य

इसवी सनापूर्वी ४०० च्या सुमारास भारतात चाणक्य नावाच्या एका थोर पुरुषाचा जन्म झाला. आपल्या असामान्य बुध्दिमत्तेने त्याने ग्रीक लोकांना भारताबाहेर घालवून दिले. त्याचबरोबर लहान लहान राज्ये एकत्र जमवून विशाल भारतीय साम्राज्याचा पाया त्याने घातला. राजनीतीचे सर्व बारकावे व डावपेच त्यास माहीत होते आणि कूटनीतीमध्ये तर त्याचा हात धरणारा दुसरा कोणीही नव्हता. चाणक्याच्या डावपेचामुळे नंद राजाचा वध करून चन्द्रगुप्त मौर्यास राज्य मिळविता आले. इतकेच नव्हे तर चाणक्याच्या मदतीमुळेच सर्व शत्रूंचा विनाश करून विशाल मौर्य साम्राज्य स्थापन करण्यात त्याला यश मिळाले. 'आणखी एका गोष्टीसाठी चाणक्य प्रसिध्द आहे. ती म्हणजे त्याने लिहिलेले अर्थशास्त्र' या ग्रंथामुळे तत्कालीन भारताच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीची माहिती मिळते. याशिवाय या ग्रंथात राज्य व्यवस्थेसंबंधी बहुमोल सूचना दिलेल्या आहेत, आणि आजही त्या अद्वितीय मानल्या जातात. अर्थशास्त्र वाचून, ते रचणारा किती विद्वान, खोलवर विचार करणारा आणि दूरदर्शी होता हे कळते. राज्यव्यवस्थेच्या बाबतीत चाणक्य किती हुशार व चतुर होता याचा 'अर्थशास्त्रा'त जो पुरावा मिळतो, त्यामुळे जगातील थोर राजनीतिज्ञ व कूटनीतिज्ञ यांच्या पंक्तीत बरेच वरचे स्थान देण्याला तो किती योग्य होता ते कळते.

चाणक्याच्या पूर्वायुष्याविषयी अनेक दंतकथा प्रचलित आहेत. त्यातील एक दंतकथा अशी आहे. एकदा चाणक्याची आई त्याला पाहताच रडू लागली. आईला अश्रू ढाळताना बघून आश्चर्याने चाणक्याने आईला विचारले—"आई, मला बघताच तू अशी एकाएकी रडू का लागलीस ?"

चाणक्याच्या आईने उत्तर दिले—"बाळ, मोठा राजा होण्याचे तुझ्या नशिबी आहे. तू राजा झालास म्हणजे मग आपल्या आईला नक्कीच विसरशील, हा विचार मनात येऊन मला रडू आले."

चाणक्याला आणखीनच आश्चर्य वाटले. त्याने विचारले, "पण मी राजा होणार आहे ते तुला कसे कळले ?"

आईने सांगितले, "तुझ्या समोरच्या दोन दातावरून असे दिसते की, तू राजा होणार आहेस."

चाणक्याला आपल्या आईच्या दुःखाचे कारण उमजले. घराबाहेर जाऊन त्याने एक वीट उचलली आणि आपले समोरचे दोन दात पाडून टाकले. नंतर आत येऊन आईला म्हटले—"बघ आई, मी ते दात पाडून टाकले. मला राज्य मिळेल असे दर्शविणारे ते दातच जर राहिले नाहीत तर मी राजा कसा होईन ? तू काही काळजी करू नकोस. आता मी काही राजा होणार नाही आणि तुला सोडून कधीही जाणार नाही. तुझ्या मायेपुढे जगतील सर्व गोष्टी मला तुच्छ आहेत."

या दंतकथेवरून चाणक्याचे अंतःकरण किती कोमल होते ते कळते. पण याच्या जोडीलाच त्याच्या स्वभावाची दुसरीही एक बाजू होती. त्याला अपमान सहन होत नसे. तसेच देशावर कोणतेही संकट आल्यास त्याला स्वस्थ बसवत नसे. दृढ निश्चय आणि असामान्य बुध्दिमत्ता ही चाणक्याची प्रमुख वैशिष्ट्ये होती.

त्याचा निश्चयी स्वभाव दाखविणारी आणखी एक दंतकथा प्रचलित आहे. एके दिवशी चाणक्य कोठे तरी जात असताना वाटेत कुश नावाचे गवत त्याच्या पायाला टोचले. त्यामुळे पायाला जखम झाली आणि त्याला फार त्रास झाला. त्यामुळे चाणक्याला राग आला. त्याच जागी त्याने अशी प्रतिज्ञा केली की, जोपर्यंत सारे कुश गवत मुळापासून उपटून काढणार नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही. झाले ! तेथेच बसून एकेक रोप उपटून काढीत तो प्रत्येक रोपाच्या मुळाशी ते पुन्हा उगवू नये म्हणून ताक घालू लागला.

ही दंतकथा खरी असो वा नसो. पण चाणक्याचा राग अनावर आणि भयंकर होता यात काही शंका नाही. एखादे काम करावयाचे ठरविले की मग वाटेल ते झाले तरी ते तडीस न्यायचेच असा त्याचा स्वभाव होता.

चाणक्य हा तक्षशिलेचा एक विद्वान ब्राह्मण होता. त्या वेळी तक्षशिला हे सर्व विद्यांचे केंद्र होते. तक्षशिलेप्रमाणेच मगधची राजधानी पाटलीपुत्र ही देखील त्या वेळी शिक्षणाचे माहेरघर म्हणून प्रसिध्द होती. तक्षशिलेत अध्ययन पुरे झाल्यावर चाणक्य पुढील अध्ययनासाठी पाटलीपुत्र नगरीत आला.

त्या वेळी मगधच्या गादीवर धननंद उर्फ नंद राज्य करीत होता. तो जातीने शूद्र होता. तो अतिशय लोभी होता आणि प्रजेवर नानातऱ्हेचे कर लादून त्याने आपला खजिना भरला होता. पण चाणक्य ज्या वेळी पाटलीपुत्र नगरीत पोहोचला त्या वेळी धननंदाच्या स्वभावात खूपच बदल घडून आलेला होता. पाण्यासारखा पैसा खर्च करून तो दान करीत होता. त्यासाठी त्याने एक दानशाला उघडली होती आणि त्या दानशालेच्या व्यवस्थेसाठी एक समिती नेमली होती. त्या समितीचा अध्यक्ष ब्राह्मणच राहात असे, आणि या अध्यक्षाला कोणालाही एक कोटीपर्यंत मुद्रा दान देण्याचा हक्क असे.

आपल्या विद्वत्तेमुळे चाणक्य पाटलीपुत्र नगरीत लवकरच विख्यात झाला. आणि दानशाळेच्या व्यवस्थापक समितीचा अध्यक्ष म्हणून त्याची नेमणूक करण्यात आली.

चाणक्य हुशार आणि विद्वान होता पण दिसायला अगदीच कुरूप आणि रंगाने काळा होता. एके दिवशी धननंदाने त्याला आपल्या दरबारात बोलावले. धननंदाने यापूर्वी कधीही चाणक्याला पाहिले नव्हते. त्याचा कुरूप चेहरा बघताच धननंदाला राग आला आणि त्याने चाणक्याला दरबारातून हाकलून दिले.

चाणक्याला हा अपमान कसा सहन होणार ? त्यालाही भयंकर राग आला. रागाने थरथरत त्याने आपली शेंडी सोडली आणि राजाकडे तोंड करून म्हणाला—"नीचा, आज तू भर दरबारात माझा अपमान केलास याचा सूड मी घेईन. तुझा आणि तुझ्या वंशाचा विध्वंस करून मगधच्या सिंहासनावर अन्य उच्चकुलीन व्यक्तीला बसवीन. व जोपर्यंत ही प्रतिज्ञा पुरी करणार नाही तोपर्यंत माझी शेंडी बांधणार नाही."

इतके बोलून रागारागात दरबार सोडून चाणक्य निघून गेला. तो पाटलीपुत्राहून जात असताना अचानक चन्द्रगुप्ताशी त्याची गाठ पडली. हाच चन्द्रगुप्त नंतर चन्द्रगुप्त मौर्य या नावाने प्रसिध्दी पावला.

चन्द्रगुप्ताला पाहून चाणक्याच्या मनात आले की खरोखरीच हा राजा होण्यास योग्य आहे. चक्रवर्ती राजाची सर्व लक्षणे याच्यात आहेत. त्याला

बरोबर घेऊन चाणक्य तक्षशिलेला निघून गेला. याच ठिकाणी त्याने चन्द्रगुप्ताला ७-८ वर्षे शस्त्र व शास्त्र यांचे शिक्षण दिले. आणि आपल्या देखरेखीखाली त्याला सर्व विद्यांमध्ये पारंगत केले. नंतर चाणक्याने चन्द्रगुप्ताकडूनच नंद वंशाचा विध्वंस करविला.

ज्या वेळी तक्षशिलेत चाणक्याजवळ राहून चन्द्रगुप्त शस्त्र व शास्त्र यांचे अध्ययन करीत होता त्याच वेळी मॅसेडोनियाचा राजा शिकन्दर याने भारतावर हल्ला केला होता. इसवी सनापूर्वी ३२७ च्या सुमारास ही घटना घडली. शिकन्दरने संपूर्ण ग्रीस ताब्यात घेतला होता. आणि त्याची सेना इराणच्या विशाल साम्राज्याला तुडवीत भारतापर्यंत येऊन ठेपली होती. अवघे जग जिंकण्याची स्वप्ने शिकन्दरला पडत होती.

शिकन्दरच्या आक्रमणांच्या वेळी पश्चिम भारतामध्ये सिंधू नदीच्या खोऱ्यात आणि पंजाबमध्ये अनेक लहान लहान राज्ये होती. ग्रीसच्या प्रबळ आणि सुसंघटित सेनेसमोर ही राज्ये टिकाव धरू शकली नाहीत. काही राजांनी मोठ्या पराक्रमाने शिकन्दरशी लढा दिला. त्या सर्वांमध्ये पुरू राजाचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. शिकन्दरच्या आक्रमणाचा प्रतिकार त्याने कसा केला ते मागे सांगितले आहेच. ती कथा भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात चिरस्मरणीय ठरली आहे. इतर राजांप्रमाणेच पुरूचा देखील पराभव झाला असला तरी शिकन्दरला व त्याच्या ग्रीक सेनेला हे कळून चुकले की भारतीय सेनेशी लढाई करणे म्हणजे सोपे काम नाही. बियास नदी ओलांडून पुढे सरकण्याचे धाडस काही त्याला झाले नाही आणि जिंकलेल्या प्रदेशाच्या व्यवस्थेसाठी आपले सरदार नेमून तो माघारी निघून गेला.

आपापसातील दुहीमुळे भारताच्या पश्चिमेकडील भागावर ग्रीकांनी आपला अंमल कसा बसविला ते चाणक्य आणि चन्द्रगुप्त दोघांनी पाहिले. शिकन्दर निघून गेल्यानंतर त्याच्या ताब्यात गेलेला भारताचा प्रदेश सोडविण्याचे चाणक्याने ठरविले. चाणक्याला परकीय शासन अतिशय अनिष्ट वाटत होते. म्हणून चन्द्रगुप्ताच्या नेतृत्वाखाली त्याने पंजाबमध्ये सेना जमविली आणि चन्द्रगुप्ताकडे त्या सेनेचे सेनापतीपद दिले. चन्द्रगुप्ताला अधिक

सामर्थ्यशाली करण्यासाठी चाणक्याने पंजाबमधील डोंगराळ प्रदेशाच्या काही राजांचे देखील साहाय्य घेतले.

चाणक्याची बुध्दिमत्ता आणि चन्द्रगुप्ताचे युध्दकौशल्य, या दोन्ही गोष्टी एकत्र आल्यामुळे शिकन्दरच्या आक्रमणापासून तीन वर्षांच्या आतच ग्रीकांची भारतातून हकालपट्टी झाली आणि भारतात परकीय सत्तेचे नावदेखील राहिले नाही. त्यानंतर चाणक्याने मगधकडे लक्ष दिले. आपली प्रतिज्ञा तो विसरला नव्हता. नंद वंशाचा विध्वंस करून चन्द्रगुप्तास गादीवर बसविण्याच्या उद्योगाला तो लागला.

नंदाविरुध्द चाणक्याने कसे डावपेच रचले आणि ते सर्व कसे यशस्वी करून दाखविले ही एक फार मोठी कथा आहे. विशाखदत्ताने लिहिलेल्या 'मुद्राराक्षस' नाटकात ही कथा सविस्तर दिली आहे. कूटनीतीचे सर्व डावपेच लढवून नंद वंशाचा नाश करण्याची आपली प्रतिज्ञा चाणक्याने पुरी केली. त्याने चन्द्रगुप्ताला गादीवर बसविले. इतकेच नव्हे तर मगधच्या साम्राज्याचा विस्तार करण्याच्या कामी देखील चन्द्रगुप्तास नेहमी साहाय्य केले.

चाणक्य विरक्त होता. तो कधीही महालात राहिला नाही. चन्द्रगुप्तासारख्या सत्ताधीश सम्राटाचा प्रधान असतानादेखील तो झोपडीतच राहात असे. साधे अन्न खात असे आणि साधीच वस्त्रे नेसत असे. संपूर्ण साम्राज्यावर त्याचा अधिकार होता. स्वतः चन्द्रगुप्त त्याच्यासमोर नम्रतेने उभा राहात असे.

चाणक्याच्या वेळी भारतात दोन प्रकारची राज्यव्यवस्था होती—राजतंत्र आणि गणतंत्र. त्या वेळी भारतात ज्या राज्यांत गणतंत्र होते त्यांचा कारभार हल्लीच्या लोकशाही पध्दतीप्रमाणे लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडून चालवला जात नसे, तर विशिष्ट वंशातील लोकांच्या प्रतिनिधींकडून चालवला जात असे. या लहान लहान गणतंत्र राज्यांपेक्षा राजाच्या अधिकारातील राज्यव्यवस्था म्हणजेच राजतंत्र हे अधिक चांगले असते, असे चाणक्याचे मत होते. म्हणूनच त्या काळी असलेली लहान लहान गणतंत्र

राज्ये विलीन करून एक विशाल साम्राज्य स्थापन करण्याला त्याने संमती दिली होती.

प्रजेच्या कल्याणाची सदैव काळजी घेणे हे राजाचे ध्येय असले पाहिजे आणि जो राजा प्रजेच्या हितापुढे स्वतःच्या सुखाची पर्वा करीत नाही तोच राजा श्रेष्ठ होय, असे त्यास वाटत असे. 'अर्थशास्त्रा'त त्याने याच गोष्टीवर भर दिलेला आहे. प्रजेच्या सुखातच राजाचे सुख आहे, प्रजेच्या कल्याणातच राजाचे कल्याण आहे, राजाने आपल्या सुखाची काळजी करू नये, प्रजा सुखी राहाण्यातच त्याचे स्वतःचे हित आहे असे त्याचे म्हणणे होते. त्याने लिहिले आहे की, राजाच्या आज्ञेसमोर वेद, धर्मशास्त्र यांच्या आज्ञादेखील तुच्छ आहेत. राजधर्म, मंत्रिमंडळ, राज्यव्यवस्था, राज्याची अर्थव्यवस्था, न्याय, परदेशांविषयीची नीती इत्यादि विषयांवर चाणक्याने 'अर्थशास्त्रा'त आपले विचार सविस्तर मांडले आहेत. त्या सर्वांची या ठिकाणी चर्चा करणे आवश्यक नाही. या ठिकाणी एवढेच पुन्हा सांगितले म्हणजे पुरे की प्रजेच्या कल्याणातच राजाचे कल्याण आहे, प्रजा सुखी असेल तरच राजा सुखी होईल. घटस्फोट आणि विधवा-विवाह या धर्माने मान्य केलेल्या प्रथा आहेत असे चाणक्याचे मत होते. त्याने या प्रथांचे समर्थन केले आहे.

याच चाणक्याचे स्मारक म्हणून नव्या दिल्लीत चाणक्यपुरी नावाची एक वस्ती आहे. या चाणक्यपुरीत परदेशांचे भारतातील राजनैतिक प्रतिनिधी राहातात. ज्या वस्तीत जगातील सर्व देशांचे राजनैतिक प्रतिनिधी राहातात त्या वस्तीला चाणक्यपुरी हेच नाव अगदी योग्य नाही का?

# चन्द्रगुप्त मौर्य

महावीर आणि बुध्द होऊन गेले त्या वेळी भारतात लहान लहान राज्ये होती. ही राज्ये आपापसात लढत असत. या सर्व राज्यांना एकत्र करून एक विशाल साम्राज्य स्थापन करू शकेल असा पराक्रमी राजा कित्येक वर्षे झाला नव्हता. ज्या राजाने हे कार्य केले त्याचे नाव होते—चन्द्रगुप्त मौर्य.

भारतात प्रथमच इतके मोठे साम्राज्य स्थापन केल्यामुळे चन्द्रगुप्त मौर्य ऐतिहासिक काळांतील भारतातील पहिला सम्राट मानला जातो. चन्द्रगुप्ता-नंतरच भारताचा इतिहास सुसूत्रपणे हाती लागतो.

या वेळी उत्तर भारत आणि दक्षिण भारताचा काही भाग हे प्रथमच एका संघटित आणि शक्तिशाली साम्राज्याचे भाग बनले. त्या काळची कथा हीच चन्द्रगुप्त मौर्याच्या जीवनाची कथा आहे. त्याचे जीवनचरित्र म्हणजे भारताच्या राजनैतिक, आर्थिक, व सांस्कृतिक एकतेची कहाणी आहे.

चन्द्रगुप्त हा मौर्यवंशी क्षत्रिय होता. बुध्दाने जन्म घेतलेल्या शाक्य कुलाचीच मौर्य क्षत्रिय ही एक शाखा होती. चन्द्रगुप्ताचे वडील या क्षत्रियांचे सरदार होते. असे म्हणतात की चन्द्रगुप्ताच्या जन्माच्या काही दिवस अगोदरच त्याचे वडील एका लढाईत मारले गेले आणि चन्द्रगुप्ताच्या आईला कोणाचाही आधार राहिला नाही.

दुसरा कोणताही उपाय राहिला नाही तेव्हा चन्द्रगुप्ताचा मामा आपल्या बहिणीला मगधची राजधानी पाटलीपुत्र येथे घेऊन गेला. याच ठिकाणी चन्द्रगुप्ताचा जन्म झाला. त्याच्या आईला तर दोन वेळचे जेवण मिळायची मारामार होती. त्यात भरीला मुलाचा जन्म झाला. त्या वेळी चन्द्रगुप्ताच्या मामाने बहिणीला सुचविले की, या अडचणीतून बाहेर पडायचा एक मार्ग आहे. तो म्हणजे या मुलाला आपण एखाद्या सुखवस्तू माणसाच्या दारी गुपचूप ठेऊन येऊ म्हणजे आपली काळजी दूर होईल. अनाथ मूल पाहून कोणीही दयेने याचे पालनपोषण करील. आणि मूल, निदान उपासमार होऊन मरणार नाही.

चन्द्रगुप्ताच्या आईला भावाचा हा सल्ला पटला. आणि ती चन्द्रगुप्ताला गाईंच्या गोठ्यात गुपचूप ठेऊन आली. सुदैवाने त्या गोठ्याचा मालक एक दयाळू गवळी होता. गोठ्यात पडलेले मूल पाहून त्याला दया आली. तो मुलाला आपल्या घरी घेऊन आला आणि आपल्या पोटच्या मुलाप्रमाणे त्याचे पालनपोषण करू लागला. चन्द्रगुप्त थोडा मोठा झाल्यावर त्याने चन्द्रगुप्तास एका शिकाऱ्याला विकून टाकले. शिकाऱ्याने चन्द्रगुप्ताला आपली गुरे चारायचे काम दिले.

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात. त्याप्रमाणे लहानपणापासूनच चन्द्रगुप्तात पुढाऱ्याचे गुण दिसून येऊ लागले. तो इतर मुलांबरोबरच गुरे चारावयास गावाबाहेर जात असे. गुरे चरण्यासाठी सोडून सर्व मुले त्या ठिकाणी राजा व प्रजा हा खेळ खेळू लागत. या खेळात चन्द्रगुप्त राजा होऊन एका उंच दगडावर बसत असे आणि बाकीची मुले दरबारी होऊन त्याच्या आजूबाजूस बसत असत. मग दोन मुले आपल्या भांडणाचा न्याय मागण्यासाठी त्याच्या समोर येत. चन्द्रगुप्त त्यांचे सर्व म्हणणे नीट ऐकून मोठ्या गंभीरतेने न्याय करीत असे. मुलांचा हा खेळ पाहून गावकऱ्यांनाही गंमत वाटत असे. त्यांना काय ठाऊक की राजाचे सोंग घेणारा हा मुलगा एक दिवस खरोखरच भारताचा राजा होणार आहे ?

तसे पाहिल्यास चन्द्रगुप्त कदाचित जन्मभर गुरे चारीतच राहिला असता. पण त्याच्या नशिबी वेगळेच काही लिहिलेले होते. एकदा तो आपल्या मित्रांबरोबर नेहमीचा राजा व प्रजा यांचा खेळ खेळत असताना तेथून जाणाऱ्या चाणक्याने त्याला पाहिले. मुलांचा खेळ पाहून तो थोडा वेळ तेथेच थांबला. त्याच्या चाणाक्ष दृष्टीने क्षणातच चन्द्रगुप्ताचे गुण व त्याची योग्यता नेमकी हेरली आणि खेळ संपल्यावर त्याने चन्द्रगुप्ताला जवळ बोलावून त्याची विचारपूस केली. त्यानंतर चन्द्रगुप्ताला बरोबर घेऊन तो त्याच्या मालकाकडे—शिकाऱ्याकडे गेला. त्या शिकाऱ्याला एक हजार कार्षापण (त्या वेळी प्रचलित असलेले नाणे) देऊन चाणक्याने चन्द्रगुप्ताला खरेदी केले आणि त्याला आपल्या बरोबर घेऊन तो पाटलीपुत्राहून तक्षशिलेला गेला. याच जागी चन्द्रगुप्ताचे

नशीब उदयास आले. तक्षशिलेत चाणक्याने आपल्या स्वतःच्या देखरेखीखाली सात-आठ वर्षे चन्द्रगुप्ताला शस्त्रविद्या आणि युध्दकला शिकविली. जोडीला सर्व शास्त्रे देखील शिकविली.

चाणक्य आणि चन्द्रगुप्त यांच्या भेटीने केवळ त्या दोघांच्या जीवनालाच नव्हे तर भारताच्या इतिहासाला नवे वळण लागले. या घटनेचे महत्त्व नीट समजण्यासाठी त्या वेळेची भारताची एकूण परिस्थिती थोडक्यात समजून घेणे आवश्यक आहे. चन्द्रगुप्त तक्षशिलेत चाणक्याजवळ अध्ययन करीत होता त्याच सुमारास शिकन्दरने भारतावर आक्रमण केले होते. शिकन्दरच्या आक्रमणाच्या वेळी भारताचा पश्चिम विभाग लहान लहान राज्यांमध्ये विभागलेला होता.

शिकन्दरच्या आक्रमणाच्या वेळी चाणक्य व चन्द्रगुप्त दोघेही तक्षशिलेत होते. भारतीय राजांची आपापसातील दुही आणि दौर्बल्य यांचा फायदा घेऊन परकीय आक्रमकाने पश्चिम भारत कसा जिंकून घेतला ते दोघांनी पाहिले. ग्रीकांनी भारतीयांचा केलेला पराभव दोघांना काट्याप्रमाणे सलत होता. शिकन्दर भारतात होता तोपर्यंत दोघेही स्वस्थ राहिले. पण शिकन्दरने पाठ फिरवताच दोघेही परकीय सत्तेपासून देशास मुक्त करण्याच्या आणि परकीय सत्तेची उचलबांगडी करण्याचा नेटाने प्रयत्न करू लागले.

चन्द्रगुप्त अतिशय शूर आणि धाडसी होता. चाणक्याजवळ राहून त्याने युध्दनीतीचा विशेष अभ्यास केला होता. इतकेच नव्हे तर शिकन्दरसारख्या रणधुरंधराच्या युध्दनीतीचेही निरीक्षण केले होते. भारतीय व ग्रीक सेना यांची जी युध्दे झाली त्यावरून त्यास ग्रीकांच्या युध्दकलेची वैशिष्टये आणि भारतीयांच्या युध्दतंत्रातील उणीवा कळून आल्या. या सर्वांपासून जो धडा मिळाला त्याचा त्याने संधी मिळताच पुरेपूर उपयोग करून घेतला.

ग्रीकांना भारतातून घालवून देण्याची एक योजना चाणक्याने आखली आणि ती योजना पुरी करण्याची सर्व जबाबदारी त्याने चन्द्रगुप्तावर टाकली. त्यासाठी एक मोठी सेना असणे जरूरीचे होते. शिकन्दरच्या विजयामुळे

भारतीयांचे हातपाय गळाले होते. म्हणून ग्रीकांशी लढण्याकरिता सेना जमविणे हे देखील एक अत्यंत कठिण काम होते. सामान्य व्यक्तीला हे काम करणे अशक्य होते. पण चाणक्य व चन्द्रगुप्त असामान्य व्यक्ती होत्या.

दोघांनी हिंडून फिरून पंजाबच्या जनतेमध्ये परकीय सत्तेविषयी द्वेष निर्माण केला. हळहळू चन्द्रगुप्ताला आपल्या सेनेसाठी सैनिक मिळू लागले. पंजाबमध्ये लढवय्ये वीर खूप होते. फक्त नेत्याची उणीव होती. त्यांना चाणक्यासारखा अलौकिक बुध्दिमान मार्गदर्शक आणि चन्द्रगुप्तासारखा सेनापती मिळताच त्यांच्यात नवचैतन्य सळसळू लागले.

चन्द्रगुप्ताने सैन्यात दाखल होणाऱ्या प्रत्येक तरुणास युध्दविद्येचे शिक्षण देऊन त्याला उत्तम सैनिक बनविले. त्यानंतर त्याने ग्रीकांविरुध्द उघड लढाई पुकारली. तिचा परिणाम असा झाला की शिकन्दर निघून गेल्यापासून तीन वर्षांच्या आतच ग्रीकांची भारतातून हकालपट्टी झाली आणि परकीय सत्तेचे नावदेखील राहिले नाही.

पश्चिम भारताला परकीय सत्तेपासून मुक्त करून चन्द्रगुप्त मगधकडे वळला. मगधवर हल्ला करण्यापूर्वी बराच विचार करावयास हवा होता. मगधचा राजा सामर्थ्यशाली होता आणि त्याच्याजवळ विशाल सेना होती. आपली सेना मगधच्या सेनेस जिंकण्यासाठी पुरेशी नाही असे चन्द्रगुप्ताला वाटत होते, पण दोन गोष्टी त्यास अनुकूल होत्या. एक तर चाणक्यासारख्या कुशल आणि कुशाग्र बुध्दीच्या कूटनीतीज्ञाचे मार्गदर्शन त्यास लाभले होते. आणि दुसरे म्हणजे मगधचा राजा धननंद आपल्या प्रजेत फार अप्रिय होता. त्याची प्रजा फार असंतुष्ट होती.

चन्द्रगुप्ताला मगध जिंकण्याच्या कामी स्वतःच्या सेनेपासून जितकी मदत मिळाली त्याहून अधिक मदत चाणक्याच्या कूटनीतीपासून मिळाली. मगधची सेना फारच मोठी होती. तिच्यात २ लक्ष पायदळ, २० हजार घोडेस्वार, चार घोड्यांचे २ हजार रथ आणि ३ हजार हत्ती होते. इतक्या मोठ्या फौजेशी समोरासमोर लढून विजय मिळविणे कठिणच नव्हे तर अशक्य होते.

पण राजाचे खरे सामर्थ्य प्रजा संतुष्ट राहाण्यात असते. एकीकडे नंद राजाची प्रजा त्याच्यावर फार नाखूष होती व दुसरीकडे आपल्या कूटनीतीने चाणक्याने नन्दाच्या कित्येक अधिकाऱ्यांना आपल्या बाजूला वळवून घेतले होते. चन्द्रगुप्ताने मगधच्या सेनेचा युध्दात पराजय केला आणि मगध जिंकून घेतला. पंजाब तर त्याने यापूर्वीच जिंकला होता.

मगध, पंजाब व सीमेकडील प्रदेश यांच्यावर ताबा मिळवून चन्द्रगुप्त इतर भागांकडे वळला. हे सर्व काम त्याने केवळ साम्राज्य-लालसेने केले नाही तर देशात लहान लहान राज्ये राहिल्यास त्यांच्यात फूट पडेल व परकीय आक्रमक त्याचा फायदा घेतील असे त्यास वाटले. म्हणून सर्वांना एका सूत्रात गुंफण्यासाठी त्याने हे कार्य हाती घेतले. आपापसातील दुफळीमुळे काय घडते हे त्याने पंजाब आणि सीमाप्रान्तामध्ये पाहिले होते. सर्वांनी एकत्र जमून जर शिकन्दरचा प्रतिकार केला असता तर मान खाली घालण्याचा प्रसंग कदाचित त्यांच्यावर आला नसता. पण आपसातील दुहीमुळे त्यांचा पराभव झाला.

चन्द्रगुप्ताने सहा लक्ष सैनिकांची एक मोठी सेना जमविली आणि तो विजययात्रेला निघाला. ज्या राजांनी त्यास प्रतिकार केला त्या सर्वांचा पराजय झाला.

शिकन्दरच्या मृत्यूनंतर त्याच्या सेनापतींमध्ये तंटेबखेडे सुरू झाले. त्यामध्ये अखेर सेल्यूकस नावाचा सेनापती विजयी झाला. शिकन्दरने जिंकलेल्या परंतु नंतर चन्द्रगुप्ताने मिळविलेल्या भारतीय प्रदेशांवर ताबा मिळविण्याचे त्याने ठरविले. विशाल सेना घेऊन तो चालून आला. पण यावेळी आम्भी-सारख्या फितुरांशी नव्हे तर चन्द्रगुप्ताच्या हाताखाली संघटित झालेल्या भारताशी त्याची गाठ होती. चन्द्रगुप्ताने सेल्यूकसचा पराभव केला. सेल्यूकसने चन्द्रगुप्ताशी तह केला आणि आपली मुलगी त्याला दिली. हिरात, कंदहार, काबूलचे खोरे आणि बलुचिस्तान हे प्रदेश त्याने चन्द्रगुप्ताला दिले. इतकेच नव्हे तर मेगॅस्थेनिस नावाचा आपला वकील त्याने चन्द्रगुप्ताच्या दरबारी पाठविला. परतभेट म्हणून चन्द्रगुप्ताने सेल्यूकसला ५०० हत्ती दिले.

अशा प्रकारे हळूहळू चन्द्रगुप्ताच्या साम्राज्याचा विस्तार पूर्वेकडे बंगालपासून पश्चिमेकडे हिंदुकुश पर्वतापर्यंत आणि उत्तरेतील हिमालयापासून नर्मदेपर्यंत झाला. चन्द्रगुप्ताने मोठमोठी युध्दे जिंकली किंवा परकीयांना भारतातून हाकलून दिले केवळ एवढ्याचसाठी त्याला इतके मानाचे स्थान लाभले नाही. त्याने ज्या कौशल्याने राज्यकारभार केला, जी राज्यव्यवस्था त्याने निर्माण केली तिच्यामुळे इतिहासात त्याचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. चन्द्रगुप्ताचे साम्राज्य दूरवर पसरलेले होते. इतक्या मोठ्या साम्राज्याची व्यवस्था ठेवण्याचे काम मोठे कठिण होते. विशेषतः त्या काळी दळणवळणाची साधने दुर्लभ असताना हे कार्य अतिशय कठिण होते. आजच्यासारखी, मोटारी, आगगाड्या आणि जहाजे ही साधने त्या वेळी नव्हती. पण असे असूनही चन्द्रगुप्ताने मोठ्या कौशल्याने आपल्या राज्याची व्यवस्था राखली.

साम्राज्याचा मुख्य स्वतः चन्द्रगुप्त होता. सेना,न्याय इत्यादि बाबींमध्ये त्याचा निर्णय अखेरचा होता. युध्दात तो स्वतः सेनेला रणांगणावर नेत असे. प्रजेच्या अर्जांचा स्वतः विचार करीत असे. फार काय, आपल्या महालांत अंगमर्दन करून घेत असताना देखील त्यास भेटण्याची मुभा प्रजेला होती, असे मेगॅस्थेनीसने लिहून ठेवलेले आहे. साम्राज्यातील उच्चपदावरील अधिकाऱ्यांची नेमणूक स्वतः चन्द्रगुप्त करीत असे. देशाचा राज्यकारभार करण्यासाठी त्याचे एक मंत्रिमंडळ होते. मध्यवर्ती राज्यकारभाराचे १८ विभाग होते.

राज्यकारभाराच्या सोईसाठी संपूर्ण साम्राज्याचे कित्येक प्रांत करण्यात आलेले होते. मगध व त्याच्या आजूबाजूच्या विभागाकडे स्वतः सम्राट लक्ष देत असे. राजनैतिक आणि लष्करी दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या प्रांतांवर राजवंशांतील व्यक्ती किंवा राजकुमार यांचा अधिकार असे. खेड्याची व्यवस्था राखण्याचे काम ग्रामसभेकडे असे. खेड्यातील पोक्त लोक या ग्रामसभेचे सभासद असत. ग्रामसभेला अनेक अधिकार होते. साधारण भांडणतंट्यांचा निकाल देण्याचे काम ग्रामसभाच करीत असे. गुन्हेगाराला ती शिक्षा सुध्दा करू शकत असे. रस्ते व पूल बांधणे, तलाव खोदणे ही सर्व कामे ग्रामसभे-

कडेच होती. मनोरंजनाची व्यवस्थादेखील तीच करीत असे. खेड्यातील शासकाला 'ग्रामिक' म्हणत असत.

चन्द्रगुप्ताच्या सैन्यात सहा लाख पायदळ, तीस हजार घोडे, नऊ हजार हत्ती, आणि आठ हजार रथ होते. यांच्यासाठी देखील चन्द्रगुप्ताने एक वेगळा विभाग केलेला होता. चन्द्रगुप्ताच्या सेनेची व्यवस्था इतकी चोख होती की त्याच्या शासन-कालात भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाचीही छाती झाली नाही. राज्यातील जनतेच्या संरक्षणासाठी रक्षक—विभाग देखील होता.

चन्द्रगुप्त कडक शिक्षा करीत असे. त्या वेळच्या पध्दतीप्रमाणे लहान-सहान अपराधासाठी सुळावर चढविण्यात येत असे. तसे राज्यात गुन्हे फार कमी होत असत आणि प्रजा सुखासमाधानाने नांदत होती.

चन्द्रगुप्ताने पाणी पुरवठ्याकडे खूप लक्ष दिले. असे म्हणतात की, एका डोंगराळ भागातल्या नदीचे पाणी अडवून त्याने 'सुदर्शन सरोवर' नावाचे एक मोठे जलाशय निर्माण केले होते. चन्द्रगुप्त प्रजेच्या कल्याणाकडे नेहमी लक्ष देत असे त्याने तलाव खोदले, कालवे काढले, रस्ते बांधले आणि रस्त्यांवर अंतर दर्शविण्याची व्यवस्था केली. त्याने पेशावरपासून पाटलीपुत्रापर्यंत सुमारे बाराशे मैल लांबीचा रस्ता बांधला होता. २० वर्षांच्या आपल्या कारकीर्दीत त्याने अतिशय चांगल्या रीतीने राज्यकारभार केला.

असे म्हणतात की, चन्द्रगुप्ताच्या कारकीर्दीच्या अखेरच्या काळात मगध-मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. चन्द्रगुप्ताने जैन धर्माची दीक्षा घेतली होती. त्या वेळी आपला मुलगा बिंदुसार याच्या हाती राज्य सोपवून भद्रबाहु नावाच्या जैन साधूबरोबर तो दक्षिणेत म्हैसूरकडे निघून गेला. त्याच ठिकाणी उपास करून जैन धर्मानुसार चन्द्रगुप्ताने प्राण सोडला.

# अशोक

अशोक ! हे भारताच्या इतिहासातील अत्यंत आवडते नाव आहे. ज्या निवडक व्यक्तींनी या देशाच्या कीर्तीत भर घातली त्या सर्वांमध्ये अशोकाचे स्थान अग्रगण्य आहे.

अशोक हा सम्राट चन्द्रगुप्त मौर्याचा नातू होता. मौर्य राजे मोठे सामर्थ्यशाली होऊन गेले. पण त्यांच्यातही अशोकाच्या तोडीचे कोणी नव्हते. त्याच्या वडिलांचे नाव होते बिंदुसार.

अशोकाची आई, एका ब्राह्मणाची मुलगी होती. बिंदुसाराची आपल्या या मुलावर फारशी माया नव्हती. आणखीही एक गोष्ट होती. अशोक काहीसा कुरूप होता. आपला थोरला मुलगा सुशीम याला गादी देण्याची बिंदुसाराची इच्छा होती.

सुशीम ज्या वेळी तक्षशिला येथील बंड मोडण्यास गेलेला होता त्या वेळी बिंदुसार अचानक आजारी पडला. त्या सुमारास अशोक उज्जयनीचा कारभारी होता. तेथेच विदिशा (हल्लीचे भिलसा) येथील एका 'श्रेष्ठी'च्या 'देवी' नावाच्या सुंदर मुलीवर त्याचे प्रेम बसले. नंतर ही 'देवी' अशोकाची पट्टराणी झाली. तिला महेन्द्र व संघमित्रा ही मुले झाली.

वडिलांच्या आजारपणाची बातमी कळताच अशोक तातडीने उज्जयनी-हून पाटलीपुत्रात आला. हल्ली जेथे पाटणा आहे तेथेच पूर्वी पाटलीपुत्र नगरी होती. ती मौर्य राजांची राजधानी होती.

वडील मृत्यू पावताच अशोकाने गादी बळकावली. ही घटना ख्रि० पू० २७२ मधील आहे. असे म्हणतात, की बिंदुसारच्या सोळा राण्या होत्या आणि त्यास एकशे एक मुले होती. अशोकाने अपल्या ९९ भावांचा वध करून गादी मिळविली होती. पण या दंतकथेवर इतिहासकारांचा विश्वास नाही. अशोकाने सुशीमचा वध करविला एवढे मात्र खरे ! या घटनेमुळे देशात खळबळ उडाली. आणि चार वर्षे अशोकास राज्याभिषेक होऊ शकला नाही.

आरंभी अशोक बराच क्रूर होता असे म्हणतात. लोकांनी त्याचे नावच 'चण्डाशोक' असे ठेवले होते.

अशोकाची आणखीही काही नावे होती. एक नाव होते 'अशोकवर्धन.' कलिंग विजयानंतर तो 'धर्माशोक' म्हणून ओळखला जाऊ लागला. त्या काळात प्रत्येक राजाचे अभिषेकाचे नाव वेगळे असे. अशोकाचे अभिषेकाचे नाव 'पियदसि' (प्रियदर्शी) असावे. 'देवानांप्रिय' (म्हणजे देवांना प्रिय) ही त्याची पदवी होती. याशिवाय 'मगध' आणि 'शांतावसाद' ही त्याची आणखी दोन नावे होती. तो गादीवर बसला त्या वेळी मात्र त्याचे 'चंडाशोक' हेच नाव प्रचलित होते.

हाच 'चंडाशोक' नंतर इतका सहृदय झाला की, किड्यामुंग्यांना त्रास झाला तरी त्याचे अंतःकरण कळवळत असे. ज्या अशोकाने परधर्मीयांचा छळ करण्यासाठी एक यमपुरी सुध्दा तयार केली होती, त्याच अशोकाने नंतर पशुपक्ष्यांसाठी देखील रुग्णालये उघडली.

भारतावर अशोकाचे एकछत्री राज्य होते. पण राज्याच्या विस्तारामुळे काही तो थोर समजला जात नाही. जगाचे नैतिक स्वरूप त्याने पालटले म्हणून तो श्रेष्ठ समजला जातो. मैत्री व दया या बुध्दाच्या धर्माचा त्याने संपूर्ण आशियात प्रसार केला. पूर्व युरोपातही त्याने प्रचारक पाठविले होते.

अशोकास राज्याभिषेक झाल्यावर आठ वर्षांनंतर घडलेली ही घटना आहे. हल्ली ओरिसा म्हणून ओळखला जाणारा भाग पूर्वी कलिंग या नावाने ओळखला जात असे. अशोकास राज्यविस्तार करावासा वाटला म्हणून त्याने कलिंगवर स्वारी केली. कलिंगचे लोक मोठे स्वातंत्र्यप्रेमी आणि धाडशी होते. अशोकाच्या हल्ल्यामुळे घाबरून न जाता प्रतिकार करण्यास ते सिध्द झाले. घनघोर युध्द झाले. त्यात एक लाखापेक्षा अधिक सैनिक मारले गेले आणि दीड लाख पकडले गेले. याहून कितीतरी लोक उपासमार व रोगराई यांना बळी पडले.

या विनाशामुळे अशोकाचें हृदय पालटले. चंडाशोक हा धर्माशोक झाला. यानंतरचे सारे आयुष्य त्याने धर्मतत्त्वांच्या प्रचारार्थ घालविले. रणदुंदुभी-ऐवजी त्याने धर्मसूत्रांचा जयघोष केला. साम-दाम यांच्या मंत्र्यांखेरीज धर्म-मंत्रीही नियुक्त करण्यात येऊ लागले. राजाज्ञे ऐवजी धर्म घोषणा होऊ लागल्या. राजे विजयस्तम्भ उभारत असत. अशोकाने धर्म-स्तंभ उभारले. दान करणे हे जीवनाचे एक व्रत बनविले आणि धन-दानाहून श्रेष्ठ असे धर्म-दान सुरू केले. रणांगणावरील विजयाच्या ऐवजी धर्मविजयाचा गौरव होऊ लागला. इराणी व असुरी राजे जागोजागी स्वतःची प्रशस्ती करणारे शिलालेख कोरीत असत. अशोकाने धर्माच्या आज्ञा देणारे शिलालेख अनेक ठिकाणी कोरले. इतरांच्या राजनीतीहून स्वतःच्या या धर्मनीतीस त्याने सदैव श्रेष्ठ मानले.

याच्या अगोदर अशोकाने काश्मीर जिंकून तेथे श्रीनगर आणि नेपाळ-मध्ये देवपाटण ही दोन नवीन शहरे वसविली होती.

बुध्दाच्या हयातीत बौध्द धर्माचा भारताबाहेर प्रसार झालेला नव्हता. आपल्या धर्माचा प्रसार करण्याची बुध्दाचीही इच्छा होती. त्याची आवश्यकता त्याला उमजली होती. पण त्याच्या इच्छेला मूर्त रूप देण्याचा मान मात्र अशोकाने मिळविला.

बुध्दाचा धर्म जीवनाला केन्द्र बिंदु समजतो व त्याप्रमाणे उपदेश करतो. अशोक राजा होता. प्रजेच्या जीवनासाठी हा धर्म किती महत्त्वाचा आहे हे त्याने बरोबर ओळखले होते.

अशोकाने पशूहत्त्या थांबविली. पशुहत्या करणाऱ्यास पन्नास 'पण' दंड म्हणून भरावे लागतील अशी दवंडी त्याने पिटविली. त्याने माणसांसाठी वेगळे आणि पशूंसाठी वेगळे दवाखाने उघडले, रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावली, विहिरी खोदल्या. धर्मप्रसारार्थ प्रचारकांना पाठविले. व स्वतः देखील 'धर्म-यात्रा' केल्या.

त्याच्या 'धर्म यात्रा' देखील आगळयाच होत्या. प्रारंभी बुध्दाच्या जीवनाशी संबध्द असलेल्या जागी तो गेला. नंतर देशातील सर्व महत्त्वाच्या ठिकाणी तो गेला. ज्या ज्या ठिकाणी तो गेला तेथे तेथे शिळेवर त्याने आपले आदेश, निर्देश आणि उपदेश कोरून ठेवले. जागोजागी टेकड्या, शिळा, किंवा गुहा यांच्यावर आपल्या चिरस्थायी स्मृती तो राखीत गेला. जेथे शिलाखंड नसत तेथे त्याने स्तंभ उभारून त्यांच्यावर लेख कोरले. देशात सर्वत्र स्तंभ, शिलालेख, स्तूप, विहार व चैत्यगृहे यांचे जणू काही एक जाळे विणले गेले. या सर्वांमुळे त्याचे धर्मप्रेम आणि प्रजाप्रेम अजरामर झाले आहे.

दगडांवरील हे ग्रंथ, भारतीय कलेचा बहुमोल निधी आहे. अशोकाच्या पूर्वी दीड हजार वर्षांपर्यंत आणि नंतर दीड हजार वर्षांपर्यंत कलेच्या क्षेत्रात इतके सुरेख कार्य कधीही झाले नव्हते.

अशोकाचा इराणी अधिकारी तुषाष्प 'यवन' याने गिरनार मध्ये नदीला धरण बांधून सरोवर तयार केले. प्राचीन काळात बांधकामाचे इतके मोठे उदाहरण सापडणार नाही.

स्तूप बांधण्याची कला ही तर अशोकानेच जगाला दिलेली देणगी आहे. अशोकाच्या या कल्पनेची करावी तितकी प्रशंसा थोडीच आहे. स्तूपांच्या सजावटीने त्यात आणखी भरच घातली आहे. बौध्द ग्रंथांप्रमाणे अशोकाने चौऱ्यांशी हजार स्तूप आणि चैत्यगृहे बांधली. यात थोडीफार अतिशयोक्ती असली तरी त्यांची संख्या शेकडोच्या घरात असली पाहिजे यात शंकाच नाही. उत्खननात कित्येकांचा शोध लागला आहे. आणि आणखीही कित्येकांचा शोध लागेल.

अशोकस्तंभ पन्नास फुटापर्यंत उंच आहेत. हे स्तंभ एकाच पाषाणातून कोरलेले असून गोलाकार, घोटीव आणि गुळगुळीत आहेत. सर्वांचे रंग आकर्षक आहेत. खांबाच्या वरच्या भागावर हत्ती, घोडे, बैल वा सिंह यांच्या आकृत्या कोरलेल्या आहेत. या आकृत्या म्हणजे वेगवेगळी प्रतीके आहेत. बुध्द जगात अवतरला आणि मायेच्या गर्भात प्रविष्ट झाला या घटनेचे हत्ती हे प्रतीक आहे.

बैल, हे जन्माचे प्रतीक आहे. घोडा, हे घर सोडले त्याचे प्रतीक आहे आणि सिंह धर्मप्रचाराच्या जीवनाचे प्रतीक आहे. या प्रतीकांच्या खाली कमळे आहेत, नाना तऱ्हेचे पशुपक्षी व वेलबुट्टया कोरलेल्या आहेत. स्तंभाची रचना लाटण्यासारखी असून वर ते निमुळते होत गेले आहेत.

या सर्व कलाकृतींवरून दिसून येते की अशोकापूर्वीदेखील आपली भारतीय कला बरीच समृध्द होती. या सर्व कलाकृतींमध्ये एक प्रकारचा जिवंतपणा आहे आणि आजहि कलाप्रेमी लोक त्यांची प्रशंसा करतात.

या कलेवर इराण व ग्रीस यांच्या कलेचा परिणाम झालेला असण्याची शक्यता आहे. पण रचनेतील भारतीयतेला आणि अभिव्यक्तीच्या वैशिष्टयाला तोड नाही. साधेपणा आणि सौन्दर्य देखील इराण व ग्रीस यांच्यापेक्षा काकणभर अधिकच आहे. अशोकाचे सर्व कारागीर भारतातीलच होते हे निश्चित. फार तर त्यांचे गुरू विदेशी असतील. पण शिष्यांनी आपल्या गुरूंकडून मंत्र तेवढा शिकून घेतला असावा. कारण कुठेही त्यांनी नक्कल केलेली नाही.

अशोकाच्या कालखंडात कलेबरोबरच साहित्याचीही खूप प्रगती झाली. अशोकाच्या शिलालेखांची भाषा तेजस्वी, ओजस्वी आणि परिणामकारक आहे. त्यातील भावना सुसंबध्द आणि उत्कट आहेत. साहित्याखेरीज अशी भाषा निर्माण होत नसते. त्या काळात ग्रंथरचना झाली होती. तो काळ सूत्रांचा होता.

परदेशात धर्मप्रचार करण्यासाठी अशोकाने तिसरी संगीति ( धर्म सभा ) भरवली. सर्व देशातून बौध्द विद्वान बोलावण्यात आले. अशोकाचा गुरू मोग्गलिपुत्त तिस्स याने अध्यक्षपद स्वीकारले. अनेक प्रश्नांवर विचार-विनिमय करण्यात आला. हजार भिक्षूंची एक परिषद करण्यात आली. परिषदेची बैठक नऊ महिने चालू राहिली. धर्मग्रंथांमध्ये सुधारणा करण्यात आली. तिस्स याचा ग्रंथ, कथावत्थु हा विश्वसनीय ठरविण्यात आला. देशोदेशी प्रचारक पाठविण्याची योजना मान्य झाली. काश्मीर, गांधार, लंका येथे प्रचाराची कायमची व्यवस्था करण्यात आली.

अशोकाने परदेशात राजदूतांबरोबरच धर्मदूत देखील पाठविले. सर्व पश्चिम आशियाचा राजा अँटिओकस, ईजिप्तचा राजा तुरमाय, मॅसेडोनियाचा अंतेकिन, उत्तर आफ्रिकेचा (साइरीन) मॅगस, एपिरसचा अलेक्झांडर इत्यादि सर्वांच्या दरबारात भारताच्या या धर्मदूतांना मोठा मान मिळत असे.

कंबोज, गांधार, नामक, योन (ग्रीक), पितनिका, भोज, राष्ट्रिक, केरलपुत्र, चोल, ताम्रपर्णी (सिंहली) सातियपुत्र इत्यादि सर्व लोक दया व मैत्री यांचा धर्म पाळू लागले. अशोकाच्या साम्राज्यातील आंध्र, पारिद, कलिंग इत्यादि प्रदेशांतील लोकांमध्ये देखील हा धर्म रुजला.

अभिषेकानंतर तेराव्या वर्षी अशोकाने एक नवे मंत्रालय सुरू केले. पूर्वी सरहद्दीच्या देखरेखीसाठी 'अंत महामात्र', न्याय व्यवस्थेसाठी 'नागरक महामात्र' इत्यादि महामंत्री असत. नंतर एक 'धर्म महामात्र' देखील नियुक्त करण्यात आला.

या विभागातील अधिकारी गावोगावी गेले. अशोकाचा धर्म-संदेश त्यांनी घरोघर पोहोचवला.

या संदेशात जनतेचे कल्याण, त्यांच्या सुखाचे मार्ग, आणि अनाथ व वृध्द यांना मदत देणे या सर्वांची घोषणा करण्यात येत असे. अपराध्यांना कमी शिक्षा देण्याचा व सर्वांशी दयेने वागण्याचा हुकुम जागोजागी वाचून दाखवण्यात येऊ लागला. सांप्रदायिक प्रेम-भावनेचा पाया देखील त्याच वेळी घालण्यात आला.

प्रजेची स्थिती कळावी म्हणून अशोक स्वतः सर्व राज्यात फिरत असे. प्रजेला तो स्वतःच्या मुलाप्रमाणे मानीत असे. ज्याप्रमाणे लोक आपल्या मुलांसाठी सारे काही करतात त्याचप्रमाणे अशोकदेखील प्रजेच्या सुखासाठी सारे करावयास तयार असे. 'मी दरबारात, भोजनगृहात, शय्यागृहात कोठेही असलो तरी 'प्रतिवेदका' ने सरळ यावे आणि प्रजेची माहिती मला द्यावी' अशी त्याची आज्ञा होती.

अशा तऱ्हेने आपले सर्व सामर्थ्य आणि आपले सारे धन तो प्रजेच्या कल्याणार्थ लावू लागला. उपकार करताना तो आपली प्रजा आणि परकी प्रजा असा भेदभाव करीत नसे.बौध्द धर्माचा परदेशातही इतका प्रचार झाला, त्याचे कारण हेच आहे. आपल्या मुलामुलींना देखील त्याने परदेशांत धर्मप्रचार करण्यासाठी व जनतेचे कल्याण करण्यासाठी पाठविले होते. महेन्द्र आणि संघमित्रा लंकेत गेली होती. आणि कुस्तन चीन व खोतानमध्ये गेला होता.

अशोक सर्व धर्मांकडे समान दृष्टीने पहात असे. आणि सर्वांना साहाय्य करीत असे. तो स्वत: बौध्द होता. कधीकधी भिक्षु होऊन तो विहारांमध्ये रहात असे, स्तूप-स्तंभ वगैरे उभारीत असे, देशोदेशी बौध्द धर्माचा प्रचार करीत असे, बौध्द धर्माच्या वृध्दीसाठी प्रयत्न करीत असे. अशा तऱ्हेने जगाच्या विचारधारेत तो एक महान क्रांती घडवून आणीत होता. पण बौध्द धर्मावर इतकी निष्ठा असूनसुध्दां तो धर्मवेडा नव्हता. त्याची प्रजा हवा तो धर्म स्वीकारण्यास मोकळी होती. अशोक सर्व धर्मांचा आदर करीत असे. पण कोणत्याहि धर्मांतील मूर्खपणाच्या विचारांना मात्र त्याचा विरोध होता.

धर्म म्हणजे 'प्रिय' कर्तव्य असे तो समजत असे. त्याने केलेला उपदेश हा भारतातील सर्व धर्मांचा उपदेश आहे. त्यात त्याने धर्माच्या सांप्रदायिक अंगाचा उल्लेख देखील केला नाही. सर्वजण ज्या गोष्टी आनंदाने मान्य करू शकतील अशाच गोष्टी तो करीत असे. जे बौध्द नव्हते त्यांच्यावर, बौध्द होण्याची जबरदस्ती त्याने कधीही केली नाही. तात्विक वादविवादाच्या भरीस तो कधी पडला नाही. सदाचार हाच त्याचा धर्म होता.

अशोकाच्या या सहिष्णुतेचा फारच चांगला परिणाम झाला. समाजात त्या वेळी धार्मिक कट्टरतेचे प्राबल्य माजले होते. अशोकाने आपल्या सहिष्णुतेने समाजास धर्मांधतेतून मुक्त केले. अशोकाच्या सहिष्णुतेनेच बौध्द धर्म देशात व देशाबाहेर महान ठरला. तो किती उच्च आहे, किती गहन आहे आणि किती विशाल आहे, ते सिध्द झाले.

अशोकाचे राज्य उत्तरेत हिमालयापासून ते दक्षिणेत हैद्राबादमधील मास्की नावाच्या गावापर्यंत आणि पूर्वेस ओरिसापासून ते पश्चिमेला काबूल-पर्यंत पसरलेले होते. राज्याचे चार विभाग केले होते. तक्षशिला, उज्जैन, तोसली (कलिंग) आणि इसिल (दक्षिण), या चार प्रादेशिक राजधान्या होत्या. या चार राजधान्यांव्यतिरिक्त पाटलीपुत्र ही त्याची मध्यवर्ती राजधानी होती. या विभागांचा कारभार पाहणाऱ्यांना कुमार म्हणत असत. सर्वसाधारणपणे हे कुमार म्हणजे पट्टराणीची मुले असत. या विभागांचे अनेक उपविभाग होते. या उपविभागाच्या शासकांना 'राजा' म्हणत.

राजधानीत प्रत्येक कार्याचे एक मंत्रालय असे. त्यास 'परिषद' म्हणत. प्रत्येक परिषदेचा एक महामात्र असे. जिल्ह्याचे अधिकारी 'पोदसिक' या नावाने ओळखले जात. तहसिलीच्या अधिकाऱ्याला 'लाजुक' म्हणत असत.

अशोकाच्या अभिषेकाचा वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा होत असे. या प्रसंगी दरवर्षी कित्येक कैद्यांना सोडून देण्यात येत असे.

सदतीस वर्षे राज्य केल्यावर ख्रि० पू० २३३ मध्ये अशोकाने आपला नातू दशरथ याच्याकडे राज्यकारभार सोपविला आणि उरलेले आयुष्य धर्मसेवेत घालविण्यासाठी तो दक्षिणेत सुवर्णगिरी येथे निघून गेला. तेथे गेल्यावर वर्षाच्या आतच त्याने इहलोक सोडला.

प्रजेचे हित होईल अशा रीतीने अशोक राज्यकारभार करीत होता. वडिलांप्रमाणेच तो प्रजेच्या हिताविषयी दक्ष असे. प्रजेचे दुःख दूर करणे हे त्याच्या जीवनाचे ध्येय होते. धर्मप्रसार हाच त्याचा राजधर्म होता. त्यासाठी तो आहार, विहार, आराम, झोप सारे काही सोडण्यास तत्पर राहात असे. आपले आचरण प्रजेला आदर्श वाटावे, अशी काळजी तो घेत असे. देश जिंकून घेण्याची कल्पना त्याने सोडून दिलेली होती. शेजारच्या राज्यांना त्याने अभय दिलेले होते. 'माझ्याकडून तुम्हाला सुखच लाभेल, दुःख नव्हे' असा दिलासा तो त्यांना देत असे. रानटी जातींमध्ये देखील त्याने धर्मभावना निर्माण केली होती.

क्र. क्र. ९३८८५ ५१

प्रजेचे धर्मानुसार पालन करा, धर्मानुसार राज्यकारभार करा, धर्माचरणाने जनतेचे कल्याण करा, तिला सुखी करा, लोकांचे संरक्षण करा, अशी त्याची आज्ञा होती. तुम्ही जनतेचे मायबाप आहात, पोटच्या मुलाप्रमाणे प्रजेचे पालनपोषण करा, असा त्याचा प्रशासकांना आदेश होता.

नुसते हुकूम देऊन तो स्वस्थ बसत नसे. तर त्यांची अंमलबजावणी होते आहे की नाही हे देखील पहात असे. या हुकुमांचे उल्लंघन करणाऱ्यास त्याच्या राज्यात स्थान नव्हते. एखाद्या अधिकाऱ्याच्या हातून चूक झाल्यास अगोदर त्याची प्रशंसा करून मग त्याची चूक तो त्यास दाखवून देत असे. आणि उपदेश करूनही सुधारणा न झाल्यास त्यास शिक्षा करीत असे.

अशोक ध्येयेवादी व भाविक होताच पण त्याचबरोबर तो बुध्दिमान आणि सरळ स्वभावाचा देखील होता. भरीव कामगिरी करून दाखविण्याची तळमळ त्यास वाटत असे. लोकसेवेसाठी त्याने आपले जीवन दान केलेले होते. बुध्दाच्या 'बहुजनहिताय, बहुजनसुखाय' या उपदेशाचे आचरण करणारा आदर्श राजा अन्यत्र आढळत नाही.

अशोक दयाळू आणि क्षमाशील होता. तसाच तो एक खंबीर शासक होता. त्याच्या संपूर्ण राज्यात उत्कृष्ट शासन होते व सर्वत्र सुखशांती होती, याबद्दल आपल्या शिलालेखांमधून त्याने समाधान व्यक्त केले आहे.

स्वतंत्र भारताने अशोक चक्र हे आपले राजचिन्ह ठरवून त्याच्या उच्च आदर्शांचा सार्थ गौरव केला आहे. अशोकाप्रमाणेच स्वतंत्र भारतानेही जगातील सर्व देशांशी मैत्री राखण्याचे धोरण अनुसरले आहे. यावरूनच अशोकाचे श्रेष्ठत्व सिध्द होते. आज अवघे विश्व भारताच्या शांततेच्या व मैत्रीच्या धोरणाची प्रशंसा करीत आहे. त्याचबरोबर एका बौध्द राजाच्या चक्रास हिंदूंची बहुसंख्या असलेल्या भारताचे राजचिन्ह मानल्याने आपल्या राष्ट्राची धर्मनिरपेक्षता स्पष्ट होते .चांगल्या गोष्टी कोठेही का असेतात; त्या ग्रहण करण्याची क्षमता आपल्यात असायला हवी.

# विष्णुशर्मा

दक्षिण भारतात महिलारोप्य नावाचे एक नगर होते. त्या नगरीच्या राजाचे नाव होते अमरशक्ती. त्या राजाला तीन मुले होती. त्यांची नावे होती—बहुशक्ती, उग्रशक्ती, आणि अनन्तशक्ती. ही तिन्ही मुले अतिशय मूर्ख, व्रात्य आणि दांडगी होती. अभ्यासात एकालाही गोडी वाटत नसे. आपल्या मुलांची ही अवलक्षणे पाहून अमरशक्ती राजास अतिशय वाईट वाटत असे. काळजीमुळे त्याला स्वस्थ झोप लागत नसे.

एकदा भर दरबारात अमरशक्तीने आपली काळजी बोलून दाखविली. राजाचे बोलणे ऐकून सर्व सभा स्तंभित झाली. कोणीच काही बोलेना. अखेर विष्णुशर्मा नावाच्या पंडिताने राजास म्हटले—'राजकुमारांना माझ्या हवाली करा. मी सहा महिन्यातच त्यांना राजनीतीचे सर्व डावपेच शिकवून तयार करीन.' राजाने त्याचे म्हणणे मान्य केले आणि तिन्ही राजकुमारांना त्याच्या ताब्यात दिले.

विष्णुशर्मा त्या तिघा राजपुत्रांना घेऊन आपल्या घरी आला आणि त्यांना चांगल्या चांगल्या गोष्टी सांगू लागला. याच कथा नंतर 'पंचतंत्र' या नावाने प्रसिध्द झाल्या. त्याच्या या कथा फारच मनोरंजक होत्या. राजपुत्रांना त्या अतिशय आवडत असत. या कथांमधूनच विष्णुशर्मा त्यांना राज्य-कारभारातील डावपेच सांगत होता. सहा महिन्यांतच राज्यकारभाराची पूर्ण माहिती होऊन तिघे राजपुत्र वडिलांकडे परत आले.

विष्णुशर्माच्या बाबतीत आपल्याला एवढेच माहीत आहे. त्याचे खरे नाव विष्णुशर्माच आहे की ते त्याचे टोपण नाव आहे हे देखील आपल्याला ठाऊक नाही. त्याचा जन्म केव्हा झाला, तो कधी मृत्यू पावला, त्याचे आईवडील कोण होते आणि त्याने पंचतंत्र केव्हा रचले याचीही माहिती नाही. पंचतंत्राखेरीज त्याने आणखीही काही ग्रंथ लिहिले की काय याविषयी देखील आपल्याला काही ठाऊक नाही. विद्वानांच्या मते पंचतंत्राचा रचनाकाल इ० स० २०० ते ३०० हा असावा.

पंचतंत्रात पाच विषयांवरील कथा आहेत—मित्रभेद, मित्रलाभ, कावळा आणि घुबड, लब्ध-विनाश आणि अपरीक्षित काम. हर्टेलने संपादित केलेल्या पंचतंत्रातील पहिल्या भागात ३४, दुसऱ्या भागात १०, तिसऱ्या भागात १८, चौथ्या भागात १३, आणि पाचव्या भागात १२ कथा आहेत. प्रत्येक भागातील पहिली कथाच त्या भागातील मुख्य कथा आहे, हे वैशिष्ट्य आहे. त्या मुख्य कथेला जोडून उपकथा आहेत.

पंचतंत्रातील या कथा निव्वळ करमणुकीसाठी नाहीत. त्यांच्यातून नीतीचे मूल सिध्दान्त सांगण्यात आले आहेत. या ग्रंथात ज्या कथा आहेत त्यात मनु, शुक्र व चाणक्य यांच्या राजनीतीविषयक सूत्रांचा निष्कर्ष साध्या पण आकर्षक स्वरूपात सांगण्यात आलेला आहे. आणि तो अशा पध्दतीने सांगितला आहे की निर्बुध्द माणसालाही तो सहज समजावा. विष्णुशर्माच्या या कथांच्या बाबतीत सर विल्यम जोन्स यांनी म्हटले आहे की या कया जगातील सर्व कथांहून अधिक सुरस आणि प्राचीन आहेत. सर विल्यम हे एके काळी कलकत्ता सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश होते.

पहिल्या भागात राजपुत्रांना मित्रभेद समजावून सांगण्यासाठी विष्णुशर्माने एक कथा सांगितली. ती कथा अशी आहे. संजीवक नावाच्या एका बैलाची पिंगलक नावाच्या सिंहाशी मैत्री जमली. ही गोष्ट पिंगलकाच्या जुन्या मंत्र्याच्या दोन मुलांना—करटक व दमनक या कोल्ह्यांना—अजिबात आवडली नाही आणि बैल व सिंह यांची मैत्री कशी मोडावी, याचा विचार ते करू लागले.

पिंगलक आणि संजीवक यांच्यात कशा प्रकारे भांडण लावावे म्हणजे पिंगलक, आपला जिवलग मित्र संजीवक याला मारून टाकील, यावर करटक आणि दमनक यांच्यात बराच वादविवाद झाला. करटक आणि दमनक यांच्यात झालेल्या या वादविवादाला धरून अनेक सुरस कथा सांगण्यात आल्या आहेत. त्यापैकी पहिली गोष्ट एका माकडाची आहे. मूर्खपणामुळे त्या वानराने आपले

शेपूट कसे गमावले हे या कथेत सांगण्यात आले आहे. दुसरी गोष्ट एका कोल्ह्याची आहे. नगाऱ्याच्या आवाजाने तो कोल्हा प्रथम घाबरून गेला पण नंतर नीट पाहिल्यावर त्याला कळले की नगारा आतून पोकळ आहे. अशा तऱ्हेने एकापाठोपाठ एक कथा येत जातात आणि अखेरीस दमनक पिंगलकाला समजावून सांगतो की, सिंहाने नेहमीच बैलाची शिकार केलेली आहे, असे असताना पिंगलकाने संजीवक बैलाशी काय म्हणून मैत्री करावी ? कोल्ह्याचा धूर्तपणा सफल होतो आणि संजीवक व पिंगलक यांच्या मैत्रीचे रूपांतर शत्रुत्वात होऊन पिंगलक संजीवकास मारून टाकतो. बैलाला मारल्या-नंतर त्याच्या रक्ताने माखलेले आपले पंजे पाहून सिंहाला वाईट वाटते. पण धूर्त कोल्हा सिंहाची समजूत घालतो आणि सिंहाचे दुःख दूर होते. अखेरीस वनराज पिंगलकाचा मंत्री होण्याचा दमनकाचा हेतू सफल होतो.

मित्र असलेले दोन राजे आपापसात लढून मारले जावेत यासाठी त्यांच्यात कशा रीतीने दुही निर्माण करावी हाच, पहिल्या भागातील सर्व कथांचा सारांश आहे. याप्रमाणे बाकीच्या चार भागांमध्ये देखील राजनीतीचे चार मुख्य सिध्दान्त, कथा व उपकथा यांच्या साहाय्याने विष्णुशर्माने राजपुत्रांना शिकविले आणि सहा महिन्यांच्या आतच त्यांना राजनीतीमध्ये पारंगत केले.

या कथा व उपकथांमधील पात्रे बहुतेक पशु वा पक्षी आहेत. पण पशु-पक्ष्यांच्या या कथा इतक्या सुरस आहेत की २००० वर्षे होऊन गेली असली तरी त्या कथा आजही आपण आवडीने वाचतो. या कथा इतक्या जुन्या असूनसुध्दा नव्या वाटतात. आज २००० वर्षांनंतर सुध्दा त्यांचे तात्पर्य आपल्याला पटते. या कथा जगातील मुलेमुली आजही आवडीने वाचतात. या कथा इतक्या सुरस आहेत की एकदा वाचायला सुरुवात केली तर संपूर्ण पुस्तक वाचून संपविल्याखेरीज ते हातावेगळे करवत नाही.

पंचतंत्राच्या कथा सुरस आहेत, तशाच बोधप्रदही आहेत. हिंदूंच्या धर्मशास्त्रात इहलोकापेक्षा पारलौकिक सुखावर भर देण्यात आलेला आहे. पण पंचतंत्रामध्ये जागोजागी श्लोकांच्या स्वरूपात जी नीति-वचने दिलेली आहेत

त्यामध्ये लौकिक व्यवहारावर भर देण्यात आला आहे. जगात कसे राहावे, इतरांशी कसे वागावे इत्यादि गोष्टी विष्णुशर्माने, या कथांमधून सांगितलेल्या आहेत. पंचतंत्राच्या कथा लिहिणाऱ्यास व्यवहारज्ञान पुरेपूर होते, याबद्दल काहीच शंका नाही. व्यवहारज्ञानासारखा रुक्ष विषय त्याने कथांतून मांडला आहे.

पंचतंत्रातील कथा इतक्या सुरस व उद्‌बोधक आहेत की परदेशातही त्या फार लोकप्रिय झाल्या आहेत. या कथांचे किती भाषांत अनुवाद झाले आणि या कथांच्या आधारे किती कथा रचल्या गेल्या त्याची गणतीच नाही.

आपल्या देशातच पंचतंत्राचे कमीत कमी पाच पाठभेद आढळतात. त्यात 'तंत्राख्यायिका' हे नाव प्रथम घ्यावे लागेल. पंचतंत्राची ही आवृत्ती कधी तयार झाली ते सांगणे कठीण आहे. पण एवढे मात्र खरे की, मूळ प्रतीमध्ये नसलेल्या अनेक कथा यात नंतर घालण्यात आल्या आहेत. बहुधा पश्चिम भारतातील एखाद्या जैनाने इ० स० ११०० च्या सुमारास याची रचना केली असावी. ११९९ सालाच्या सुमारास पूर्णभद्र नावाच्या एका जैन श्रमणाने याची दुसरी आवृत्ती तयार केली.

दक्षिण भारतात देखील पंचतंत्राच्या एका आवृत्तीच्या आधारे तयार झालेल्या पाच विभिन्न प्रती आढळतात. संक्षेपात का असेना पण मूळ पंचतंत्राचेच अनुकरण या प्रतींमध्ये केलेले आहे, असे विद्वानांचे मत आहे. मूळ पंचतंत्रातील गद्याचा तीन चतुर्थांश भाग आणि पद्याचा दोन तृतीयांश भाग या प्रतींमध्ये आहे, असे एका पाश्चात्य विद्वानाचे मत आहे. पण दक्षिण भारतातील पहिली प्रत भारवीच्या नंतरची असल्याचे सांगतात. भारवी इ० स० ५५० च्या सुमारास होऊन गेला असे मानतात. एक नेपाळी आवृत्तीदेखील आहे. ती हितोपदेशाच्या पूर्वीची आहे. पंचतंत्राची आणखी एक आवृत्ती, हितोपदेशाच्या नावाने बंगालमध्ये प्रचलित आहे. हितोपदेशाच्या लेखकाचे नाव नारायण होते आणि त्याच्या आश्रयदात्याचे नाव राजा धवलचंद्र असे होते. हितोपदेशात पंचतंत्रातील कथा आहेत हे खरे, पण त्यात व पंचतंत्रात बराच फरक आहे.

अनेक परकीय भाषांमध्ये देखील पंचतंत्राचे अनुवाद झालेले आहेत. जगातील बहुतेक प्रगत भाषांमध्ये पंचतंत्राचे अनुवाद झाले आहेत. सर्वांत अगोदर इराणच्या प्राचीन पहलवी भाषेत बुरजोई याने इ० स० ५५० च्या सुमारास पंचतंत्राचा अनुवाद केला. त्या अनुवादाची प्रत हल्ली उपलब्ध नाही. या अनुवादाच्या आधारावर सयाम देशाच्या सयामी भाषेत पंचतंत्राचे रूपांतर करण्यात आले आणि काही कालानंतर अरबीमध्येही पंचतंत्राचा अनुवाद झाला. अरबींत अनुवाद झाल्यानंतर सयामी भाषेत इ० स० च्या १० व्या किंवा ११ व्या शतकाच्या सुमारास पंचतंत्राची आणखी एक नवी आवृत्ति निघाली अणि ११ व्या शतकाच्या अखेरीस ग्रीक भाषेत अनुवाद झाला. ११ व्या शतकातच इब्रानी भाषेत पंचतंत्राचा अनुवाद झाला अणि १३ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास जर्मन भाषेत याचा अनुवाद झाला. १५ व्या शतकाच्या अखेरीस स्पॅनिश भाषेत पंचतंत्राचा अनुवाद झाला. याच अनुवादाच्या आधारे १६ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास इटालियन भाषेत अनुवाद झाला. तो नंतर फ्रेंच भाषेत रूपांतरित करण्यात आला.

पंचतंत्राच्या आधारे फारशीमध्ये 'अनवार सुहेली'ची रचना करण्यात आली. 'अनवार सुहेली'मुळे पूर्वेकडील देशांमध्ये पंचतंत्रातील कथांचा प्रचार झाला. 'अनवार सुहेली'चा तुर्की, फ्रेंच, जर्मन, डच इतकेच नव्हे तर मलायी भाषेतही अनुवाद झाला.

पचतंत्राच्या अनुवादांची गणतीच नाही. याच्या कथा देशकालातीत आहेत. त्या प्राचीन असूनही सदैव नवीन आहेत. पंचतंत्र, ही भारताने जगाला दिलेली एक अमर देणगीच आहे.

# आर्यभट्ट

गणिताच्या क्षेत्रात ज्याप्रमाणे भारताने जगाला एक ते नऊपर्यंतच्या आकड्यांनी संख्या मांडण्याची पध्दत दिली त्याचप्रमाणे दशांश पध्दतीचा शोध लावून या क्षेत्रात एक मोठीच क्रान्ती घडवून आणली. या शोधामुळे जगाचा खूपच फायदा झाला. या दशांश पध्दतीचा शोध ज्याने लावला त्या थोर पुरुषाचे नाव आहे—आर्यभट्ट.

आर्यभट्टाच्या पूर्वी, वैदिक कालापासूनच या देशातील पंडितांचे ज्योतिष व गणित यांच्याकडे लक्ष वेधले होते आणि या दोन्ही क्षेत्रात वेळोवेळी त्यांनी महत्त्वाचे शोध लावले होते. प्राचीन काळी ज्योतिष व गणित या क्षेत्रामध्ये भारतीय विद्वानांनी किती प्रगती केली होती हे दर्शविणारे अनेक उल्लेख ऋग्वेदात आढळतात. ते लोक दिवस, रात्र व ऋतू, या सर्व गोष्टीस सूर्यच कारणीभूत असल्याचे समजत होते. सूर्याच्या प्रकाशामुळेच चंद्र प्रकाशतो हे देखील त्यांना माहीत होते. उत्तरायणातील व दक्षिणायणातील सूर्याच्या गती-निरीक्षणावरून वसंतऋतू केव्हा येणार आणि शरद ऋतू केव्हा सुरू होणार आहे, हे देखील त्यांना कळत असे. काही विद्वानांच्या मते तर पृथ्वीला आस आहे, याचे देखील त्यांना ज्ञान होते.

यजुर्वेद, ब्राह्मण व उपनिषद यांच्या काली ज्योतिष व गणित यांना अनुक्रमे नक्षत्रविद्या, राशिविद्या आणि शुल्ब विद्या (भूमिती) ही नावे होती आणि वेदांच्या आचार्यांना यांची माहिती असणे आवश्यक समजले जात असे. सूत्रकालात तर गणित-ज्योतिष यांना वेदांचेच एक अंग मानण्यात येऊ लागले आणि त्या वेळेपासून हे शास्त्र 'वेदांग' या नावाने प्रसिध्दीस आले. वेदांग म्हणजे वेदांचे एक अंग !

शुक्ल यजुर्वेदात 'नक्षत्र-दश', 'गणक' इत्यादि शब्द आढळतात, मात्र तत्कालीन गणितज्ञांची व ज्योतिषज्ञांची नावे देखील लुप्त झाली आहेत. या युगातील 'गर्ग संहिते'चा रचयिता गर्ग याचेच नाव तेवढे आपल्याला ठाऊक आहे. पण आज उपलब्ध असलेल्या गर्ग संहितेत, नंतर इतकी भेसळ झाली की गर्ग महर्षी यांनी लिहिलेली संहिता ती हीच, असे सांगता येणे कठीण आहे.

महर्षी गर्ग यांच्यानंतर ज्योतिषाचार्य लगध हे होऊन गेले. त्यांचा 'याजुष ज्योतिष वेदांग' हा ग्रंथ आजही उपलब्ध आहे. लगध काश्मीरचे निवासी होते. या ग्रंथाचा रचनाकाल ३,४०० वर्षांपूर्वीचा आहे, असे दीक्षित व टिळक यांचे मत आहे. या ग्रंथात राशींचा उल्लेख नाही. त्यांत फक्त २७ नक्षत्रांच्या गतींचा उल्लेख आहे आणि सूर्य-चंद्राच्या पंचवर्षीय चक्राची माहिती आहे. तीन प्राचीन संहितांमध्येही याच गोष्टींचा उल्लेख आहे.

आर्यभट्टाविषयी आपल्याला फारच थोडी माहिती आहे. त्याचे जन्म-स्थान कुसुमपूर किंवा पाटलिपुत्र (आधुनिक पाटणा) हे होते आणि त्याचा जन्म इ० स० ४७६ मध्ये झाला असे मानतात. तो २३ वर्षांचा झाला तेव्हापासून त्याने लेखनास आरंभ केला. त्याने लिहिलेले तीन ग्रंथ उपलब्ध आहेत. एका ग्रंथाचे नाव आहे—आर्यभट्टीय. त्यात दहा आर्या छंदामध्ये दहा श्लोक आहेत. दुसरा ग्रंथ आहे 'दश-देशिका-सूत्र'. त्यात त्याने आपली गणनपध्दती स्पष्ट केली आहे. तिसरा ग्रंथ आहे 'आर्याष्टशत'. त्यात १०८ श्लोक आहेत. या तिन्ही व्यतिरिक्त आणखी काही ग्रंथरचना त्याने केली असल्यास ती उपलब्ध नाही.

या ठिकाणी एका गोष्टीचा उल्लेख करणे आवश्यक आहे की, भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच गणिताला ज्योतिषापासून वेगळे करून त्यास आपल्या ग्रंथामध्ये आर्यभट्टाने स्वतंत्र स्थान दिले. 'सूर्य-सिध्दान्त' उपलब्ध झाल्यावर असे दिसून आले की आर्यभट्टाला वाजवीपेक्षा जास्त श्रेय देण्यात आले आहे, असे एका पाश्चात्य विद्वानाचे मत आहे. कारण त्याने जे काही लिहिले आहे ते बरेचसे 'सूर्य-सिध्दान्ताशी जुळणारे आहे.

पृथ्वी वर्तुळाकार आहे आणि ती आसाभोवती फिरते असे, आर्यभट्टाचे मत होते. मेरू पर्वताच्या उंचीवर आर्यभट्टाचा विश्वास नव्हता. राहु चंद्राला खाऊन टाकतो हे चंद्रग्रहणाचे कारण नसून सूर्य व चन्द्र यांच्यामध्ये पृथ्वी आल्याने चन्द्रग्रहण लागते, असे त्याचे मत होते.

हे सर्व पहिल्या आर्यभट्टाविषयी आहे. दुसराही एक आर्यभट्ट होऊन गेला. या दुसऱ्या आर्यभट्टाने इसवी सनाच्या दहाव्या शतकात 'आर्य-सिध्दान्त'

नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये जी गणना पध्दत दिलेली आहे ती पहिल्या आर्यभट्टाच्या गणना पध्दतीपासून भिन्न आहे. आणि म्हणूनच 'आर्य-सिध्दान्त' लिहिणारा आर्यभट्ट पहिल्या आर्यभट्टापासून वेगळा आहे, असे विद्वानांचे मत आहे.

पहिल्या आर्यभट्टानेच गणिताला ज्योतिषापासून वेगळे करून त्याला स्वतंत्र स्थान दिले. त्याची गणना पध्दत देखील वेगळी होती. १ ते २५ पर्यंतची संख्या लिहिण्यासाठीं त्याने क वर्गापासून प वर्गापर्यंतची व्यंजने घेतली आणि ३० ते १०० पर्यंतची संख्या लिहिण्यासाठी य ते ह पर्यंतची व्यंजने घेतली.

आर्यभट्टानंतर भारतात आणखीही दोन थोर ज्योतिषाचार्य होऊन गेले. एकाचे नाव होते वराहमिहिर. तो सहाव्या शतकात (सुमारे इ० स० ५५०) होऊन गेला असे मानले जाते. वराहमिहिराचा मृत्यू इ० स० ५८७ मध्ये झाला असे समजतात. त्याचा जन्म कोठे आणि केव्हा झाला, तसेच त्याचे आईवडील कोण होते, त्यांचे नाव काय होते, याची काही माहिती मिळत नाही. त्याने आपल्या 'पंचसिध्दांतिका' ग्रंथात जुन्या पाच सिध्दान्तांचा परामर्ष घेतलेला आहे. चन्द्रग्रहणासंबंधीच्या आर्यभट्टाच्या सिध्दान्ताला याने चुकीचे ठरविले आणि प्रचलित लोकमताविरुध्द विचार व्यक्त केल्याबद्दल आर्यभट्टाची निंदा केली.

दुसऱ्याचे नाव होते—ब्रह्मगुप्त. त्याचा जन्म इ० स० ५९८ साली मुलतानजवळील भिल्लमल्ल या गावी झाला असे मानतात. याच्या वडिलांचे नाव 'जिष्णु' असे होते. ब्रह्मगुप्ताने ६२८ साली 'ब्रह्म-सिध्दान्त' वा 'स्फुट-सिध्दान्त' नावाचा ग्रंथ रचला. ६६५ साली याने 'खंडखाद्यक' नावाचा दुसरा एक ग्रंथ रचला. या ग्रंथात त्याने ज्योतिषविषयक गणना पध्दतीचे सोपे नियम सांगितले. हा ग्रंथ आर्यभट्टाच्या एका लुप्त झालेल्या ग्रंथाच्या आधारे त्याने रचला असे म्हणतात. पण पहिल्या आर्यभट्टाने चंद्रग्रहणविषयक जो सिध्दान्त दिलेला आहे त्यावर 'आर्य-सिध्दान्ता'च्या अकराव्या अध्यायात याने फार कडक टीका केली. आर्यभट्टाप्रमाणेच ब्रह्मगुप्तदेखील गणितशास्त्रात अत्यंत पारंगत होता.

# नागार्जुन

प्राचीन काळी असे अनेक थोर पुरुष होऊन गेले की ज्यांच्या नावाखेरीज दुसरी कसलीही माहिती आपल्याला नाही. नागार्जुन हा देखील अशाच व्यक्तींपैकी एक होय. तो एक बौध्द दार्शनिक होता एवढेच आपल्याला ठाऊक आहे. तसे पाहिल्यास नागार्जुन नावाच्या आणखी दोन-तीन व्यक्ती होऊन गेल्या.

पण या ठिकाणी आपण ज्या नागार्जुनाचा विचार करीत आहोत तो एक असामान्य प्रतिभेचा थोर बौध्द दार्शनिक होता. त्याने बौध्द तत्त्वज्ञानाच्या इतिहासात एका नव्या युगाचा प्रारंभ केला आणि त्यास एक नवीन वळण लावले. त्याने बौध्द तत्त्वज्ञानातील माध्यमिक मताचे प्रतिपादन केले. यास शून्यवाद असेही म्हणतात. बौध्द धर्माच्या महायान पंथाच्या दोन शाखा झालेल्या होत्या—माध्यमिक आणि योगाचार. यापैकी माध्यमिक शाखेचा पाया नागार्जुनाने घातला असे म्हणतात.

प्राचीन काळातील प्रसिध्द शास्त्रज्ञ नागार्जुन तो हाच असेही काहींचे मत आहे. तिबेटात तर देवाप्रमाणे याची पूजा करण्यात येते. काहींच्या मते हा मोठा चित्रकार होता, तर काहींच्या मते तो प्रसिध्द लेखक होता.

'किमया' हा शब्द तुम्ही ऐकला असेलच. तांब्याचे सोने बनविणे म्हणजे किमया. ही चमत्कृती शिकण्यासाठी शेकडो वर्षांपासून लाखो लोक प्रयत्न करीत आले आहेत. ही विद्या नागार्जुनाला माहिती होती, असे म्हणतात. याच संदर्भात त्याचे नाव श्री प्रफुल्लचंद्र राय यांच्या 'भारतीय रसायनशास्त्राचा इतिहास' या ग्रंथात आले आहे.

डॉ० राधाकृष्णन यांनी आपल्या पुस्तकात त्याच्याबद्दल लिहिले आहे—नागार्जुन दक्षिण भारतातील ब्राह्मण होता. इं० स० ४०५ साली कुमारजीवाने चिनी भाषेत त्याचे चरित्र लिहिले.

इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात दक्षिण कोसलमध्ये ( विदर्भ ) नागार्जुनाचा जन्म झाला असे त्यांचे मत आहे. तर तो याच्याही अगोदर होऊन गेला असे काही लोकांचे मत आहे.

तिबेटच्या दलाई लामाजवळ हिंदुस्तानच्या प्राचीन इतिहासाचा जो वृत्तांत आहे, त्यात दिलेल्या माहिती प्रमाणे नागार्जुन याच्याही पूर्वी म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वी, ख्रि० पू० ५६ मध्ये होऊन गेला, असे शरच्चंद्र दास यांचे मत आहे.

चिनी यात्रेकरू हुएनत्संग याने लिहिले आहे की, बुध्दाच्या निर्वाणानंतर चारशे वर्षांनी नागार्जुन दक्षिण कोसलमध्ये ( विदर्भ ) होऊन गेला. तो 'बोधिसत्त्व' होता म्हणजेच त्याला बोध, ज्ञान झालेले होते. इ० स० ३०० च्या सुमारास तो होऊन गेला, असे डॉ० विद्याभूषण मानतात. ते काही असो; तो पंधराशे वर्षांपूर्वी होऊन गेला हे खरे. कारण त्याने जी मते मांडली त्यांचाच त्यानंतरच्या ग्रंथांमध्ये परामर्ष घेतलेला आहे.

त्याच्या मतप्रणालीला 'माध्यमिक' म्हणतात. याचा अर्थ आहे मधला मार्ग; मधली वाट. सारनाथमधील आपल्या पहिल्या उपदेशात बुध्दाने 'मध्यम मार्ग' म्हणजेच मधली वाट स्वीकारण्यास सांगितलेले होते. त्याने सांगितले होते की जीवनात दोन मार्ग आहेत. त्यापैकी एक मार्ग, अतिशय विलासाचा आहे आणि दुसरा मार्ग कठोर तपश्चर्येचा आहे. या दोन्ही मार्गांखेरीज आणखी एक तिसरा मार्ग आहे. तो अतिशय विलासाचा नाही की कठोर तपश्चर्येचा नाही, तर या दोन्ही मार्गांच्या मधला मार्ग आहे. पण माध्यमिक मताच्या पुरस्कर्त्यांनी जो मधला मार्ग सांगितला तो बुध्दाच्या मध्यम मार्गाहून भिन्न आहे. माध्यमिक मतानुसार एखाद्या वस्तूचे अस्तित्व प्रतिपादनही करता येत नाही किंवा तिचे अस्तित्व नाकारताही येत नाही. एखाद्या वस्तूचा उत्पाद (निर्मिती) सिध्द करता येत नाही किंवा तिचा उच्छेदही (विनाश) सिध्द करता येत नाही. थोडक्यात म्हणजे माध्यमिक मत जगास सत्य मानीत नाही की असत्य मानीत नाही. मध्यम मार्गाचा उपदेश देताना बुध्दाने नैतिक बाजूवर भर दिला तर माध्यमिक मताने आध्यात्मिक बाजूवर भर दिला.

नागार्जुनाच्या या माध्यमिक मताला शून्यवाद देखील म्हणतात. कारण जग आणि शून्यता यात काही फरक नाही असे नागार्जुन मानीत असे.

नागार्जुनाच्या जीवनाविषयी आपल्याला फारच थोडी माहिती आहे. राजा यज्ञश्री गौतमपुत्र (इ० स० १६६ ते १९६) हा त्याचा मित्र होता. असे म्हणतात की नागार्जुनाच्या तोडीचा शास्त्रज्ञ त्या काळी नव्हता.

बालपणी नागार्जुन इतका हुशार होता की, कित्येक हजार पाने असलेला त्रिपिटक ग्रंथ त्याने ९० दिवसात पाठ केला होता. आणि इतके करूनहि त्याचे समाधान झाले नाही म्हणून तो हिमालयात राहाणाऱ्या एका अतिशय वृध्द भिक्षूकडे गेला. त्याच्याकडून त्यास 'महायान सत्र' मिळाले नंतर उरलेले आयुष्य त्याने दक्षिण भारतातील 'श्री शैलम' येथे घालविले. श्री शैलमला त्याने बौध्द धर्माचे विशाल विद्यालय बनविले. नागार्जुन नालन्दा येथे देखील काही वर्षे राहिला असा उल्लेख तिबेटी ग्रंथांतून आढळतो. चिनी यात्रेकरू हुएनत्संगने लिहिले आहे—जगाला प्रकाशमान करणारे चार सूर्य होऊन गेले. त्यांच्यापैकी नागार्जुन हा एक सूर्य आहे. बाकीचे तीन आहेत—अश्वघोष, कुमारलब्ध आणि आर्यदेव.

नागार्जुनाच्या कित्येक ग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतर झाले. त्यांची संख्या सुमारे वीस आहे. भारतात त्यातील एकहि ग्रंथ उपलब्ध नाही ही आश्चर्याची गोष्ट आहे. परंतु चिनी भाषेतील ग्रंथ मात्र उपलब्ध आहेत. नागार्जुनाने आपला मित्र यज्ञश्री यास काही पत्रे लिहिली होती. ती 'सुहृल्लेख' या नावाने प्रसिध्द आहेत. प्राचीन चिनी यात्रेकरू ई-त्सिंग याने लिहिले आहे की, भारतातील मुले हे पुस्तक तोंडपाठ करीत. यात नीतिविषयक उपदेश होते.

चीन व जपान या देशांपर्यंत नागार्जुनाचे विचार पोहोचले. तेथे त्यांना 'सानलुन' किंवा 'सान रेन' असे म्हणतात. याचा अर्थ आहे 'तीन पुस्तके.' या पुस्तकांपैकी पहिले पुस्तक नागार्जुनाचे आहे. मुळात संस्कृतमध्ये असलेले हे पुस्तक रशियाचे प्राध्यापक श्चेर्बात्सकी यांनी १९२७ साली शोधून काढले आणि प्रसिध्द केले. इ० स० ४०९ मध्ये कुमारजीवाने याचा चिनी भाषेत अनुवाद केला होता. या पुस्तकात ४०० श्लोक आहेत. दुसऱ्या

पुस्तकाचे नाव आहे—बारा रस्ते. ते देखील नागार्जुनानेच लिहिलेले आहे. मूळ संस्कृत ग्रंथ उपलब्ध नाही. पण त्याचा चिनी अनुवाद मिळतो. तिसऱ्या पुस्तकाचे नाव आहे—'शत-शास्त्र.' ते नागार्जनाचा शिष्य आर्यदेव याने लिहिलेले आहे. 'शिरा' शाखेचे लोक नागार्जुनाचा चौथा ग्रंथ 'शिह लुन' असल्याचे मानतात. नागार्जुनाचा ग्रंथ चीनला पोहोचल्यावर अनेक व्यक्तींनी त्याची मते मान्य केली. उदा० ताओशेंग, तान-चि, सेंग-लांग वगैरे. इसवी सनाच्या सातव्या शतकात चि-त्सांगचा कोरियामधील विद्यार्थी एक-वान ( लुई-कुआन ) नागार्जुनाची मतप्रणाली जपानात घेऊन गेला. नारा येथील ग्वांगौजी मठात इ० स० ६२५ सालापासून ती शिकविण्यात येऊ लागली. त्याचा शिष्य चिजो आणि नंतर दो जी यांनी या मताचा आणखी प्रसार केला. यास चिनी भाषेत 'कु' 'गं' ( शून्यता ) मत म्हणतात.

नागार्जुनाच्या एका विशाल ग्रंथामुळे लोकांना आजही त्याचे नाव माहीत आहे. त्या ग्रंथाचे नाव आहे 'मूल मध्यमकारिका.' या ग्रंथावर त्याने स्वतःच अकुतोभया ही टीका लिहिली. त्याच्या मताला 'शून्यवाद' देखील म्हणतात, त्याचे कदाचित् हे कारण असावे की, आपल्या पूर्वीच्या दार्शनिकांची सर्व मते त्याने खोडून काढली आहेत. त्याने म्हटले आहे की आपण ज्यास दुःख म्हणतो ते खोटे आहे. प्रत्येक वस्तू बदलत जाते. म्हणूनच एखादी वस्तू असल्याचे म्हणता येत नाही की ती नसल्याचेही म्हणता येत नाही. अशा तऱ्हेने प्रत्येक वस्तूला नागार्जुनाने 'शून्य' करून टाकले. नागार्जुनाने सांगितले की, जग हे गंधर्वनगरी, मरीचिका, माया अथवा स्वप्न यांच्यासारखे आहे. या गोष्टी असल्याचे सांगता येत नाही की, नसल्याचेही सांगता येत नाही.

नागार्जुनाने आणखी एक गोष्ट केली. ती म्हणजे हिंदूंच्या बऱ्याचशा देवता त्याने बौध्द धर्मात आणल्या. इन्द्रास शतमन्यु, वज्रपाणि आणि शक्र करून टाकले. स्वर्गास त्रयस्त्रिंश लोक बनवून टाकले. ब्रह्माचे गुण मंजुश्री-मध्ये आहेत. सरस्वती त्याची पत्नी आहे, तशीच लक्ष्मी देखील आहे.

अवलोकितेश्वर वा पद्मपाणिमध्ये विष्णु वा पद्मनाभ याचे गुण आहेत. विरूपाक्ष हे शंकराचे एक नाव होते. एका बौध्द कथेत तो राजा झालेला आहे. गणपति विनायक व राक्षस विनांतक या रूपात आला आहे. सप्त तथागत म्हणजे सात ऋषीच होत. अजित, शाक्यमुनि आणि अवलोकितेश्वर हे बौध्दांचे त्रिदेव आहेत. इतकेच काय बुध्दाची पूजा करण्याची पध्दत देखील नागार्जुनाने हिंदूसारखी बनविली.

फार खोलात न शिरता थोडक्यात सांगावयाचे म्हणजे नागार्जुन इतका थोर तत्त्वज्ञ होता की त्याची ख्याती भारताबाहेर दूरवर पसरली. भारत व चीन यांच्या लोकांमधील संबंध ज्यांनी अधिक वाढविले त्या लोकांमध्ये नागार्जुनाचे नाव उल्लेखनीय आहे.

# समुद्रगुप्त

अशोकनंतर मौर्य साम्राज्याचे तुकडे तुकडे झाले. वायव्येकडून परकीयांची आक्रमणे होऊ लागली. शिकंदराबरोबर आलेले काही ग्रीक बॅक्ट्रियामध्ये राहिले होते. सर्वात अगोदर हेच ग्रीक भारतात आले. त्यांच्यात मिनान्दर वा मिलिन्द हा मोठा राजा होऊन गेला. त्याने बौध्द धर्म स्वीकारला होता. ग्रीकांनंतर शक आले आणि मग कुशान आले. कुशान वंशात कनिष्क हा महत्त्वाचा सम्राट होऊन गेला. त्यानेही बौध्द धर्म स्वीकारला होता. तो अतिशय पराक्रमी होता. पेशावरपासून पाटण्यापर्यंत त्याचे साम्राज्य पसरलेले होते.

कनिष्कानंतर तिसऱ्या पिढीत कुशान साम्राज्य मोडले. भारतावर पुनश्च बाहेरून आक्रमणे होऊ लागली. कनिष्काचे दुर्बळ वंशज या अराजकतेला नष्ट करू शकले नाहीत. त्याचा परिणाम असा झाला की, उत्तर भारताचे राजकीय ऐक्य नाहीसे झाले आणि कित्येक लहान लहान राज्ये स्थापन झाली. ही राज्ये आपापसात भांडत असत.

अशा परिस्थितीत चौथ्या शतकाच्या सुरवातीला भारतात गुप्त वंश उदयास आला. श्रीगुप्त किंवा गुप्त हा या वंशातील पहिला राजा होता. या वंशातील तिसरा राजा चन्द्रगुप्त हा अतिशय कर्तृत्वशाली होता. त्याने आपल्या राज्याच्या सुव्यवस्थेकडे विशेष लक्ष पुरविले.

गुप्तकालीन एका लेखावरून कळते की समुद्रगुप्तास लहान-मोठे अनेक भाऊ होते. त्याचे कर्तृत्व पाहून त्याच्या वडिलांनी त्यास युवराजपद दिले आणि आपल्यानंतर त्याच्याकडे राज्यसूत्रे सोपविण्याचे निश्चित केले. पहिला चन्द्रगुप्त इ० स० ३४० च्या सुमारास मरण पावला आणि त्याच्यानंतर समुद्रगुप्त गादीवर आला.

भारताच्या इतिहासात समुद्रगुप्ताला मोठे मानाचे स्थान आहे. सर्व राजे जोपर्यंत एकत्र जमून परकीय आक्रमणाचा प्रतिकार करीत नाहीत, तोपर्यंत देशाचे संरक्षण आणि देशाची प्रगती होणे अशक्य आहे, हे समुद्रगुप्ताने गादीवर येताच ओळखले.

काही विद्वानांच्या मते चन्द्रगुप्तानंतर त्याचा दुसरा एक मुलगा 'काच' याने देखील काही दिवस राज्य केले. त्याचे कारण हे की, समुद्रगुप्ताच्या नाण्यांसारखीच सोन्याची आणखीही काही नाणी मिळतात आणि त्या नाण्यांवर 'काच' असा शिक्का आहे. 'काच' समुद्रगुप्ताचा भाऊ असावा असे स्मिथचे मत आहे. पण स्मिथचे म्हणणे मान्य करता येत नाही. या नाण्यांच्या मागच्या बाजूला 'सर्वराजोच्छेता' असे कोरलेले आहे. ही समुद्रगुप्ताची पदवी आहे. समुद्रगुप्ताचेच पहिले नाव 'काच' असे असण्याची शक्यता आहे. विवाहाच्या वेळी आपल्या घराण्यातील नावांना साजेसे 'समुद्रगुप्त' हे नाव त्याने धारण केले असावे. कदाचित् समुद्र ओलांडून संपादन केलेल्या दिग्विजयानंतर त्याने हे नाव घेतले असावे.

समुद्रगुप्ताचे महान कार्य म्हणजे त्याने केलेला दिग्विजय होय. त्यामुळे प्रयाग व मगध यांच्यामधील गंगेच्या काठचे प्रांत आणि अयोध्येचे राज्य मिळून बनलेल्या लहानशा राज्याचे एका विशाल साम्राज्यात रूपांतर झाले. गादीवर आल्यानंतर थोड्याच दिवसांनी तो दिग्विजयासाठी बाहेर पडला. प्रयागच्या किल्ल्यात असलेल्या अशोकस्तंभावर याचाही एक शिलालेख कोरलेला आहे. त्यास प्रयागचा 'प्रशस्ती लेख' म्हणतात.

सर्वात अगोदर आर्यावर्तातील नऊ राजांशी समुद्रगुप्ताने युध्द केले. आणि त्यांचा सपशेल पराभव करून त्यांची राज्ये आपल्या साम्राज्यात विलीन करून टाकली.

त्यानंतर समुद्रगुप्त दक्षिणेकडे वळला पण दक्षिणापथातील राज्यांविरुध्द युध्द पुकारणे इतके सोपे काम नव्हते. त्यासाठी समुद्रगुप्ताच्या मूळ राज्याच्या व दक्षिणापथातील राज्याच्या मध्ये असलेल्या सर्व राज्यांना जिंकणे जरूरीचे होते. समुद्रगुप्ताने ती राज्येही जिंकली.

दक्षिणापथातील राज्ये समुद्रगुप्ताच्या मूळ राज्याहून बरीच लांब होती. म्हणून त्यांच्यापासून समुद्रगुप्ताला फारसे भय नव्हते. समुद्रगुप्ताने त्यांची संपत्ती घेतली पण राज्य घेतले नाही. अगोदर त्यांचा पराभव करून समुद्रगुप्ताने

त्यांना कैद केले. पण त्यानंतर त्यांची राज्ये त्यांना परत देऊन टाकली. हे १२ राजे होते.

समुद्रगुप्ताच्या विजयाला भिऊन प्रत्यन्ताच्या राज्यांनी त्यास खंडणी देणे मान्य केले. समुद्रगुप्तास खुष ठेवण्याचे प्रयत्न ते करू लागले. हे पाच प्रत्यन्त राजे सीमा प्रांतांचे होते.

या सीमान्त राज्यांप्रमाणेच, समुद्रगुप्ताचे सामर्थ्य पाहून त्याला प्रतिकार न करणेच शहाणपणाचे आहे असे वाटणारी इतर राज्ये होती. ही राज्ये एका दृष्टीने पाहिल्यास पंचायती राज्येच होती आणि प्राचीन काळच्या स्वतंत्र जाती त्यात राहात होत्या. त्यांचे सामर्थ्य व लढाऊ वृत्ती प्रसिद्ध होती. पंजाब, राजपुताना आणि मध्यप्रांत ही यांची मुख्य वसतिस्थाने होती.

याखेरीज बहुधा, भारताच्या भौगोलिक सीमांबाहेर असलेलीही काही राज्ये होती. समुद्रगुप्ताचा दिग्विजय पाहून त्यांनी त्याच्याशी मैत्री केली. प्रत्यन्त राजांप्रमाणेच हे देखील समुद्रगुप्तासमोर झुकले आणि कर, खंडणी वगैरे देऊन त्यास संतुष्ट ठेऊ लागले.

अशा तऱ्हेने समुद्रगुप्ताच्या दिग्विजयाने गुप्त साम्राज्याचा फार विस्तार झाला. समुद्रगुप्ताच्या साम्राज्यात उत्तरप्रदेश, बिहार, आणि बहुधा पश्चिम बंगाल देखील, हे प्रांत तर होतेच पण याशिवाय त्यांचे मांडलिक असणाऱ्या राज्यांची संख्यादेखील थोडी थोडकी नव्हती. मध्य भारत व मध्यप्रांतातील वन्य राज्ये, दक्षिणापथातील राज्ये, सीमाप्रांतांतील प्रत्यन्त राज्ये आणि पंजाब, राजपुताना व मध्य भारतातील गणराज्ये या सर्वांवर त्याची सत्ता स्थापन झाली होती. या खेरीज सिंहल वगैरे बेटांवर देखील त्याचे वर्चस्व होते.

या दिग्विजयानंतर समुद्रगुप्ताने अश्वमेध यज्ञ केला. प्राचीन काळी दिग्विजय केल्यानंतर या विजयाच्या घोषणेसाठी अश्वमेध यज्ञ करण्यात येत असे. विजयी राजा एक घोडा सोडत असे. तो घोडा प्रत्येक राज्यात

जात असे. त्या घोड्याच्या पाठोपाठ एक विशाल सेना देखील जात असे. तो घोडा जर कोणी पकडला तर अश्वमेध यज्ञ करणारा राजा त्याच्याशी युध्द करीत असे. हा यज्ञ करू शकेल असा पराक्रमी राजा समुद्रगुप्तापूर्वी कित्येक वर्षे झाला नव्हता. या प्रसंगी समुद्रगुप्ताने जी नाणी प्रचलित केली त्यांच्या एका बाजूला अश्वमेधाचा घोडा कोरलेला होता आणि दुसऱ्या बाजूला समुद्रगुप्ताच्या राणीची प्रतिमा होती, शिवाय 'अश्वमेध पराक्रम' असे लिहिलेले होते. या प्रसंगी त्याने खूप दान-धर्म केला.

पण कोणत्याही राजाची थोरवी आणि कीर्ती त्याच्या विजयावर वा सैन्यबळावर अवलंबून नसते. कलिंग विजयामुळे अशोक जितका प्रसिध्द झाला त्याहून अधिक तो, युध्दनीती सोडून दिल्यामुळे विख्यात झाला. त्याचप्रमाणे समुद्रगुप्तामध्येही असे काही गुण होते की ज्यामुळे त्याचे नाव अमर झाले आहे. तो युध्दकुशल होताच पण त्याचबरोबर शास्त्र, साहित्य, कला, संगीत यांचाही जाणता होता. 'प्रयाग प्रशस्ति' मध्ये लिहिलेले आहे—आपल्या ज्ञानाने देवांचा गुरू बृहस्पति यास आणि संगीत व ललितकलांमधील नैपुण्याने नारद आणि तुम्बरू यास तो खाली पहावयास लावीत असे.

विद्वान व कलावंत यांचा तो आदर करीत असे. आणि त्यांच्या सहवासात राहात असे. त्याच्या अनेक काव्यांमुळे त्याला 'कविराज' म्हणत असत.

समुद्रगुप्त संगीताचा चाहता होता. वीणावादनात तो निपुण होता. ही गोष्ट तत्कालीन नाण्यांवरून दिसून येते. या नाण्यांवर, वीणा वाजवीत असलेल्या समुद्रगुप्ताचे चित्र आहे.

समुद्रगुप्त विद्वानांना फार मान देत असे. त्याच्या दरबारात कवी, कलाकार आणि संगीतज्ञ यांचा नेहमी आदर होत असे आणि त्यांना समुद्रगुप्ताकडून प्रोत्साहन मिळत असे.

समुद्रगुप्ताच्या शासनकाली प्रजेला, हवा तो धर्म स्वीकारण्याचे स्वातंत्र्य होते. समुद्रगुप्ताने बौध्द ग्रंथांचे अध्ययन केले होते. असे म्हणतात

की वसुबंधु नावाच्या एका बौध्द व्यक्तीस त्याने मंत्रीपद दिलेले होते. श्रीलंकेच्या बौध्द शासकांना त्याने बोधगयेमध्ये एक विहार बांधण्याची परवानगी दिली होती.

इतिहासात गुप्त वंशाची कारकीर्द 'सुवर्णयुग' म्हणून ओळखली जाते. याचे कारण हेच की, या कालखंडात उत्तर भारत एकसूत्रात गुंफला गेला. शासनव्यवस्था अतिशय कौशल्याने करण्यात आली. न्यायव्यवस्था उत्तम होती. लोक नियमांचे पालन करीत असत. गुप्त शासकांनी जनतेच्या कल्याणाची अनेक कामे केली.

भारतात एकी निर्माण करून देशाच्या समृध्दीचा पाया समुद्रगुप्ताने घातला. लहानपणापासूनच त्याचे कर्तृत्व दिसू लागले होते. राजपुत्र असतानाच त्याने आपल्या शौर्याने व नीतिनैपुण्याने सर्वांना चकित करून टाकले होते.

समुद्रगुप्ताने ४० वा ५० वर्षे राज्य केले. तो एक थोर शासक होता. त्याचे व्यक्तिमत्व अतिशय प्रभावी होते आणि त्याच्यामध्ये कित्येक असामान्य गुण होते. समुद्रगुप्त त्या युगाचा केवळ पराक्रमी योध्दाच होता असे नव्हे तर उच्च दर्जाचा राजनीतिज्ञ देखील होता. त्याचबरोबर तो सुसंस्कृत आणि अतिशय विद्वान देखील होता. स्मिथने त्याला 'भारतीय नेपोलियन' म्हटले आहे. आणि समुद्रगुप्ताचा दिग्विजय लक्षात घेता ही पदवी अगदी योग्य वाटते.

# कुमारजीव

भारताने चीनला बौध्द धर्म दिला आणि भारतीय संस्कृतीचा प्रचार तेथे केला. याचे अधिकांश श्रेय, ज्या भारतीय व चिनी विद्वानांनी बौध्द धर्माचा व भारतीय संस्कृतीचा चीनमध्ये प्रचार केला त्या विद्वानांना आहे.

या भारतीय व चिनी यात्रेकरूंमध्ये आणि विद्वानांमध्ये कुमारजीवाचे नाव प्रथम घ्यावे लागेल. त्याने चीनमध्ये बौध्द धर्माच्या प्रचाराचे कार्य तर केलेच पण त्याचबरोबर दोन्ही देशांमध्ये मैत्री निर्माण करण्याचे कार्य देखील केले. इसवी सनानंतर चौथ्या शतकात कुमारजीव होऊन गेला.

कुमारजीवाच्या वडिलांचे नाव कुमाररायण असे होते. एका थोर घराण्यात कुमाररायणाचा जन्म झाला होता. भारतातील एका राज्याचे ते प्रधान होते. काही कारणांमुळे त्यांनी प्रधानकी सोडून दिली होती. त्यानंतर भारत सोडून ते कूची नगराकडे निघून गेले होते.

हे कूची नगर मध्य आशियात तारिम नदीच्या उत्तरेला होते. तारिम खोऱ्याच्या दक्षिणेला खोतान नगर होते. या दोन्ही नगरांहून चीनला जाण्याची वाट होती. ही दोन्ही नगरे त्या वेळी बौध्द धर्माची केंद्रे समजली जात होती. चिनी यात्रेकरू फाहियान याने आपल्या प्रवासवर्णनात खोतान व कूची या दोन्ही नगरांचे मोठे मनोरंजक वर्णन केले आहे.

त्या काळी प्रवास करणे अतिशय अवघड व त्रासाचे होते. त्यातून भारताबाहेर जायचे म्हणजे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असे. अनेक नद्यानाले व पर्वत ओलांडून जावे लागत असे. प्रवासाच्या या अडचणी पाहता कुमाररायण यांनी केलेला कूचीचा प्रवास मोठ्या धाडसाचा होता यात शंकाच नाही.

कूचीला गेल्यावर कुमाररायण तेथील एका बौध्द विहारात राहू लागले. हळूहळू त्यांच्या योग्यतेची व विद्वतेची ख्याती पसरू लागली. त्यांची ख्याती ऐकून कूचीच्या राजाने त्यांना राजगुरू होण्याची विनंती केली. बराच विचार केल्यावर कुमाररायण यांनी राजाची विनंती मान्य

केली. आणि अशा तऱ्हेने ते कूचीच्या राजाचे राजगुरू बनले. कूचीच्या राजघराण्यातील 'देवी' नावाच्या एका स्त्रीशी त्यांचा विवाह झाला. काही कालानंतर त्यांना एक मुलगा झाला. हाच तो कुमारजीव.

कुमारजीवाच्या जन्मानंतर थोडयाच वर्षांनी कुमाररायण मृत्यू पावले. कुमारजीवाची आई बौध्द भिक्षुणी झाली. कुमारजीव थोडा मोठा झाल्यावर अध्ययनासाठी त्याची आई त्याला काश्मीरला घेऊन गेली. त्या काळी काश्मीर हे बौध्द विद्वानांचे केन्द्र समजले जात होते. तेथे बन्धुदत्त नावाच्या काश्मीरी विद्वानाजवळ कुमारजीवाने संस्कृत भाषेचा व बौध्द तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला. थोड्याच वर्षांत कुमारजीवाच्या पाण्डित्याची ख्याती सर्वत्र पसरली. पूर्व तुर्कस्तानमधून अनेक बौध्द धर्मानुयायी त्याच्याकडे येऊन बौध्द धर्माची दीक्षा घेऊ लागले.

काश्मीरहून माघारी जाताना कुमारजीव काशगरला गेला. तेथे बुध्दयश याच्याशी त्याची गाठ पडली आणि लवकरच दोघेही दृढ मित्र बनले. त्या वेळी बुध्दयश हा काशगरच्या राजमहालात राहात असे. बौध्द तत्त्वज्ञानाचा त्याने खूप अभ्यास केला होता. कुमारजीव आणि बुध्दयश या दोघांनी मिळून काही बौध्द शास्त्रांचे अध्ययन केले. त्यामुळे कुमारजीवाच्या ज्ञानात भर पडली. येथे अध्ययन पुरे करून कुमारजीव कूचीला परत गेला. कूचीमध्ये कुमारजीव फार दिवस निवांतपणे राहू शकला नाही. कूचीचा राजा आणि चिनी सम्राट यांच्यामध्ये काही कारणांवरून वैमनस्य निर्माण झाले. चीनच्या सम्राटाने मोठी सेना घेऊन कूचीवर हल्ला केला. कूचीचे लोक मोठ्या शौर्याने लढले पण अखेर त्यांचा पराभव झाला. आणि कूचीचे राज्य चिनी साम्राज्यात विलीन करण्यात आले.

या युध्दात चिनी सैनिकांनी अनेक लोकांना पकडले होते. या कैद्यांमध्ये कुमारजीव देखील होता. ही घटना इ० स० ३८३ सालातील आहे. या कैद्यांना चिनी लोक आपल्याबरोबर चीनला घेऊन गेले. पण कैदी म्हणून कुमारजीव तेथे पोहोचण्यापूर्वीच त्याची ख्याती तेथे पोहोचली होती. म्हणून

कुमारजीवाला मृत्यूची शिक्षा मिळाली नाही. पण चीनमधील लिहांग-चो प्रदेशाच्या राज्यपालाकडे अठरा वर्षे राहणे त्याला भाग पडले.

कुमारजीव चीनला गेल्यानंतर तेथे बौध्द धर्माच्या प्रसाराचे नवे युग सुरू झाले. त्याच्यापूर्वीच्या अनुवादकांनी बौध्द ग्रंथांचा चिनी भाषेत जो अनुवाद केला होता तो शुध्द नव्हता. कुमारजीवाने बौध्द तत्त्वज्ञानातील सर्व शाखांचे सखोल अध्ययन केलेले होते. म्हणून बौध्द ग्रंथांचा अनुवाद अधिक चांगल्या तऱ्हेने करणे त्यास सहज शक्य होते. संस्कृत व चिनी या दोन्ही भाषा त्याला चांगल्या अवगत होत्या. बौध्द धर्मातील गर्भितार्थ चिनी भाषेत जसाच्या तसा आणण्यात त्यास पूर्वीच्या अनुवादकांपेक्षा अधिक यश मिळाले. म्हणूनच त्याने केलेले बौध्द ग्रंथांचे अनुवाद चीनमध्ये अधिक विश्वसनीय समजले जातात.

बुध्दाच्या मृत्यूनंतर बौध्द धर्माच्या दोन शाखा झाल्या होत्या. एक महायान आणि दुसरी हीनयान. या दोन्ही शाखांच्या उपशाखा झाल्या होत्या. महायानची एक उपशाखा 'सर्वास्तिवाद' कुमारजीवाला मान्य होती. त्याने या शाखेच्या सुमारे १०० सुप्रसिध्द ग्रंथांचा चिनी भाषेत अनुवाद केला. 'विनयपिटक' हा त्याचा पहिला अनुवाद आहे. वास्तविक पाहता हा ग्रंथ म्हणजे महायान शाखेचा प्रसिध्द ग्रंथ 'योगाचार-भूमि-शास्त्र' याच्या एका अध्यायाचा अनुवाद आहे. कुमारजीवाच्या पूर्वी दोन भारतीय भिक्षूंनी या ग्रंथाचा चिनी भाषेत अनुवाद केला होता. पण त्यात बऱ्याच चुका होत्या. कुमारजीवाचा अनुवाद मूळ ग्रंथास धरून होता. यानंतर त्याने संस्कृत भाषेतील 'ब्रह्मजाल सूत्र' या ग्रंथाचा चिनी भाषेत अनुवाद केला. मूळ संस्कृत ग्रंथ आज उपलब्ध नाही. पण चीनच्या बौध्दांनी त्याची बरीच प्रशंसा केलेली आहे.

'महाप्रज्ञा-परिमिता-सूत्र' याचा अनुवाद करण्यास कुमारजीवाला तीन वर्षे मेहनत करावी लागली. याच वर्षी कुमारजीवाने 'देशभूमि-विभाषा शास्त्र' याचाही चिनी भाषेत अनुवाद केला. हा ग्रंथ म्हणजे 'देशभूमि

सूत्र' यावरील भाष्य होय. मृत्यू-पूर्वी कुमारजीवाने 'सूत्रालंकार शास्त्रा' चा देखील चिनी भाषेत अनुवाद केला. इतकेच नव्हे तर चीनमध्ये प्रचलित असलेल्या 'ताओ' धर्माचा देखील कुमारजीवाने आपल्या एका ग्रंथात परामर्ष घेतला आहे.

ग्रंथांच्या अनुवादाबरोबरच बौध्द धर्माच्या महायान शाखेचा प्रचार करण्याचे कार्यदेखील कुमारजीव करीत असे. त्यासाठी तो प्रवचने करीत असे. कित्येक चिनी बौध्द त्यास आपला गुरू समजत.

संस्कृत भाषेतून चिनी भाषेत बौध्द ग्रंथांचा अनुवाद करण्याच्या कामी दोन काश्मीरी विद्वानांनी कुमारजीवास बरीच मदत केली. त्या दोन काश्मीरी विद्वानांची नावे होती—विमलाक्ष आणि पुण्यत्रात. पुण्यत्रात चीनमध्ये एकच वर्ष राहिला पण विमलाक्ष मात्र आठ वर्षे कुमारजीवासवे बौध्द ग्रंथांचा अनुवाद करण्याचे कार्य करीत राहिला.

बुध्दयशाचे नाव वर आले आहेच. काशगरमध्ये त्यास जेव्हा कळले की कुमारजीव कैद झाला आहे, तेव्हा त्यास अत्यंत वाईट वाटले. त्याने चीनमध्ये जाण्याचे ठरविले. अगोदर तो कूची येथे गेला, आणि तेथे काही दिवस थांबून चीनला गेला. तेथे पत्ता काढीत तो अखेर कुमारजीवाकडे पोहोचला. बुध्दयशाला पाहून कुमारजीवाला फार आनंद झाला. दोघे मित्र कडकडून भेटले. नंतर बुध्दयश तेथेच राहिला आणि कुमारजीवाबरोबर बौध्द ग्रंथांचा चिनी भाषेत अनुवाद करू लागला. बौध्द धर्माचा प्रचार करण्याच्या कामीदेखील तो कुमारजीवास साहाय्य करीत राहिला.

कुमारजीव हयात होता तोपर्यंत बुध्दयश चीनमध्येच राहिला. कुमारजीवाच्या मृत्यूनंतर तो परत काश्मीरला आला. चीनहून भारताला परतताना चीनच्या सम्राटाने त्यास काही भेटी दिल्या. पण बुध्दयशाने एकही वस्तू घेतली नाही. त्याने चिनी सम्राटाला स्पष्टपणे सांगितले, 'मी बौध्द श्रमण आहे आणि मी भेटीदाखल कोणतीही वस्तू घेणे योग्य नाही.'

कुमारजीवाने आयुष्यभर महायानच्या तत्त्वांचा प्रचार केला. विदेशात राहून भारतीय संस्कृती व बौध्द धर्म यांचा प्रचार करीत असताना त्यास मृत्यू आला. त्याचे साधे जीवन आपण विसरता कामा नये. तो नेहमी म्हणत असे की, माझ्या कार्याचे अनुकरण करा. माझ्या जीवनाला आदर्श समजून त्याप्रमाणे वागू नका. कमळ चिखलात उगवते. परंतु प्रेम कमळावर करा. चिनी व भारतीय जनता यांच्यामध्ये मैत्रीचे व प्रेमाचे सबंध निर्माण करणे हेच कुमारजीवाच्या आयुष्याचे ध्येय होते. आणि अखेरपर्यंत या ध्येयाच्या पूर्तीसाठी त्याने प्रयत्न केला.

भारतातून चीनला जितके प्रवासी व विद्वान गेले, त्यापैकी बहुतेक काश्मीरमधील होते. या विद्वानांनी आणि प्रवाशांनी चीनमध्ये बौध्द धर्माचा प्रचार केला आणि भारतीय संस्कृतीविषयी आदर निर्माण केला.

# चन्द्रगुप्त विक्रमादित्य

विक्रमादित्याचा अर्थ आहे 'सूर्यासारखा तेजस्वी.' गुप्त वंशाचा पाचवा सम्राट चन्द्रगुप्त खरोखरीच सूर्यासारखा तेजस्वी आणि अतिशय कर्तृत्वशाली होता. इतिहासात गुप्त कालखंड 'सुवर्णयुग' म्हणून ओळखला जातो. समुद्र-गुप्ताची माहिती तुम्ही वाचलीच आहे. दुसरा चन्द्रगुप्त याच समुद्रगुप्ताचा मुलगा होता.

दुसरा चन्द्रगुप्त इ० स० ३८० मध्ये गादीवर बसला. गादीवर येताच आपल्या पराक्रमी वडिलांप्रमाणेच त्याने देखील राज्यविस्ताराकडे लक्ष दिले. माळवा आणि गुजरात येथील परकीय राजांना घालवून देण्याचे त्याने केव्हाच ठरवले होते म्हणून गादीवर येताच त्याने या दोघांवर चालून जाण्याची तयारी केली.

चन्द्रगुप्त अतिशय नीतिनिपुण होता. त्याच्या राज्याच्या दक्षिणेस आणि माळवा व गुजरातच्या पूर्वेस वाकाटक वंशातील राजा, दुसरा रुद्रसेन याचे राज्य होते. वाकाटकांचे राज्य फार प्रबळ होते. वाकाटकांशी सलोखा केल्याखेरीज जर माळवा आणि गुजरातवर आक्रमण केले तर वाकाटकांचा राजा आपल्या मोहिमेत कदाचित् अडथळे निर्माण करील याची चन्द्रगुप्ताला जाणीव होती. म्हणून अगोदर वाकाटकांशी सलोखा करणे चन्द्रगुप्तास जरूरीचे वाटले. त्याने प्रभावती नावाच्या आपल्या मुलीचा रुद्रसेनाशी विवाह लावून दिला. त्यामुळे वाकाटकाचा राजा त्याचा नातेवाईक आणि मित्र बनला. त्यानंतर निश्चिन्त होऊन चन्द्रगुप्ताने माळवा आणि गुजरातवर हल्ला केला. त्याने दोन्ही राज्यांच्या शक राजांचा पराभव केला. अशा त-हेने भारतात कित्येक शतकांपासून पाय रोवून बसलेल्या परकीय राज्यकर्त्यांना त्याने हाकलून दिले.

दिल्लीजवळ महरौली नावाच्या गावापाशी कुतुबमिनार आहे. या कुतुब-मिनाराच्या शेजारीच एक लोहस्तंभ आहे. चन्द्र नावाच्या एका राजाने बंगालमध्ये कित्येक राजांचा पराभव केला आणि त्यानंतर पश्चिमेस सिंधु नदी ओलांडून अफगाणिस्तान व हिन्दुकुश पर्वताच्या पलीकडे वाल्हीकच्या

( बॅक्ट्रिया ) राजाचादेखील पराभव केला असे त्यावर कोरलेले आहे. इतिहासात जो पुरावा मिळतो त्याच्या आधारे, पूर्व बंगालमध्ये आणि पश्चिमेस वाल्हीकपर्यंत पराक्रम गाजवणारा हा चन्द्र नावाचा सम्राट म्हणजे गुप्त वंशाचा चन्द्रगुप्त विक्रमादित्यच होय असे मानावयास काहीच हरकत नाही.

चन्द्रगुप्ताने बंगाल, माळवा, गुजरात आणि सौराष्ट्र हे सर्व प्रदेश आपल्या साम्राज्यास जोडले. त्या वेळी बंगाल हा सर्वात अधिक सुपीक प्रदेश होता. बंगाल साम्राज्याला जोडला गेल्यामुळे साम्राज्यात धनधान्याची कमतरता कधीही भासली नाही.

माळवा, गुजरात आणि सौराष्ट्र हाती आल्यामुळे अरबी समुद्राचा व्यापार त्याच्या ताब्यात आला. येथील बंदरांमधून माल, परदेशी जात असे आणि व्यापारी लोक बराच पैसा मिळवून आणीत असत. माळव्याची राजधानी उज्जयिनी व्यापाराचे केन्द्र होते. नंतर चन्द्रगुप्ताने उज्जयिनी ही आपल्या साम्राज्याची दुसरी राजधानी केली. मुख्य राजधानी मात्र पाटलिपुत्रच होती.

चन्द्रगुप्ताची कारकीर्द आणखीही एका कारणामुळे प्रसिध्द आहे. त्याच्या राजवटीतच फाहियान नावाचा प्रसिध्द चिनी प्रवासी भारतात आला होता. तो १५ वर्षे भारतात राहिला. यापैकी १० वर्षे त्याने चन्द्रगुप्ताच्या साम्राज्यात हिंडण्यात घालविली. फाहियान बौध्द भिक्षू होता आणि बौध्द धर्मग्रंथांचे अध्ययन करण्यासाठी चीनहून पायी निघून गोबीचे वाळवंट ओलांडून पेशावर मार्गे भारतात आला होता. पेशावरहून पंजाब आणि पंजाबहून मथुरा, काशी, संकाश्य, कनौज, श्रावस्ती कुशीनगर वैशाली इत्यादि नगरांचा प्रवास करीत तो पाटलिपुत्र नगरात आला. तेथे तो तीन वर्षे राहिला आणि त्याने संस्कृत भाषेचे अध्ययन केले.

फाहियानने आपल्या प्रवासाचे वर्णन 'फो-क्वो-की' पुस्तकात केले असून या वर्णनामुळे चन्द्रगुप्ताच्या वेळच्या भारतातील सामाजिक, राजकीय आणि धार्मिक परिस्थितीवर चांगलाच प्रकाश पडतो.

फाहियानच्या मते चन्द्रगुप्ताच्या साम्राज्यात ब्राह्मण धर्माचे वर्चस्व होते आणि स्वत: चन्द्रगुप्त वैष्णव धर्म मानणारा होता. पण बौध्द आणि इतर धर्माच्या अनुयायांना देखील आपापला धर्म मानण्याची पूर्ण मुभा होती. चन्द्रगुप्ताचा एक मंत्री शैव होता आणि दुसरा एक मंत्री बौध्द होता. लोक मद्यमांस घेत नसत. नगरात यांची दुकाने दृष्टीस पडत नसत. अहिंसेचा सर्वत्र बोलबाला होता. चांडाल जातीचे लोक गावाबाहेर ठेवले जात असत आणि ते अस्पृश्य समजले जात असत. चाण्डाळाचा चुकूनही स्पर्श होऊ नये म्हणून नगरात शिरण्यापूर्वी काठीचा आवाज करून आपण येत असल्याची सूचना चाण्डालाला द्यावी लागत असे.

स्वत: सम्राट चन्द्रगुप्त वष्णव होता. म्हणून साम्राज्यात हिन्दू धर्माचे वर्चस्व होते. आणि बौध्द धर्माचा ऱ्हास होत चालला होता. पंजाब आणि बंगाल भागातच काय तो बौध्द धर्माचा प्रभाव होता. फाहियान याने स्पष्ट लिहिलेले आहे की राज्यात कोणत्याही प्रकारचा धार्मिक भेदभाव करण्यात येत नव्हता. चन्द्रगुप्ताच्या राजनीतीविषयी आणि शासनव्यवस्थेविषयी फाहियान याने जे काही लिहिले आहे, त्यावरून शासनव्यवस्था अगदी चोख असल्याचे कळते.

लोकांवर करांचे असह्य ओझे नव्हते. प्रजा सुखी व संपन्न होती. प्रत्येकाला आपल्या मर्जीप्रमाणें हवा तो व्यवसाय करता येत असे. चीनमध्ये जितक्या कडक शिक्षा दिल्या जात होत्या, तितक्या कडक शिक्षा चन्द्रगुप्ताच्या साम्राज्यात दिल्या जात नव्हत्या असे फाहियानला आढळले. मोठ्यात मोठा अपराध घडला तरी त्यासाठी मृत्यूची शिक्षा देण्यात येत नसे. आणि देशद्रोहासारखा भयंकर अपराध घडला तरी त्यासाठी मोठ्यात मोठी शिक्षा म्हणजे अपराध्याचा उजवा हात कापून टाकावयाचा हीच होती. कैद्यांना शारीरिक यातना दिल्या जात नव्हत्या. राज्यात चोरी, वाटमारी यासारखे गुन्हे घडत नसत. फाहियान याने लिहिले आहे की, कित्येकदा बहुमोल वस्तू आणि ग्रंथ बरोबर घेऊन तो एकटाच निर्जन रस्त्यांवरून आणि

जंगलांमधून गेला पण कधीही कोणीही त्यास त्रास दिला नाही की त्याच्या वस्तू लुबाडल्या नाहीत.

पाटलिपुत्रात फाहियान तीन वर्षे राहिला होता. नगराचे वर्णन करताना त्याने लिहिले आहे की, अशोकने बांधलेला राजमहाल अतिशय सुरेख आहे. त्याची कलाकुसर पाहून कोणीही थक्क होईल. असे वाटते की हा महाल माणसांनी नव्हे तर देवांनी बांधला असावा. त्याने लिहिले आहे की, मगध राज्यात अनेक सुन्दर नगरे आहेत. प्रवाशांच्या सोयीसाठी धर्मशाळा आहेत. श्रीमंत लोक रुग्णालये बांधतात आणि त्यांचा सर्व खर्च स्वतः करतात. या रुग्णालयांमध्ये गरीबांना औषध व भोजन मोफत मिळते.

फाहियान याने केलेले वर्णन बरेचसे खरे असले तरी त्यात काही चुका राहिलेल्या आहेत. त्याने म्हटले आहे की चन्द्रगुप्ताची प्रजा मद्य-मांस यांचे सेवन करीत नसे आणि यांची दुकानेही नाहीत. हे म्हणणे खरे नाही. कालिदासाच्या नाटकांवरून कळते की लोक मद्यमांस घेत असत आणि या गोष्टीं वाईट समजल्या जात नसत. बाकी, राज्यात पूर्ण शांतता होती आणि शासन-व्यवस्था इतकी चांगली होती की चोरी, दरवडे, खून वगैरे गुन्हे होत नसत असे जे फाहियान याने म्हटले आहे ते मात्र खरे आहे. प्रवाशांना वाटेत लुबाडले जाण्याची भीती वाटत नसे. प्रजेचे चारित्र्य उच्च होते, लोक सत्यवादी होते आणि इमानेइतबारे वागत असत.

गुप्त सम्राटांनी सोन्याची, चांदीची व तांब्याची नाणी पाडली होती. चन्द्रगुप्त विक्रमादित्याच्या वेळच्या अनेक सुवर्णमुद्रा माळवा आणि पश्चिम भारत येथील काही जागी सापडल्या आहेत.

चन्द्रगुप्त केवळ रणधुरंधर नव्हता तर विद्वान आणि कुशल शासकही होता. त्याच्या राज्यात अनेक विद्वान, कवी आणि विद्याप्रेमी लोक राहात होते. त्याच्या दरबारातील नवरत्ने इतिहासात प्रसिध्द आहेत. कालिदासाचे नाव कोणाला माहीत नाही ! हा महाकवी, चन्द्रगुप्ताच्या नवरत्नांपैकी एक होता. अमरकोशचा रचयिता तसेच महान वैद्य, धन्वन्तरी हे देखील चन्द्रगुप्ताच्या कालीच होऊन गेले असे म्हणतात.

चन्द्रगुप्त अतिशय धार्मिक आणि विद्याप्रेमी होता. तो विद्वान आणि गुणीजनांचा आदर करणारा राजा होता. विक्रमादित्याखेरीज 'विक्रमांक' 'नरेन्द्रचन्द्र', 'सिंह विक्रम', 'सिंह चन्द्र' ही बीरुदे देखील चन्द्रगुप्ताने घेतली होती.

उरल्यासुरल्या परकीय सत्ताधीशांच्या हातून भारताला मुक्त केल्यावर चन्द्रगुप्ताने ३९ वर्षे सुखासमाधानाने शांततापूर्वक राज्य केले. गुप्तवंशाचा हा कर्तृत्वशाली थोर सम्राट इ० स० ४१४ च्या सुमारास मृत्यू पावला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा कुमारगुप्त गादीवर आला.

# कालिदास

संस्कृत महाकवी कालिदास याचे नाव तुम्ही नक्कीच ऐकले असेल. त्याने लिहिलेली 'अभिज्ञान शाकुन्तल' 'मालविकाग्निमित्र' आणि 'विक्रमोर्वशीय' ही नाटके फक्त आपल्या देशातच नव्हे तर सर्व जगात प्रसिध्द आहेत. काव्यामध्ये नाटक रम्य आहे. आणि नाटकांमध्ये 'शाकुन्तल' नाटक रम्य आहे, असे जे म्हणतात ते अगदी यथार्थ आहे.

कालिदासाने मेघदूत, कुमारसंभव आणि रघुवंश नावाची काव्ये देखील लिहिली. काही लोकांच्या मते 'ऋतुसंहार' हे काव्य देखील कालिदासानेच लिहिले आहे. आपल्या अद्वितीय प्रतिभेमुळेच कालिदासाला 'सकल कवी शिरोमणि' आणि 'कविकुलगुरू' असे संबोधून त्याचा गौरव करण्यात आला आहे.

कालिदासाच्या काव्याचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे त्या काळी प्रचलित असलेल्या सर्व शैलींमध्ये त्याने काव्यरचना केली. त्याने 'अभिज्ञान शाकुन्तल' सारखी नाटके लिहिली; 'रघुवंश' आणि 'कुमारसंभव' सारखी महाकाव्ये रचली आणि 'मेघदूत' सारखी खंडकाव्ये देखील लिहिली.

कालिदासाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सुन्दर व सरल भाषा. संस्कृतमध्ये बहुधा कठिण सामासिक शब्द येऊन भाषेचे माधुर्य कमी होते. कालिदासाने असे बोजड शब्दप्रयोग चार हात लांबच ठेवले. त्याने सूक्ष्म विषय किंवा भावना देखील सरल व आकर्षक भाषेत व्यक्त केली.

कालिदासाचे तिसरे वैशिष्ट्य म्हणजे त्याने बहुतेक सर्व रसांचे यशस्वीरीत्या वर्णन केले आहे. शृंगार रसाचे वर्णन करण्यात तो सिध्दहस्त होताच, पण त्याचबरोबर त्याच्या काव्यात करुण व वीर रसाचे देखील चांगले वर्णन आहे. विक्रमोर्वशीयाच्या चौथ्या अंकात, शाकुन्तलच्या सहाव्या अंकांत, रघुवंशाच्या आठव्या सर्गात आणि कुमारसंभवाच्या चौथ्या सर्गात करुण रसाचा परिपोष चांगला झालेला आहे. वीर रस देखील कुमारसंभवात आणि रघुवंशाच्या तिसऱ्या सर्गात, इन्द्र व रघु यांच्या युध्दप्रसंगाचे वर्णन करताना चांगला उतरला आहे.

कालिदासाच्या काव्याचे चौथे वैशिष्ट्य म्हणजे अलंकारांवरील त्याचे प्रभुत्व. विशेषतः उपमेचा प्रयोग करण्यात तो सिध्दहस्त होता. 'उपमा कालिदासस्य' म्हणजे उपमा कोणी द्यावी तर कालिदासाने असे जे म्हणतात ते अगदी सार्थ आहे. एका उपमेमुळे तर कालिदासाचे नावच 'दीपशिखा कालिदास' असे पडले. ज्या श्लोकात ही उपमा आलेली आहे तो श्लोक रघुवंशामध्ये इन्दुमतीच्या स्वयंवराचे वर्णन करताना आलेला आहे. कवीने म्हटले आहे—

संचारिणी दीपशिखेव रात्रौ,
यं यं व्यतीयाय पतिंवरा सा ।
नरेन्द्रमार्गाट्ट इव प्रपेदे,
विवर्ण भावं स स भूमिपालः ॥

अर्थ—रात्रीच्या वेळी प्रज्वलित दीपशिखा राजमार्गावरील ज्या ज्या प्रासादासमोरून निघून जाते त्या त्या ठिकाणी अंधार पसरतो. त्याचप्रमाणे इन्दुमती ज्या ज्या राजपुत्रासमोरून पुढे निघून जात होती त्या त्या राजपुत्राचा चेहरा काळवटत होता.

कालिदासाच्या वाङ्मयात घटना आणि वस्तु यांचे वर्णनही फारच उत्कृष्ट झालेले आहे. वर्णन वाचत असताना डोळयांसमोर त्या वस्तूचे चित्र उभे राहते, ती घटना डोळयांना दिसू लागते. जंगलात हरिणाला धावताना सर्वांनी पाहिले असेल. 'शाकुन्तल' मध्ये त्याचे किती सुरेख वर्णन कालिदासाने केले आहे.—"हे सूता, हा हरिण आपली सुन्दर मान वळवून रथाकडे पहात पुढे पुढे पळतो आहे. बाणाच्या भयामुळे त्याचे मागील निम्मे अंग जणु पुढील भागात समाविष्ट होऊ पहात आहे. धावण्याच्या श्रमांमुळे त्याचे तोंड उघडे राहिले आहे आणि त्यातून तो खात असलेले गवत खाली पडत आहे. लांब लांब उड्या मारीत हा हरिण जमिनी-पेक्षा आकाशातूनच अधिक जात आहे."

भारताचा भूगोल, पशु-पक्षी, वृक्ष-वनस्पती, फळेफुले इत्यादींचे कालिदासाने आपल्या काव्यातून तपशीलवार आणि जिवंत वर्णन केले आहे. त्या वेळच्या राज्यव्यवस्थेचे व समाजस्थितीचे देखील त्याने विस्तृत वर्णन केले आहे. कालिदास ललितकलांमध्ये पारंगत असल्याचे दिसते. संगीत, नृत्य, चित्रकला यांचे ज्या ज्या ठिकाणी उल्लेख आलेले आहेत त्या त्या ठिकाणी त्याने त्यांचे बारकाव्याने वर्णन केलेले आहे. धर्म, तत्त्वज्ञान व आध्यात्मिक विचारसरणी देखील कालिदासाला पूर्णपणे माहीत होती.

कविकुलगुरू कालिदासाच्या जीवनाविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. काही लोकांच्या मते भोज राजाच्या दरबारांतील नवरत्नांपैकी तो एक 'रत्न' होता. काही लोकांच्या मते तो दुसरा चन्द्रगुप्त 'विक्रमादित्य' (इसवी सनाचे चौथे-पांचवे शतक) याच्या दरबारातील नवरत्नांपैकी होता. काहींच्या मते मध्यप्रदेशातील रामटेक हे त्याचे जन्मस्थान होय. काहींच्या मते उज्जयिनी वा अवन्ती हे होय तर काहींच्या मते काश्मीर हे त्याचे जन्मस्थान होय. काही विद्वान तो बंगालमधील असल्याचे प्रतिपादन करतात, तर काही जण तो दक्षिणेतील असल्याचे सांगतात. वास्तविक तो भारतातील होता.

कालिदासाविषयी अनेक दंतकथा प्रचलित आहेत. त्या सर्व खऱ्या आहेत असे म्हणता येणार नाही. अशीच एक कथा पुढीलप्रमाणे आहे—

असे म्हणतात की कालिदासाचा जन्म सामान्य कुटुंबात झाला होता. त्यास शिक्षण वगैरे काही एक मिळालेले नव्हते. एकदा अरण्यात लाकडे तोडावयास गेला असताना ज्या फांदीवर तो स्वत: बसला होता त्यावरच तो घाव घालीत होता. ही फांदी तुटली तर आपणही खाली पडू एवढी साधी गोष्ट सुध्दा त्याला सुचली नाही. त्याच वेळी काही विद्वान मंडळी तेथून जात होती. त्या सर्वांचा जवळच्याच नगरीची राजकुमारी विद्योत्तमा हिने वादात पराभव केलेला होता. त्यामुळे त्या राजकुमारीवर मनातून ते संतापलेले होते आणि सूड उगविण्याचा बेत करीत होते. या मूर्ख

लाकूडतोड्याला घेऊन जावे आणि राजकुमारीची खोड मोडावी असा विचार करून त्यांनी लाकूडतोड्यास झाडावरून खाली उतरण्यास सांगितले. आणि नंतर त्यास समजावले की तू अमुक अमुक केले म्हणजे आम्ही तुला चांगला गब्बर करून टाकू. कालिदासाने त्या विद्वानांचे म्हणणे मान्य केले. विद्वानांनी त्यास सांगितले—"नगरांत गेल्यावर तू तोंडाने काही सुध्दा बोल नकोस. सर्व गोष्टी खुणेने सांग."

नगरात गेल्यावर त्या विद्वानांनी राजकुमारी विद्योत्तमेस म्हटले—"हे महापंडित आहेत. पण सध्या यांनी मौन धारण केले आहे. म्हणून हे आपल्या प्रश्नांची उत्तरे खुणेने देतील."

विद्योत्तमेने त्यांचे म्हणणे मान्य केले. आणि एक बोट वर केले. त्याचा अर्थ होता की ईश्वर एक आहे. पण कालिदासाला वाटले की, बोटाने तुझे डोळे फोडून टाकीन असे ती म्हणत आहे. म्हणून लगेच कालिदासाने दोन बोटे दाखविली. त्याचा अर्थ असा होता की, मी तुझे दोन्ही डोळे फोडून टाकीन. पण विद्वानांनी त्याचा अर्थ असा लावला की, ईश्वर एक असून देखील त्याची सगुण व निर्गुण अशी दोन रूपे आहेत. त्यानंतर विद्योत्तमेने पाच बोटे दाखविली. त्याचा अर्थ होता की जगात पाच तत्त्वे आहेत. पण कालिदासाला वाटले की त्याला थप्पड मारण्यासाठी ती हात दाखवीत आहे. म्हणून त्याने हाताची मूठ दाखविली. अर्थात् त्याला म्हणावयाचे होते की मी तुला बुक्की मारीन. पण विद्वानांनी त्याचा अर्थ असा लावला की, जगात पाच तत्त्वे असूनही ती सर्व मिळूनच विश्व निर्माण झाले आहे. यावर विद्योत्तमेने आपण हरल्याचे कबूल केले आणि प्रतिज्ञेप्रमाणे तिला कालिदासाशी लग्न करावे लागले. रात्रीच्या वेळी कालिदासाला व विद्योत्तमेला महालाबाहेरून उंटाचा आवाज ऐकू आला. विद्योत्तमेने कालिदासाला विचारले, "हा कोणत्या पशूचा आवाज आहे ?" कालिदासाने उत्तर दिले—"उट्र, उट्र.' वास्तविक पाहता संस्कृतमध्ये उंटासाठी उष्ट्र हा शब्द आहे. कालिदासाचे हे अज्ञान पाहून विद्वानांनी केलेला कट विद्योत्तमेच्या लक्षात आला. तिने कालिदासाला

घराबाहेर घालवून देत म्हटले, "जोपर्यंत तुम्ही माझ्यापेक्षा अधिक विद्वान होत नाही तोपर्यंत मला तोंड दाखवू नका."

या अपमानामुळे व्यथित होऊन कालिदासाने कालीमातेच्या मंदिरात उग्र तपश्चर्या सुरू केली. असे म्हणतात की, तपश्चर्येने प्रसन्न होऊन कालीमातेने त्यास विद्या दिली. विद्येचे वरदान मिळवून कालिदास माघारी आला तेव्हा सर्वांनी त्याचे स्वागत केले.

ही कथा खरी वाटत नाही. कारण अभ्यास केल्याशिवाय विद्या कशी येईल ? या कथेचा एक अर्थ मात्र होऊ शकतो की, कालिदासात जन्मजात प्रतिभा होती. पण त्याला शिकण्याची संधी व प्रेरणा मिळालो नव्हती, वरील प्रसंगानंतर त्याला प्रेरणा मिळाली आणि भराभर त्याने विद्या आत्मसात केली.

कालिदासाच्या नाटकांचा व काव्यग्रंथांचा जगातील बहुतेक भाषांमध्ये अनुवाद झालेला आहे. जर्मनीचा महाकवी गटे याने कालिदासाची प्रशंसा करीत म्हटले होते, तारुण्याचे पुष्प, प्रौढावस्थेचे फळ, आणि ज्यामुळे आत्म्याचा विकास होतो व आपल्याला शांती मिळते, अशा अन्य ज्या काही गोष्टी आहेत त्या सर्व जर तुम्हास एकाच ठिकाणी हव्या असतील, स्वर्ग व इहलोक यांचे एकाच वेळी दर्शन घ्यावयाचे असेल तर मी तुम्हास सांगेन की ते सारे शाकुन्तल (अभिज्ञान शाकुन्तल) मध्ये आहे.

मोठे होऊन तुम्ही महाकवी कालिदासाची नाटके व महाकाव्ये वाचाल आणि या महान प्रतिभाशाली कवीच्या साहित्याचा रसास्वाद घ्याल, अशी आशा आहे.

# हर्ष

भारतात हर्ष वा हर्षवर्धन नावाचा एक मोठा कर्तृत्वशाली राजा होऊन गेला. साऱ्या उत्तर भारतात त्याचे साम्राज्य पसरलेले होते. त्याच्या सेनेने पूर्वेस गंजामपासून पश्चिमेस वल्लभीपर्यंतचा आणि उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेस नर्मदेपर्यंतचा अवघा प्रदेश पादाक्रांत केला होता. कामरूपचा (हल्लीचे आसाम) राजा, हर्षाचा मित्र होता. हर्षाचे सामर्थ्य त्यास माहीत होते. आणि हर्षाची कोणतीही गोष्ट तो अमान्य करीत नसे. हर्षाने दक्षिण भारतावरदेखील विजय मिळविण्याचा प्रयत्न केला होता, पण त्यात त्यास यश लाभले नाही.

हर्षाच्या वडिलाचे नाव होते प्रभाकरवर्धन ! प्रभाकरवर्धनाचे राज्य लहान होते. दिल्लीच्या वायव्येस काही मैलांवर कुरुक्षेत्र आहे. याच जागी कौरव-पांडवांचे युध्द झाले आणि पांडवांनी कौरवांचा पराभव केला असे म्हणतात. या कुरुक्षेत्राच्या आजूबाजूच्या प्रदेशावर प्रभाकरवर्धनाचे राज्य होते. स्थानेश्वर ही त्याच्या राज्याची राजधानी होती. प्रभाकरवर्धन सुरळीतपणे राज्यकारभार करू शकत नव्हता. कारण देशाच्या वायव्य भागाकडून वारंवार हूणांची आक्रमणे होत असत.

प्रभाकरवर्धन अतिशय बुध्दिवान होता. राज्य बळकट करण्याचे काम त्याने स्वत:कडे घेतले आणि हूणांना तोंड देण्यासाठी आपल्या दोन्ही मुलांना पाठविले. मोठ्या मुलाचे नाव होते राज्यवर्धन आणि धाकट्याचे होते हर्षवर्धन ! एकदा दोघे भाऊ मिळून हूणांचा पाठलाग करीत असताना प्रभाकरवर्धन आजारी असल्याची बातमी कळली. दोघा भावांनी विचार-विनिमय करून ठरविले की, मोठ्या भावाने हूणांशी लढावे आणि धाकटयाने वडिलांची शुश्रूषा करण्यासाठी घरी जावे. हर्षवर्धन घरी पोहोचताच वडिलांच्या मृत्यूची बातमी मिळाली. अवघे राज्य शोकसागरात बुडून गेले. पण हर्षवर्धनाने धीर सोडला नाही. आणि शासनव्यवस्थेत अजिबात ढिलाई येऊ दिली नाही. हूणांवर विजय मिळवून राज्यवर्धन परत आल्यावर हर्षाने राज्यवर्धनाकडे राज्यकारभार सोपविला.

पण राज्यवर्धनाच्या नशिबी सुख नव्हते. कनोजचा राजा ग्रहवर्मन याच्याशी त्याची धाकटी बहीण राज्यश्री हिचा विवाह झालेला होता. एके दिवशी बातमी आली की, माळव्याचा राजा देवगुप्त याने ग्रहवर्मनास युध्दात ठार केले आणि राज्यश्रीस कैद केले.

माळव्याच्या राजाचा सूड घेण्यासाठी राज्यवर्धन लगेच निघाला. युध्दात माळव्याच्या राजाचा पराभव झाला. आणि त्याने तहाचे बोलणे सुरू केले. राज्यवर्धनाने तहास मान्यता दिली. पण माळव्याच्या राजाचा मित्र, गौड देशाचा राजा शशांक, याने दगा दिला. त्याने राज्यवर्धनाला भेटीसाठी बोलावून त्याचा घात केला. व त्यास ठार केले. राज्यश्री कशीबशी तेथून निसटली आणि जंगलामध्ये भटकू लागली.

राज्यवर्धनाच्या मृत्यूच्या वेळी हर्षाचे -वय फक्त १६ वर्षांचे होते. इतक्या कोवळया वयातच राज्याची सर्व जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली. पण हर्षाचा धीर खचला नाही. भावाच्या खुनाचा सूड घेण्यासाठी त्याने सेनेची जमवाजमव केली आणि माळव्यावर हल्ला केला. या लढाईत त्याने माळव्याचा राजा देवगुप्त आणि गौड देशाचा राजा शशांक या दोघांचा पार पराभव केला.

भावाच्या वधाचा सूड घेतल्यानंतर तो आपली बहीण राज्यश्री हिच्या शोधार्थ निघाला. राज्यश्री कशीबशी विंध्य पर्वताच्या अरण्यात पोहोचली होती. पतीच्या आणि भावाच्या मृत्यूमुळे ती अतिशय दुःखी होती. आपल्या नशिबाला ती दोष होत होती. आपल्यापायीच पती मारला गेला. आणि आपल्या रक्षणासाठी भाऊ धाऊन आला तो देखील मारला गेला असे विचार सतत मनात येऊन ती अत्यंत विषण्ण झाली व चितेत उडी घेऊन देहत्याग करणे, हाच या हालअपेष्टातून वाचण्याचा एकमेव मार्ग आहे असे तिला वाटू लागले.

बहिणीचा शोध करीत करीत हर्ष ज्या वेळी विन्ध्य पर्वताच्या अरण्यात पोहोचला त्या वेळी त्याची बहीण चितेत स्वतःला जाळून घेण्याच्या तयारीतच

होती. हर्षाने एकदम हाका मारून तिला थांबविले आणि धावत जाऊन तिला चितेपासून दूर खेचले. एकापाठोपाठ एक आलेल्या आपत्तींमुळे राज्यश्री अगदी सुकून गेली होती. हर्षाने बहिणीला सांभाळले. त्यानंतर राज्यश्री नेहमी हर्षाजवळच राहिली.

शत्रूचा बीमोड करून आणि आपल्या बहिणीला बरोबर घेऊन हर्ष स्थानेश्वरला परतला. काही दिवसांनंतर कनोजच्या प्रजेच्या विनंतीवरून कनोजचे राज्य हर्षाने आपल्या राज्यास जोडले. स्थानेश्वरबरोबरच कनोज ही त्याने आपल्या राज्याची दुसरी राजधानी केली.

त्यानंतर हर्षाने आपले साम्राज्य वाढवण्याकडे लक्ष पुरविले. त्याने हत्ती, रथ आणि पायदळ यांची एक मोठी सेना उभी केली आणि सहा वर्षे तो युध्द करीत राहिला. त्याने कित्येक राज्ये जिंकली. पंजाब, बंगाल, कनोज, मिथिला (दरभंगा) आणि ओरिसा ही सर्व राज्ये त्याच्या साम्राज्यात विलीन झाली. दक्षिणेत विन्ध्य पर्वतापर्यंत त्याचे साम्राज्य पसरले. आरंभीच सांगितल्याप्रमाणे हर्षाने दक्षिण भारत जिंकण्याचा प्रयत्न केला होता. पण विंध्य पर्वत ओलांडल्यावर चालुक्य वंशातील पराक्रमी राजा पुलकेशी (दुसरा) याच्याशी त्याला सामना करावा लागला. या युध्दात हर्षाचा पराभव झाला. त्यानंतर हर्षाने दक्षिणेत साम्राज्य वाढवण्याचा विचार सोडून दिला. आणि आपल्या विशाल साम्राज्याचा राज्यकारभार व्यवस्थित करण्याच्या उद्योगास तो लागला.

इ० स० ६०६ साली हर्ष गादीवर आला. आणि त्याने ४२ वर्षे राज्य केले. त्याचा शासन-काल हा भारताच्या इतिहासातील वैभवाचा काल होता. हर्षाने देखील सम्राट अशोकाप्रमाणेच साऱ्या उत्तर भारताला एकत्र आणले. साहित्य व संस्कृती या क्षेत्रांमध्येही देशाची प्रगती झाली. हर्षाच्या पूर्वीचा इतिहास तपशीलवार मिळत नाही. पण हर्षाच्या राज्यव्यवस्थेची समग्र माहिती मिळते. त्याचे कारण हर्षाच्या दरबारातील बाण कवीने लिहिलेला हर्षचरित हा ग्रंथ. त्यावरून हर्षाच्या जीवनाची व तत्कालीन परिस्थितीची माहिती मिळते. याखेरीज प्रसिध्द चिनी यात्रेकरू युआन च्वांग

किंवा हुएनत्संग हा देखील हर्षाच्या कारकीर्दीतच भारतामध्ये आला होता.

हुएनत्संग हा बौध्द भिक्षू होता. वयाच्या २९व्या वर्षीच तो बौध्द ग्रंथांच्या शोधार्थ चीनहून भारतात येण्यास निघाला होता. भारतातील प्रसिध्द विश्वविद्यालय नालन्दा येथे तो बरेच दिवस राहिला होता. त्याने लिहून ठेवले आहे की, भारतात ब्राह्मण धर्म आणि बौध्द धर्म दोन्ही अस्तित्वात होते. पण देशाच्या बहुसंख्य भागातून बौध्द धर्माचे हळूहळू उच्चाटण होत होते. सम्राट हर्ष स्वतः बौध्द धर्म मान्य करीत असे. पण त्याचबरोबर शिवाची आणि सूर्याची उपासनाही करीत असे. देशाची राज्यव्यवस्था उत्तम होती आणि विद्वानांना योग्य मान मिळत असे. लोकांचे चारित्र्य उच्च प्रतीचे होते. कोठेही कोणालाही कोणत्याही प्रकारचे भय नव्हते. सर्वत्र शांतता होती. आणि प्रवाशांना लुबाडले जाण्याची धास्ती नव्हती. नालन्दाची ख्याती दूरवर पसरलेली होती. दहा हजार विद्यार्थी तेथे अध्ययन करीत असत. परदेशाहून लोक तेथे अध्ययनासाठी येत असत.

कनोजमध्ये जेव्हा हर्षाने सर्व धर्मीयांचे एक मोठे संमेलन भरविले, तेव्हा हुएनत्संग त्या संमेलनास हजर होता. संमेलनात सर्व भारतातून विद्वान मंडळी आली होती. पाच दिवस चर्चा व वादविवाद झाला. त्यात हुएनत्संगाने सर्व विद्वज्जनांचा पराभव केला. हुएनत्संगाच्या या विजयामुळे काही लोकांना त्याचा द्वेष वाटू लागला आणि त्याच्या खुनाचा कट ते करू लागले. हर्षाला हे कळताच त्याने दवंडी पिटविली की हुएनत्संगाच्या केसाला जरी कोणी धक्का लावला तरी त्याची मान उडविली जाईल. त्यानंतर संमेलन व्यवस्थितपणे पुरे झाले.

हर्षाने हुएनत्संगाला भारतातच राहाण्याची विनंती केली. पण त्याने हे मान्य केले नाही. त्याच्या प्रवासाची पूर्ण व्यवस्था करून देऊन हर्षाने मोठ्या प्रेमाने त्यास निरोप दिला. चीनला गेल्यानंतर १९ वर्षे बौध्द ग्रंथांचा चिनी भाषेत अनुवाद करण्याचे कार्य हुएनत्संग करीत राहिला.

हुएनत्संगाच्या भारतातील प्रवासाचा आणखी एक फायदा हर्षास झाला. हुएनत्संगामुळे चीनचा सम्राट ताईत्सुंग याच्याशी हर्षाचे फार चांगले संबंध

निर्माण झाले. एका अतिशय विद्वान व योग्य ब्राह्मणास आपला दूत बनवून हर्षाने त्यास चिनी सम्राटाच्या दरबारी पाठविले होते. आणि चीनच्या सम्राटाने देखील आपला एक दूत हर्षाच्या दरबारी पाठविला होता.

हर्षाचा एक नियम होता. तो दर पाचव्या वर्षी गंगा व यमुना यांच्या संगमावर दान करीत असे. या प्रसंगी तेथे मोठी जत्रा भरत असे. दान घेण्यासाठी संपूर्ण भारतातून सर्व धर्मांचे व संप्रदायांचे लोक तेथे येत असत. संगमावर पाच लाख लोकांच्या मुक्कामाची व खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यात येत असे. दानाचा कार्यक्रम ७५ दिवस चालत असे. हर्ष रोज तेथे येऊन सिंहासनावर बसत असे आणि पाळीपाळीने प्रत्येक धर्माच्या भिक्षुकास त्याच्याकडून दान मिळत असे. याखेरीज दहा हजार बौध्द भिक्षुकांपैकी प्रत्येकास शंभर सुवर्णमुद्रा, एक मोती, सुती वस्त्रे, अत्तर आणि अन्न एवढे तो देत असे. महिन्याभरातच हर्षाचा खजिना साफ रिकामा होत असे. इतकेच नव्हे एकदा तर आपल्या अंगावरची वस्त्राभूषणे देखील हर्षाने दान करून टाकली होती. या दान धर्मामुळे हर्ष त्याच्या प्रजेत अतिशय लोकप्रिय होता. त्याच्या दानधर्माची ख्याती भारताच्या कानाकोपऱ्यापर्यंत पसरली होती.

हर्षाच्या जीवनाची अखेर मात्र चांगली झाली नाही. हर्षाचा बौध्द धर्माकडे ओढा होता म्हणून अनेक कट्टर ब्राह्मण त्याच्यावर नाराज झालेले होते. त्यांनी हर्षाच्या खुनाचा कट रचला. अखेर हर्षाच्या अर्जुन नावाच्या एका मंत्र्याने त्याच्याविरुध्द बंड केले. एका माणसाने दगलबाजीने हर्षास ठार केले. अशा तऱ्हेने भारतातील एका गुणी, पराक्रमी व बलाढ्य सम्राटाचा दु:खद शेवट झाला.

हर्ष केवळ निपुण व दयाळू राज्यकर्ताच होता असे नव्हे तर तो अतिशय विद्वानही होता. त्याने अनेक नाटके लिहिली आहेत. अशोकाप्रमाणेच हर्ष देखील प्राचीन भारतातील एक अतिशय श्रेष्ठ व थोर शासक होता.

# दुसरा पुलकेशी

सहाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये दक्षिणेकडे चालुक्य वंश उदयास आला. या राजवंशाने सुमारे २०० वर्षांच्या आपल्या कारकीर्दीत बरीच उल्लेखनीय कामगिरी केली. तिची छाप अजूनही नाहीशी झालेली नाही. या राजवंशातील सर्वांत अधिक कर्तृत्वशाली राजा दुसरा पुलकेशी हा होय. पुलकेशीचा अर्थ आहे 'बलाढ्य सिंह', नावाप्रमाणे तो खरोखरीच सिंहासारखा शूर व धाडशी होता.

या वंशाच्या मूळ पुरुषाचे नाव जयसिंह असल्याचा उल्लेख इतिहासात आढळतो. पण घराण्यास खऱ्या अर्थाने लौकिक मिळवून दिला जयसिंहाचा नातू—पहिला पुलकेशी याने ! त्यानेच बदामी नावाच्या गावी आपली राजधानी स्थापन करून तेथून चारही दिशांना राज्यविस्तार करण्याचे कार्य सुरू केले होते. वातापीपूर ( बदामी ) हे एखाद्या बळकट किल्ल्यासारखे अभेद्य करणे हे त्याचे पहिले कार्य होते. पहिल्या पुलकेशीचा मुलगा कीर्तीवर्मा हा आपल्या वडिलांहून सवाई निघाला. त्याने वनवासीच्या कदंबांचा, कोंकणच्या मौर्यांचा व बस्तरच्या नलांचा पराभव केला. कोंकणावर विजय मिळविल्यामुळे गोव्यासारखे प्रसिध्द बंदर चालुक्यांच्या ताब्यात आले. गोव्याहून व्यापारासाठी दूरदूरच्या देशात जहाजे जात असत आणि ते बरीच संपत्ती मिळवून येत असत. त्याने चालुक्य राज्याचा खजिना भरू लागला.

दुर्दैवाने कीर्तीवर्मा लहान वयांतच मृत्यू पावला. त्यावेळी त्याची सर्व मुले अल्पवयीन होती. म्हणून कीर्तीवर्मांचा थोरला मुलगा पुलकेशी याच्या वतीने त्याचा चुलता मंगलेश हा राज्यकारभार पाहू लागला. साम्राज्याचा विस्तार करण्याची आपल्या घराण्याची परंपरा मंगलेशाने देखील चालवली. त्याने कलचुरी राजा बुधराज याच्यावर आक्रमण करून राज्याच्या खजिन्यासाठी पुरेसे धन मिळविले. याच वेळी कोंकणात बंड झाले. मंगलेशाने त्या बंडाचा बीमोड केला. बदामीजवळ त्याने कित्येक सुप्रसिध्द मंदिरे बांधली. पण राज्य आणि सत्ता यांचा लोभ कोणाला सुटतो ? मंगलेश देखील त्या लोभाला बळी पडला.

आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभी कीर्तीवर्माची कीर्ती ऐकण्यातच त्यास समाधान वाटत असे. त्याऐवजी आता त्याला स्वतःची कीर्ती व्हावी असे वाटू लागले. म्हातारपणी पुलकेशीविषयी त्याच्या मनात किंतु निर्माण झाला. त्याच्या दरबारात नाना तऱ्हेची खलबते शिजू लागली.

पुलकेशी तरुण झाला तेव्हा वास्तविक पाहता राज्याच्या या खऱ्या वारसदाराकडे त्याचे राज्य सोपवून मंगलेशाला भाऊबंदकी थांबवता आली असती. पण मंगलेशाने आपल्या मुलाला गादी देण्याचा कट केला. पुलकेशीला राज्य मिळू नये यासाठी प्रयत्न करण्यात येऊ लागले. पण पुलकेशीने देखील आपला हक्क मिळविण्याचा ठाम निश्चय केला होता. अशा परिस्थितीत संघर्ष अटळ होता. पुलकेशी आपल्या भावांना घेऊन राजधानी सोडून गेला आणि त्यानंतर थोड्याच दिवसांनी काका-पुतण्याचे युध्द सुरू झाले.

युध्दात पुलकेशीचा विजय झाला खरा. पण या युध्दामुळे चालुक्य वंशाचे फार नुकसान झाले. चालुक्य साम्राज्य बळकट झालेले नव्हते. त्याची मुळे खोलवर रुजण्यापूर्वीच राजघराण्यातील मंडळी आपापसात भांडू लागली. आपले गेलेले स्वातंत्र्य पुन्हा मिळवण्यासाठी सरदारांना अगदी नामी संधी मिळाली. चारही बाजूंस शत्रूंनी या संधीचा फायदा घेऊन आपल्या स्वातंत्र्याच्या घोषणा केल्या. पण पुलकेशी या परिस्थितीमुळे डगमगला नाही. त्याने आपल्या नावाप्रमाणे, मोठ्या धैर्याने एका पाठोपाठ एक सर्वांचा समाचार घेतला.

राजनीतीच्या तत्त्वानुसार जो शत्रू दुर्बल आहे आणि ज्याच्याविरुध्द दुसऱ्या एखाद्या राजाकडून देखील मदत मिळण्याची शक्यता आहे, त्याचा अगोदर पाडाव करायला हवा त्याप्रमाणे पुलकेशीने आपल्या विजययात्रेस प्रारंभ केला. मैत्रकांच्या राजाचा एक सरदार निरुहुल्लक याने स्वतंत्र होऊन लाट प्रदेशाचा एक भाग गिळंकृत केलेला होता. त्याचा वारसदार आप्पायिक हा फार महत्त्वाकांक्षी होता. चालुक्यवंशातील भाऊबंदकीचा फायदा घेऊन त्याने लाट प्रदेशाच्या पुढे जाऊन चालुक्यांच्या प्रदेशावरही हल्ले केले या कामी

त्याला गोविंद नावाच्या आणखी एका सरदाराचे साहाय्य मिळाले होते. पुलकेशीने मैत्रकांचा राजा शिलादित्य याच्याशी आप्पायिकाविरुध्द तह केला. शिलादित्य आणि पुलकेशी यांच्या सेनेने भीमरथी नदीच्या युध्दात आप्पायिकाचा पराभव केला. त्या युध्दात आप्पायिक मारला गेला व गोविंद, पुलकेशीला शरण आला. आप्पायिकाचे राज्य दोघा राजांनी आपसात वाटून घेतले.

या तहाचा आणखी एक फायदा झाला. तो असा की, दोन्ही राज्यांमधील काही प्रदेशांवरून मैत्रक व चालुक्य यांच्यामध्ये जे वैमनस्य निर्माण झाले होते ते नाहीसे झाले. दक्षिण गुजरात आणि उत्तर कोंकण यावर आपला हक्क आहे असे कलचुरी देखील समजत असत. त्यांनी तो भाग चालुक्यांना देऊन टाकला. आणि मह्य आणि विन्ध्य यांच्यामधील प्रदेश मैत्रकांचा असल्याचे चालुक्यांनी मान्य केले.

उत्तरेच्या राजकारणाच्या बाबतीत स्वस्थता लाभल्यावर पुलकेशीने दुसरीकडे लक्ष दिले. वनवासीच्या कदंब वंशातील राजांनी पहिल्या पुलकेशीच्या वडिलांच्या वेळी चालुक्यांचे वर्चस्व मान्य केले होते. नंतर चालुक्यांच्या भाऊबंदकीमुळे ते स्वतंत्र झाले होते. पुलकेशीने वनवासीवर स्वारी करून त्यांना आपले मांडलिक बनविले. तसेच दक्षिण कर्नाटकाचा आलुप राजा आणि म्हैसूरचा गंग राजा यांनादेखील पुलकेशीचे मांडलिकत्व स्वीकारावे लागले.

या राज्यांमध्ये गंग राज्य अतिशय महत्त्वाचे होते. गंग राजाने पुन्हा त्रास देऊ नये आणि नेहमी चालुक्य साम्राज्यातच राहावे म्हणून पुलकेशीने त्याच्याशी मैत्री केली. गंग राजा दुर्विनीत याने पराभव झाल्यावर आपल्या मुलीचा पुलकेशीशी विवाह लावून दिला. याच गंग राजकुमारीपासून पहिला विक्रमादित्य जन्मास आला. पुलकेशीनंतर तोच गादीवर आला. पुढे पल्लवांशी झालेल्या युध्दामध्ये चालुक्य जेव्हा अडचणीत सापडले, तेव्हा या गंगराज दुर्विनीतानेच आपल्या नातवाला खूप मदत केली.

पुलकेशीने आपले आसन चांगलेच बळकट केलें असले तरी उत्तर कोंकणचा मौर्य राजा मात्र त्याच्यापुढे झुकला नव्हता. पुरी (एलेफंटा द्वीप) येथे त्याची राजधानी होती. पुरीला त्या वेळी पश्चिम समुद्राची राणी म्हणत असत. पुरीची भौगोलिक स्थिती आणि तेथून होणाऱ्या व्यापारामुळे मिळणारी संपत्ती यामुळे मौर्य बलाढ्य झालेले होते. आपल्या संपत्तीच्या सामर्थ्यामुळे तो सर्वांना तुच्छ समजत असे. पण पुलकेशी पुढे तोदेखील टिकाव धरू शकला नाही. त्यास देखील पुलकेशीचे आधिपत्य मान्य करावेच लागले.

मौर्यांच्या पाडावानंतर पुलकेशी, संपूर्ण दक्षिण भारत आपल्या ताब्यात घ्यायला समर्थ झाला. दक्षिणेस कांचीचे पल्लव आणि मदुरेचे पांड्य राजे देखील स्वतःस पुलकेशीच्या तोडीचा समजत असत. दक्षिण भारतावर ताबा मिळविण्याची स्वप्ने ते देखील पहात होते. यापैकी पल्लव राज्य हे चालुक्य राज्याचे अगदी जवळचे शेजारी राज्य होते म्हणून त्याच्याशी अगोदर युध्द करणे पुलकेशीला आवश्यक वाटले. पल्लवांवर स्वारी करण्याची योजना आखून पुलकेशीने आपल्या धाकट्या भावाला युवराजपद दिले आणि त्यास राजधानीत सोडून तो स्वतः एक विशाल सेना घेऊन पल्लवांकडे निघाला पल्लवांवर स्वारी करण्यापूर्वी दक्षिण कोसल आणि कलिंग हे प्रदेश त्याने जिंकले. कारण ही राज्ये मागून हल्ला करतील असे त्यास वाटले.

पल्लव आणि कलिंग यांच्यामध्ये विष्णुकुंडिन वंशाचे राज्य होते. पुलकेशीची पहिली लढाई विष्णुकुंडिनाशी झाली. तिच्यात त्याला सहज विजय मिळाला. पुलकेशी पल्लवांच्या सीमेपर्यंत पोहोचला तेव्हा पल्लवांचा राजा पहिला महेन्द्रवर्मा हा गादीवर होता. पल्लवांमध्ये महेन्द्रवर्माच्या तोडीचा पराक्रमी व कर्तृत्वशाली राजा झाला नाही. तो कलाकार, संगीतज्ञ आणि कवी तर होताच, पण शूर योध्दा देखील होता. पण तो पुलकेशीला थोपवू शकला नाही. पल्लव राज्य पादाक्रांत करीत पुलकेशी त्याच्या राजधानी-पासून १४ मैलांवर येऊन ठेपला तेव्हा महेन्द्रवर्मा पळून गेला आणि त्याने राजधानीचा आसरा घेतला. पुलकेशीने खूप प्रयत्न केले. परंतु तो पल्लवांचा संपूर्ण पराभव करू शकला नाही.

पुलकेशी ज्या वेळी पल्लवांशी लढण्यात गुंतलेला होता त्याच वेळी उत्तर भारतातील हर्षाच्या वाढत्या वर्चस्वाने असे काही प्रश्न निर्माण केले की त्यामुळे पल्लवांशी चाललेले युध्द अपुरेच सोडून पुलकेशीस माघारी परतावे लागले. या युध्दामुळे पल्लव राज्याचे उत्तरेकडील काही प्रदेश त्याच्या हाती लागले एवढे मात्र खरे. पल्लवांनी पुन्हा कधी त्रास देऊ नये म्हणून पुलकेशीने आपला भाऊ विष्णुवर्धन यास आंध्र प्रदेशाचा सुभेदार करून त्यास तेथेच राहू दिले.

पुलकेशी ज्या वेळी दक्षिणेत विजय मिळवीत होता त्याच वेळी उत्तरेत हर्षवर्धनाने आपल्या पराक्रमाने एक विशाल साम्राज्य निर्माण केले होते. हर्षाच्या साम्राज्यात जवळ जवळ संपूर्ण उत्तर भारताचा समावेश झालेला होता. उत्तरेतील विजय मिळविल्यावर हर्ष दक्षिणेकडे वळला. पुलकेशी देखील दक्षिणेतील आपले आसन स्थिर करून उत्तरेस आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी उत्सुक होता. पण युध्दास प्रारंभ केला तो हर्षाने ! युध्दात पुलकेशीने मोठ्या चातुर्याने परिस्थितीला तोंड दिले. त्याने लाट, माळवा आणि गुर्जर यांना आपल्या बाजूला करून घेतले. अशा तऱ्हेने आपली सीमा उत्तरेस महानदीपर्यंत नेऊन भिडविली.

हर्ष आणि पुलकेशी यांची लढाई नीट समजण्यासाठी वल्लभीची माहिती असणे अगत्याचे आहे. जो कोणी राजा उत्तरेहून दक्षिणेस वा दक्षिणेहून उत्तरेस जात असे त्यास वल्लभी मार्गेच जावे लागत असे. दक्षिणेतील राजास उत्तर भारतावर हल्ला करण्यासाठी नर्मदा किंवा महानदी ओलांडून जावे लागत असे. दोन्ही भागांच्या दृष्टीने वल्लभी हे अतिशय मोक्याचे ठिकाण होते. त्यातून नर्मदेच्या उत्तरेला असलेले माळव्याचे आणि गुर्जर राज्य जेव्हा पुलकेशीने आपल्या बाजूला वळवून घेतले, तेव्हा वल्लभी राज्य आपल्या बाजूला करून घेण्याची गरज हर्षाला एकदम वाटू लागली. हर्षाने वल्लभीच्या राजाकडे मैत्रीचा निरोप पाठविला. पण त्याने ते कबूल केले नाही. म्हणून हर्षाने वल्लभीवर आक्रमण करून त्याचा पराभव केला. तो राजा पळून गेला आणि त्याने गुर्जर राजाचा आसरा घेतला. हर्षाशी

टक्कर देण्याचे सामर्थ्य गुर्जर राजामध्येही नव्हते. पण त्याच्या पाठीशी पुलकेशी उभा होता.

हर्ष त्या वेळी गुर्जरांचे काही एक वाकडे करू शकला नाही. पण कूट-नीतीचा अवलंब करून त्याने वल्लभीचा राजा ध्रुवसेन याच्याशी आपल्या मुलीचा विवाह लावून दिला आणि त्यास त्याने आपल्या बाजूला वळवून घेतले. वल्लभीच्या बाजूने निश्चिंत होऊन लगेच त्याने पुलकेशीवर स्वारी केली. नर्मदेच्या काठी हर्ष आणि पुलकेशी यांच्यात घनघोर युध्द झाले. या युध्दात हर्षाच्या सैन्याचे अतोनात नुकसान झाले आणि त्याचा पराभव झाला. हर्षाच्या आयुष्यातील हा पहिला पराभव होता. पुलकेशीचा विजय झाला खरा, पण तो त्यास इतका महागात पडला की उत्तरेस आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्याचा विचार त्याने कायमचा सोडून दिला.

हर्षाचा पराभव करून पुलकेशीने आपल्या यशोमंदिराचा कळस गाठला. संपूर्ण उत्तर भारताचा सम्राट हर्ष याचा पराभव केल्यावर त्याने 'परमेश्वर' हे बीरुद धारण केले. पण दक्षिणेत पल्लवांचे सामर्थ्य अजून संपलेले नव्हते. पल्लवांकडून आपल्यास धोका आहे, याची पुलकेशीला जाणीव होती. म्हणून थोडी स्वस्थता लाभल्यावर पुलकेशीने आपला मोर्चा पल्लवांकडे वळविला. मधल्या काळात महेन्द्रवर्मा मरण पावला होता आणि त्याच्या जागी नरसिंहवर्मा महामल्ल हा राज्य करीत होता. पल्लवांचा पराभव करीत पुलकेशी पुन्हा एकदा त्यांच्या राजधानीपर्यंत पोहोचला. पण पल्लव राजाने धीर सोडला नाही. त्याने एक-दोनदा पुलकेशीला चांगलाच हात दाखविला. अखेरीस पुलकेशीला पळ काढावा लागावा. पण या वेळी नरसिंहवर्म्याने त्याचा पिच्छा पुरविला आणि चालुक्यांची राजधानी वातापी येथपर्यंत तो येऊन ठेपला. बहुधा याच युध्दात पुलकेशी मारला गेला असावा. वातापीवर नरसिंहवर्म्याने ताबा मिळविला आणि वातापिकौंड म्हणजेच वातापी-विजेता ही पदवी त्याने घेतली. दुसरा पुलकेशी अद्वितीय योध्दा आणि साम्राज्य-निर्माता होता. या दृष्टीने भारताच्या इतिहासात आजही त्यास महत्त्वाचे स्थान आहे.

# शंकराचार्य

इसवी सनाच्या आठव्या शतकातील गोष्ट आहे.

दक्षिण भारताच्या केरळ प्रदेशात कालडी नावाचे एक गाव होते. पूर्णा नदीच्या काठी हे गाव वसलेले होते. तेथे शिवगुरू नावाचा एक ब्राह्मण राहात असे. तो अतिशय विद्वान होता. पण वार्धक्य आले तरी त्यास मूलबाळ काही झाले नाही. त्यामुळे त्याची बायको सुभद्रा मनातून अतिशय दु:खीकष्टी राहात असे. शिवगुरूला देखील चैन पडत नसे.

शिवगुरू हा भगवान शंकराचा मोठा भक्त होता. त्याने व त्याच्या पत्नीने मोठ्या श्रध्देने भगवान शंकराची आराधना केली. असे म्हणतात की देव प्रसन्न झाला आणि देवाच्या वरदानामुळे सुभद्रेला मुलगा झाला. भगवान शंकराच्या कृपेने मुलगा झाला म्हणून त्याचे नाव शंकर ठेवण्यात आले. हाच शंकर पुढे शंकराचार्य म्हणून विश्वविख्यात झाला.

लहानपणापासूनच शंकर अतिशय हुशार होता. आईकडून ऐकलेल्या पुराणातील सर्व कथा त्याला बालपणीच मुखोद्‌गत झाल्या होत्या. वयाच्या तिसऱ्या वर्षी त्याचे जावळ काढण्यात आले. पण दुर्दैवाने त्यानंतर थोड्याच दिवसांनी शिवगुरू मरण पावले.

कोवळ्या वयातच शंकर पोरका झाला. त्याच्यावर संकटांचे आभाळ कोसळले. पण त्याच्या प्रतिभेवर याचा परिणाम झाला नाही. वयाच्या पाचव्या वर्षी आईने त्याची मुंज करून दिली आणि शंकर गुरूगृही अध्ययनासाठी गेला.

शंकराची असामान्य बुध्दिमत्ता पाहून त्याचे गुरू त्याच्यावर प्रसन्न झाले. शास्त्राध्ययनात शंकराला खूप गोडी वाटत असे. अध्ययनाबरोबरच देशाच्या दुर्दशेचाही विचार तो करीत असे.

शंकराचार्य फक्त दोनच वर्षे गुरूगृही राहिले. पण या अल्पावधीतही त्यांनी वेद, वेदान्त आणि दांगे यांचा अभ्यास पूर्ण केला. त्यानंतर ते आपल्या

घरी आले. त्या वेळी त्यांचे वय अंदाजे सात-आठ वर्षांचे होते. त्यांची दृष्टी अधिक व्यापक झाली होती. आणि त्यांच्यासमोर केवळ गरीब, निराधार लोकांच्याच नव्हे तर अवघ्या भारताच्या दुर्दशेचे चित्र उभे होते. सांप्रदायिक भांडणे आणि मत-मतान्तरे यांचा संघर्ष आणि अज्ञान व अंधविश्वास यांच्या खोल गर्तेत पडलेले कोट्यवधी लोक ही परिस्थिती पाहून ते फार अस्वस्थ झाले. ही परिस्थिती पालटून टाकायचीच असा निश्चय त्यांनी केला.

या उद्देश्याच्या पूर्तीसाठी घरदार सोडून जाण्याचा विचार शंकराचाय करू लागले. त्यांच्या विद्वत्तेची आणि योग्यतेची कीर्ती सर्वत्र पसरत होती. मलबारचा राजा विद्वानांचा फार आदर करीत असे. शंकराचार्यांनी राजपंडित होऊन दरबाराची शोभा वाढवावी अशी त्याची इच्छा होती. एक हत्ती आणि बरीचशी धनदौलत देऊन त्याने आपल्या एका मंत्र्याला शंकराचार्यांकडे पाठविले.

परंतु शंकराचार्यांनी राजपंडित होऊन मलबारच्या राजाच्या दरबारात राहाणे मान्य केले नाही. कारण त्यांना बरीच कार्ये करावयाची होती.

शंकराचार्यांना घेऊन येण्यासाठी ज्या मंत्र्याला भेटीच्या वस्तू देऊन पाठवले होते, त्याला लवाजम्यासह परत जावे लागले. मलबारचा राजा शंकराचार्यांची ही त्यागी वृत्ती पाहून आश्चर्याने थक्क झाला. शंकराचार्यांचे दर्शन घेण्याची त्यास तीव्र इच्छा झाली. म्हणून दुसऱ्याच दिवशी तो स्वतः शंकराचार्यांकडे गेला आणि शंकराचार्यांच्या पायाशी त्याने दहा हजार मोहोरा व काही ग्रंथ ठेवले. पण शंकराचार्यांनी ग्रंथांखेरीज एक कपर्दिकही घेण्याचे नाकारले.

या घटनेनंतर घराच्या चार भिंतीत शंकराचार्यांना चैन पडेना. त्यांनी आईजवळ संन्यास घेण्यासाठी परवानगी मागितली. पण किती झाले तरी आईचे हृदय ते ! एकुलत्या एका मुलाला संन्यास घेण्याची परवानगी ती कशी देईल ? शंकराचार्यांनी खूप खटपट केली, आईला हरतऱ्हेने समजावून पाहिले, पण ती परवानगी देईना.

एकदा जेव्हा ते नदीवर स्नानासाठी गेले होते तेव्हा मगरीने त्यांचा पाय धरला. त्यांची आई काठावर उभी होती. मुलावर संकट आलेले पाहून भीतीने ती ओरडू लागली. शंकराचार्यांनी या संधीचा फायदा घेतला. आणि आईला म्हटले—तू मला संन्यास घेण्याची परवानगी दिली तर ही मगर मला सोडून देईल.

आई बिचारी काय करणार ? तिने परवानगी दिली. आणि त्या मगरीने खरोखरीच शंकराचार्यांचा पाय सोडून दिला असे म्हणतात.

शंकराचार्यांनी घर सोडले आणि ते नर्मदेच्या काठी पोहोचले. तेथे स्वामी गोविंद भगवत्पाद यांच्याकडून त्यांनी संन्यासाची दीक्षा घेतली. त्यानंतर गुरूने सांगितल्याप्रमाणे त्यांनी तप करण्यास प्रारंभ केला. थोड्याच दिवसात त्यांनी योगसिध्दी मिळविली. त्याचबरोबर अद्वैतवादाचा देखील त्यांनी सखोल अभ्यास केला. गुरूने प्रसन्न होऊन त्यांना काशीस जाऊन वेदान्त सूत्रांवरील भाष्य लिहिण्याचा आदेश दिला.

काशीस जाऊन शंकराचार्यांनी गुरूचा आदेश पूर्ण केला. काशीस त्यांच्या विद्वत्तेची ख्याती पसरायला वेळ लागला नाही. कित्येकजण त्यांचे शिष्य बनले. त्यांमध्ये पद्माचार्य शिष्याचे नांव उल्लेखनीय आहे. अशा तऱ्हेने शंकराचार्य अनेक शिष्यांना शिकवीत असत आणि त्याच्याच जोडीला ग्रंथरचनाहि करीत असत. हळूहळू त्यांनी विभिन्न मतांमधील दोष व उणीवा यांना आणि अंधविश्वासाला आव्हान द्यायला सुरवात केली. इतर पंडितांबरोबर त्यांचे वाद होऊ लागले. या वादांमध्ये, प्रेम, एकी आणि अद्वैतवाद यांच्यावर श्रध्दा असलेल्या शंकराचार्यांना पावलोपावली यश मिळत गेले.

शंकराचार्यांनी वेदान्ताच्या प्रचारार्थ भ्रमण करण्यास प्रारंभ केला. हे काम काही सोपे नव्हते. त्या काळी आगगाड्या, मोटारी वा विमाने नव्हती. पायीच सगळीकडे जावे लागत असे. शंकराचार्य देखील पायीच जंगले, पर्वत, नद्या ओलांडून देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत हिंडले आणि जागोजागी त्यांनी

विभिन्न धर्मांच्या लोकांशी वादविवाद केला. शंकराचार्यांच्या ज्ञानापुढे मी मी म्हणणाऱ्या विद्वानांना हात टेकावे लागले. हजारो तरुण त्यांचे शिष्य झाले. लाखो लोकांनी त्यांचे मत स्वीकारले.

त्यांनी लोकांना संन्यासाचा खरा अर्थ समजावून सांगितला—जगातील कामे सोडून देऊन स्वस्थ बसणे हा काही संन्यास नव्हे तर स्वार्थ सोडून प्राणिमात्राच्या कल्याणार्थ सदैव कार्य करीत राहाणे हा संन्यासाचा खरा अर्थ होय, अशी त्यांची शिकवण होती. शंकराचार्यांनी अद्वैत वेदान्त मताचा प्रचार केला.

त्या वेळी भारतात बौध्द आणि जैन या दोन धर्मांचे प्राबल्य होते. या दोन्ही धर्मांचे अनुयायी आपापल्या धर्मांची खरी शिकवण, आपापल्या धर्मांचे खरे सिध्दान्त विसरत चालले होते. त्याचबरोबर भारताच्या प्राचीन वैदिक धर्माला असलेला त्यांचा विरोध वाढत चालला होता. शिवाय बौध्द व जैन यांच्यात आपसातही मतभेद होते. म्हणून शंकराचार्यांनी त्यांच्याकडे विशेष लक्ष दिले. वैदिक धर्मावरील त्यांचा हल्ला परतवून वैदिक धर्माला पुन्हा पूर्वीचे स्थान प्राप्त करून देण्याची त्यांची इच्छा होती.

याच हेतूने कुमारिल भट्ट नावाच्या विद्वानाची भेट घेण्यास ते निघाले. कुमारिल भट्ट मीमांसक होते. वैदिक धर्मानुयायी होते. वेदांच्या गहन अध्ययना-बरोबरच बौध्द व जैन या धर्मांच्या तत्त्वज्ञानाचाही त्यांनी सखोल अभ्यास केला होता. पण शंकराचार्य ज्या वेळी कुमारिल भट्टाकडे गेले त्या वेळी कुमारिल भट्ट अखेरच्या समाधीच्या तयारीत होते. म्हणून त्यांनी शंकराचार्यांना मंडन मिश्राकडे जाण्यास सांगितले. मंडन मिश्र हे कुमारिल भट्टाचे पट्टशिष्य होते. त्यांच्या विद्वत्तेची बरीच ख्याती पसरलेली होती. शंकराचार्यांनी मंडन मिश्र आणि त्यांची विदुषी पत्नी या दोघांचाही वादात पराभव केला. व मंडन मिश्रांनी शंकराचार्यांचे शिष्यत्व पत्करले.

शंकराचार्यांनी जागोजागी बौध्द, जैन आणि अन्य कित्येक मतांच्या पंडितांशी वादविवाद करून त्यांचा पराभव केला. आपले अनुयायी बरोबर

घेऊन ते गांधार, काश्मीर, कंबोज, आणि तक्षशिला येथपर्यंत गेले. या सर्व भागांमध्ये बौध्दांचे वर्चस्व होते. पण शंकराचार्यांनी तेथे पुन्हा वैदिक धर्माचे वर्चस्व स्थापन केले. बंगाल, बिहार, बौध्दांची केंद्रस्थाने—नालन्दा, राजगृह, व गया, तसेच कामरूप, नेपाळ, उत्तर गुजरात, काठेवाड, मध्यप्रदेश, उत्तर भारत, दक्षिण भारत इ० सर्व भागात ते गेले. प्रत्येक तीर्थस्थानाची यात्रा त्यांनी केली. कित्येक मन्दिरे, मठ, आश्रम स्थापन केले. बौध्द व वैदिक धर्म मानणारे लोक यांच्यात स्नेहभाव निर्माण केला.

प्रचारकार्य करताना शंकराचार्यांना कित्येकदा विरोधकांना तोंड द्यावे लागले. कर्नाटकात बरेचसे कापालिक रहात असत. आपल्या देवाला माणसाचा बळी देऊन त्याची कवटी ते देवाला अर्पण करीत असत. शंकराचार्य कर्नाटकात गेले त्या वेळी एकदा त्यांच्यावर आणि त्यांच्या शिष्यांवर कापालिकांनी हल्ला चढविला. पण शंकराचार्य व त्यांचे शिष्य आपल्या प्राणाची पर्वा न करता हिंडत असत. त्यांना कसलेही भय नव्हते. कापालिक त्यांना त्रास देऊ शकले नाहीत.

शंकराचार्य अतिशय त्यागी वृत्तीचे होते. स्वत:च्या शरीराचा त्यांना अजिबात मोह नव्हता. या बाबतीत एक कथा सांगतात. ती अशी—एकदा शंकराचार्य एकटेच बसलेले होते. एक कापालिक त्यांच्याकडे आला. त्याने विनंती केली—महाराज, आपण तत्त्वज्ञ आहात. आपणाला शरीराचा अजिबात मोह नाही. मला साधनेसाठी एका माणसाचे मस्तक हवे आहे. आपण जर आपले मस्तक दिले तर माझा कार्यभाग साधेल.

शंकराचार्यांनी उत्तर दिले—‘ठीक आहे. मी समाधी लावून बसतो. तू माझे मस्तक कापून घे.’

शंकराचार्य समाधी लावून बसले. कापालिक दारू पिऊन आणि त्रिशूळ घेऊन आला. तो शंकराचार्यांचे मस्तक कापणार इतक्यात श्री पद्मपाद तेथे आले आणि त्यांनी शंकराचार्यांना वाचविले.

सत्य, अहिंसा आणि उच्च विचारसरणी यांच्यामुळे शंकराचार्यांनी आपल्या विरोधकांवर विजय मिळविला. शांती, एकी व सत्यज्ञान यांचे

साम्राज्य स्थापन केले. आपल्या या धार्मिक साम्राज्याच्या रक्षणार्थ त्यांनी देशाच्या चार कोपऱ्यात चार मठ स्थापन केले. भारतात धार्मिक व सांस्कृतिक एकी निर्माण करण्याच्या कामी या मठांचा फार उपयोग झाला. बद्रीनाथ, द्वारका, शृंगेरी, आणि पुरी या ठिकाणीच ार मठ स्थापून आपला एकेक शिष्य शंकराचार्यांनी तेथे ठेवला.

शंकराचार्यांनी आणखीही बरेच कार्य केले. त्यांनी अनेक संस्कृत ग्रंथ लिहिले. या ग्रंथांमध्ये ब्रह्मसूत्रभाष्य, ईश, केन, कठ वगैरे १२ उपनिषदांवरील भाष्य, गीताभाष्य, सर्व वेदान्त-सिध्दान्त संग्रह, विवेक चूडामणि, प्रबोधसुधाकर इत्यादि ग्रंथ फार प्रसिध्द आहेत. हे सर्व कार्य त्यांनी अवघ्या ३२ वर्षांच्या अल्पायुष्यात केले.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 93684

# आंडाल

इसवी सनाच्या नवव्या शतकात दक्षिण भारतामध्ये एका सुप्रसिध्द संत-कवयित्रीचा जन्म झाला. तिचे नाव होते आंडाल. हिला दक्षिण भारताची मीराबाई असेही म्हणतात. मीराबाईप्रमाणेच ती देखील कृष्णाची भक्त होती. आंडाल ही भूदेवीचा अवतार होती, असेही म्हणतात. मीराबाईप्रमाणेच तिनेही कृष्णावर अनेक कविता रचल्या.

दक्षिण भारतात मदुरा नावाचे एक शहर आहे. त्यास दक्षिणेची मथुरा असेही म्हणतात. प्राचीन काली तेथे पांड्यांचे राज्य होते. या मदुरे जवळ श्रीविल्लिपुतर नावाचे गाव आहे. त्या ठिकाणी विष्णुचित्त नावाचा एक विष्णूचा भक्त राहात असे. तो ब्राह्मण होता आणि आपला बहुतेक वेळ तो कृष्णाच्या पूजेअर्चेतच घालवीत असे. विष्णुचित्ताने एक बाग लावली होती. त्या बागेतील फुलांनी तो देवाची पूजा करीत असे. त्याला मूलबाळ नव्हते. म्हणून विष्णुचित्त आणि त्याची पत्नी दोघेही मनातून कष्टी राहात. अपत्य-लाभ व्हावा म्हणून दोघेही देवाची मनोभावे प्रार्थना करीत असत.

अखेर देव प्रसन्न झाला. एके दिवशी नित्याप्रमाणे विष्णुचित्त आपल्या बागेत पाणी घालीत होता. त्याच वेळी त्याला तुळशीच्या रोपाखाली एक सुंदर मुलगी आढळली. मुलीला पाहून विष्णुचित्ताला अतिशय आनंद झाला. देवानेच तिला पाठविली असे समजून त्यांने त्या मुलीला उचलले आणि पत्नीजवळ नेऊन दिले. त्याच्या पत्नीलाही अतिशय आनंद झाला. दोघांनी त्या मुलीचे नाव कौदे असे ठेवले आणि प्रेमाने तिचे पालनपोषण करू लागले. हीच मुलगी पुढे आंडाल या नावाने प्रसिध्द झाली.

कौदेचीदेखील बालपणापासूनच कृष्णावर भक्ती होती. कृष्णाची पूजा केल्याखेरीज ती अन्न घेत नसे. रोज ती बागेत जाऊन कृष्णासाठी ताजी फुले तोडून आणीत असे आणि देवाच्या पूजेतच आपला बहुतेक वेळ घालवीत असे. अभ्यासात देखील ती हुशार होती. लहानपणीच श्रीकृष्णावर सुरेख गाणी रचून ती गाणी, ती गात असे. मुलीची कृष्णाच्या ठायी असलेली भक्ती पाहून आईवडिलांचा आनंद गगनात मावत नसे.

कौदे मोठी झाल्यावर ती तासनतास एकटी बसून कृष्णाचे ध्यान करीत असे. कधीकधी स्वतः रचलेली गीते गाऊन ती कृष्णाला आळवीत असे. भक्तिरसात ती इतकी मग्न होऊन जात असे की तिला खाण्यापिण्याची देखील शुध्द राहात नसे.

विष्णुचित्त कृष्णासाठी रोज चार-पाच हार तयार करीत असे. कौदे गुपचुप ते हार अगोदर स्वतःच्या गळ्यात घालून आरशात आपले रूप निरखीत असे. त्याने तिला खूप आनंद होत असे. मग ते हार गळ्यातून काढून ती ठेवून देत असे. कौदे रोज स्वतःच्या गळ्यात हार घालून ते हार उष्टावून ठेवते हे विष्णुदत्ताला माहीत नव्हते. एकदा रोजच्याप्रमाणे हार घेऊन विष्णुदत्त देवळात गेला. पुजाऱ्याने ते हार घेतले आणि देवाला घालू लागला, तेव्हा हार काहीसा कोमेजलेला दिसला. एका हारामध्ये तर एक लांब केस देखील निघाला.

हे पाहून विष्णुदत्ताला अतिशय वाईट वाटले. व त्याने देवाची क्षमा मागितली. तेव्हापासून रोज असे घडू लागले. हार कोमेजलेले दिसत असत. त्यामुळे विष्णुदत्ताला फार दुःख झाले.

एके दिवशी मात्र कौदेने देवाचे हार गळ्यात घातले असताना विष्णुचित्त अचानक तेथे आला. मुलीच्या गळ्यात हार बघून त्याने लगेच म्हटले—"बाळ, हे काय चालवल आहेस ? हा तर देवाचा हार आहे. आपण तो गळ्यात घालायचा नसतो. पुन्हा कधी असे करू नकोस बर !"

इतके बोलून विष्णूचित्ताने नवे हार तयार केले आणि ते हार घेऊन तो देवळात गेला. पण या नव्या माळा देवाला घालू लागताच त्यांचे तुकडे तुकडे होऊन पडू लागले. हे बघून विष्णुचित्त घाबरला. त्याला वाटले की, देव आपल्यावर रागावला.

इतक्यात विष्णुचित्ताच्या कानावर आवाज आला—"वत्सा, कौदेने गळ्यात घातलेले हारच मी आनंदाने घालीन."

हे ऐकून विष्णुचित्ताला काय करावे ते समजेना. घरी जाऊन ही सर्व हकीगत त्याने आपल्या पत्नीस सांगितली. तेव्हा पति-पत्नी दोघेही कौदेला देवीचा अवतार समजून तिचा मान ठेवू लागले.

इकडे कौदेची भक्ती दिवसेंदिवस वाढतच होती. रोज पहाटे उठून स्नान वगैरे आटोपून ती देवघरात जात असे आणि श्रीकृष्णावर स्वत: रचलेली भजने गात असे. अशा तऱ्हेने तिने असंख्य गीते रचली. या गीतांना तामिळ भाषेत 'आंडाल पासुरंगल' असे म्हणतात.

एके दिवशी श्रीकृष्णाने विष्णुचित्ताला स्वप्नात दर्शन देऊन म्हटले— "तुझ्या घरी जी देवी आहे ती माझी लक्ष्मी आहे. तुझ्या भक्तीमुळे प्रसन्न होऊन मी तिला तुझ्याकडे पाठविले होते. ती आता लवकरच माघारी येणार आहे. तू काळजी करू नकोस. आणखी काही वर्षे जगात राहून तू लोकांना खरा भक्तिमार्ग दाखव. अखेरीस तू देखील माझ्याकडे येशील."

जागे झाल्यावर स्वप्न आठवून विष्णुचित्ताचा थरकाप उडाला. तिकडे कौदेला देखील त्याच रात्री एक स्वप्न पडले होते की तिचा कृष्णाशी विवाह झालेला आहे. कौदेने जेव्हा आपल्या स्वप्नाची हकीकत आपल्या वडिलांना सांगितली, तेव्हा विष्णुचित्त आणखी अस्वस्थ झाला. कौदेला घेऊन तो वैष्णवांच्या तीर्थक्षेत्रांच्या यात्रेसाठी निघाला.

कौदे तर कृष्णाच्या प्रेमरसात न्हाऊन निघाली होती. तिला सारखी कृष्णाचीच आठवण येत असे. अखेरीस कौदेला बरोबर घेऊन विष्णुचित्त श्रीरंगम येथे पोहोचला. असे म्हणतात की भगवान रंगनाथाची मूर्ती बघताच कौदेला अपार आनंद झाला. ती सरळ मूर्तीजवळ गेली. त्याच वेळी मूर्तीमधून एक ज्योत निघालेली लोकांना दिसली. त्या ज्योतीच्या प्रकाशाने लोकांचे डोळे दिपून गेले व क्षणार्धातच कौदे अदृश्य झाली. ती त्या मूर्तीतच विलीन झाली. विष्णुचित्ताचे स्वप्न खरे झाले. मोठ्या प्रेमाने जिचे पालनपोषण केले ती कौदे अखेरीस आपल्या देवाकडे निघून गेली.

आंडाल याचा अर्थ आहे—जिचा उध्दार झालेला आहे, अशी व्यक्ती !

तामीळनाडमध्ये मार्गशीर्ष महिना अतिशय शुभ मानतात. या महिन्यात तेथील स्त्री-पुरुष रोज पहाटे उठून विष्णूचे भजन करतात. त्यात आंडालने

रचलेली भजनेही असतात. लोक मोठ्या आवडीने ती गातात. जे लोक विष्णूची पूजा करतात ते आपल्या मुलींना आंडाल सारखे कपडे नेसवून देवळात देवापुढे नृत्य करायला लावतात. आंडालच्या भजनांना 'तिरुप्पावै' असे म्हणतात. तामीळनाडच्या लोकांची अशी श्रध्दा आहे की तिरुप्पावै गायिल्याने ईश्वर प्रसन्न होतो. याच कारणामुळे तेथे घराघरांतून आंडालने रचलेली गीते गाईली जातात. उत्तर भारतात ज्याप्रमाणे सूरदास व मीराबाई यांची भजने लोकप्रिय आहेत, त्याचप्रमाणे दक्षिण भारतात आंडालची भजने लोकप्रिय आहेत.

# राजराज चोल

भारतात वेळोवेळी अनेक कर्तृत्वशाली राजे होऊन गेले. दक्षिण भारतातील राजराज चोल हा त्यांच्यापैकी एक राजा होता. इ० स० ९८५ ते १०१४ हा त्याच्या कारकीर्दीचा काल मानला जातो.

गादीवर बसण्यापूर्वी राजराज याने १६ वर्षे युवराजपद भूषविले. तो गादीवर आला त्या वेळी चोल राज्य अतिशय लहान होते. उत्तरेस वेलरू नदी आणि दक्षिणेस याच नावाची दुसरी नदी ह्या त्याच्या राज्याच्या सीमा होत्या. पूर्वेस समुद्र आणि पश्चिमेस कोट्टईकरई होते. आजचे तंजावर, तिरुचिरापल्ली आणि पूर्वीच्या पुडुक्कोटा संस्थानाचा काही भाग येथपर्यंतच राजराज चोल याचे राज्य होते. पण तो मरण पावला त्या वेळेपर्यंत त्याच्या राज्याचा खूप विस्तार झालेला होता. स्वतःच्या पराक्रमाने त्याने राज्याचा विस्तार करून लंकेचा उत्तर भाग, मदुरा, मलबार, मालद्वीप, म्हैसूर, बेल्लारी आणि गुंटूर आपल्या राज्यात समाविष्ट केले. केवळ या पराक्रमामुळे त्यास इतिहासात मानाचे स्थान मिळाले असते. पण-तो नुसता शूरवीर नव्हता तर कुशल शासनकर्तादेखील होता. चोख राज्य व्यवस्थेमुळे त्याची कीर्ती सर्वत्र पसरली.

राजराज चोल हा विजयालय वंशातील होता. या घराण्यातील आद्य पुरुष महाराज विजयालय यांनी इ० स० ८५० साली चोल राज्य स्थापन केले. त्यानंतर पहिला आदित्य, पहिला परान्तक, गंडारादित्य, अरिंजय, सुन्दर राज चोल आणि उत्तम चोल यांनी राज्य केले. पहिला राजराज हा या घराण्यातील आठवा राजा होता.

विजयालय वंशातील राजे क्षत्रिय होते. विजयालय वंशातील राजांच्या वेळचे जे शिलालेख आढळतात व जी ताम्रपत्रे मिळतात, त्यांत विजयालय वंशाचे राजे क्षत्रिय होते, याच गोष्टीवर भर दिलेला आढळतो.

गादीवर आल्यानंतरची चार वर्षे राजराज याने राज्याची घडी नीट बसविण्यात घालविली. त्यानंतर त्याने राज्याच्या विस्ताराकडे लक्ष दिले. त्याने दक्षिणेकडून दिग्विजयाला प्रारंभ केला आणि त्याची सांगता उत्तरेत

केली. दक्षिणेकडून दिग्विजयाला प्रारंभ करण्याचे मुख्य कारण म्हणजे दक्षिणेतील तीन राज्ये एकत्र जमून त्यास वारंवार त्रास देत असत. म्हणून या तीन राज्यांचा समाचार अगोदर घेणे अगत्याचे होते. याच हेतूने त्याने पांड्य राजा अमरभुजंग याचा पराभव करून त्यास कैद केले आणि त्याची राजधानी विलिन्द या शहरावर आपला कीर्तीध्वज चढविला. पांड्य राज्य त्याने आपल्या राज्यास जोडले.

पांड्य राजाचा समाचार घेतल्यावर राजराज चोल याने आपले आरमार घेऊन लंकेवर आक्रमण केले. आणि लंकेचा उत्तरेकडील भाग आपल्या साम्राज्याला जोडला. लंकेवरील त्याच्या या विजयाचे फार सुरेख वर्णन केलेले आहे —

"वानरांच्या साहाय्याने, लंकेला जाण्यासाठी रामचंद्राने एक सेतू बांधला आणि मग महत्प्रयासाने तीक्ष्ण बाणांनी लंकेच्या राजाचा विनाश केला. पण राजराज (पहिला )हा राजा रामचन्द्राहून सवाई निघाला. त्याच्या बलाढ्य सैन्याने जहाजातून समुद्र ओलांडून लंकेच्या राजाचा नि:पात केला."

राजराज चोल याच्या आक्रमणापूर्वी हजार वर्षांपासून अनुराधपूर ही लंकेची राजधानी होती. राजराज चोल याच्या सेनेने अनुराधपूर उध्वस्त केले. लंकेचा जो भाग राजराज चोल याने जिंकला तो चोल साम्राज्याचाच एक भाग बनला. या भागाची राजधानी पोलोन्नरुव येथे होती. राजराजाने लंकेचा फक्त उत्तर भाग जिंकलेला असला तरी त्याची इच्छा संपूर्ण द्वीपावर विजय मिळविण्याची होती. याच हेतूने त्याने आपली राजधानी अनुराधपुराहून हलवून पोलोन्नरुव येथे नेली होती. तिचे नाव बदलून त्याने जननाथमंगलम् असे ठेवले. या ठिकाणी राजराजाने शिवाचे एक मंदिर बांधले. ते आजही आहे. या मंदिराचे नाव शिवदेवालय असे आहे.

बऱ्याच वर्षांनंतर लंकेचा राजा विजयबाहु याने जेव्हा लंकेचा उत्तर भाग चोलांच्या ताब्यातून सोडविला, तेव्हा त्याने देखील आपली राजधानी पोलोन्नरुव येथेच ठेवली. पण त्याने पोलोन्नरुवचे नाव बदलून विजयराजपूर असे ठेवले. राजराज चोल याच्या लंकेवरील विजयाचा एक महत्त्वाचा

परिणाम म्हणजे लंकेची राजधानी अनुराधपुराहून कायमची दुसरीकडे गेली.

अशा तऱ्हेने आपले दोन बलाढ्य शत्रू—पांड्य आणि लंका—यांचा राजराज चोल याने पाडाव केला. नंतर फक्त केरळ राज्य राहिले होते. राजराजाने कांतळूर येथे अगोदर समुद्रावरील लढाईत केरळच्या आरमाराचा विध्वंस केला. नंतर विलिनाम जवळील एका युध्दात केरळच्या सेनेचा साफ पराभव केला व केरळचा देखील आपल्या राज्यात समावेश केला.

या विजयामुळे लंका, केरळ आणि पांड्य राज्ये यांच्याकडून राजराज चोल याच्या राज्याला कोणत्याही प्रकारचा धोका राहिला नाही.

नंतर पश्चिम किनाऱ्यावरील दोन राज्यांकडे राजराजाने आपली दृष्टी वळविली. यांच्यापैकी एकावर पश्चिमेकडील चालुक्यांचा अंमल होता आणि दुसरे राज्य गंग राजाच्या ताब्यात होते. राजराजाने या दोन्ही राज्यांवर स्वारी केली आणि त्यांच्यावर विजय मिळवून ती आपल्या राज्यास जोडून टाकली. अशा तऱ्हेने म्हैसूर व बल्लारीचा प्रदेश चोल राज्याला जोडला. गेला.

नंतर त्याने पूर्वेकडील चालुक्यांचा समाचार घेतला. वेंगी राज्यावर त्यांचा अंमल होता. वेंगी राज्यात आपापसातील वैमनस्य व भांडणे विकोपास गेलेली होती. राजराजाने मोठ्या चातुर्याने जाळे टाकले व वेंगी राज्यातील भांडणे मिटविण्याच्या निमित्ताने त्याने तेथील राज्यकारभारात लक्ष घालायला सुरवात केली आणि शक्तिवर्मा नावाच्या व्यक्तीला तेथील गादीवर बसविले. याच शक्तिवर्माच्या धाकट्या भावाशी राजराजाने आपल्या मुलीचा विवाह लावून दिला. वेंगीचे चालुक्य हे चोलराजाचे मित्र झाले. नंतर वेंगी राज्याचा शत्रू कलिंग, या राज्यावर स्वारी करून राजराजाने ते राज्यही जिंकले.

अशा तऱ्हेने राजराज चोल याचे साम्राज्य खूप दूरवर पसरले. तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील संपूर्ण प्रदेशावर त्याचे एकछत्री राज्य प्रस्थापित झाले.

राजराजाने विशाल सेना उभारली होती. समुद्रावरील सत्ता सुरक्षित राहावी म्हणन त्याने एक जंगी आरमार तयार केले होते. याच आरमाराच्या मदतीने त्याने लंकेवर विजय मिळविला होता. त्यानंतर या आरमाराने मालद्वीप देखील जिंकले.

मृत्यूपूर्वी दोन वर्षे राजराजाने आपला मुलगा राजेन्द्र यास युवराजपद दिले. वडिलांच्या मृत्यूनंतर तो पहिला राजेन्द्र या नावाने १०१४ साली गादीवर आला आणि त्याने ३० वर्षे राज्य केले.

राजराज चोल हा केवळ उत्तम शासक आणि पराक्रमी योध्दा नव्हता तर तो अतिशय धार्मिक आणि कलाप्रिय होता. तो मोठा शिव-भक्त होता. त्याच्याच आज्ञेने तंजावर येथील 'राजराजेश्वर' हे भव्य शिवमंदिर बांधण्यात आले. या मंदिराच्या बांधकामात त्याने कसलीही उणीव राहू दिली नाही. राजराजेश्वराचे हे देवालय खरोखरच अप्रतिम आहे. तामीळ वास्तुकलेचा तो एक सुरेख नमुना आहे.

युध्दात विजय मिळविणे कठिण आहेच. परंतु जिकलेल्या राज्याची व्यवस्था लावण्याचे काम तर त्याहून कठीण आहे. या दृष्टीने भारतीय इतिहासात राजराजाचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. सैन्याची उभारणी आणि राज्याची व्यवस्था ही कामे राजराजाने जशी केली तशी ती फारच थोड्या राजांनी केली असतील. विजयालय वंशात जितके राजे होऊन गेले त्या सर्वांमध्ये राजराजा चोल हा अतिशय थोर होता, यात काही संदेह नाही.

जमीन महसूल ठरवण्यासाठी शेतांचे बिनकचू क्षेत्रफळ आणि पिकांच्या उत्पन्नाचा खरा अंदाज यांची माहिती असणे आवश्यक आहे. या बाबतीत राजराज चोलची व्यवस्था आदर्श समजण्यात येते. शासनव्यवस्थेचे केंद्रीकरण करण्याकडे आणि ती दृढ करण्याकडे या कर्तृत्वशाली राजाचे सदैव लक्ष असे. स्थानिक शासकांवर देखरेख ठेवण्यासाठी त्याने कुशल निरीक्षक नेमले होते. ग्रामपंचायती व निम सरकारी संस्थांना आपापली कामे करण्यास पूर्ण मुभा होती. मात्र उत्पन्नाच्या व खर्चाच्या हिशोबाची नीट तपासणी करण्यासाठी वेगळे अधिकारी नेमलेले होते. या संस्थांनी पैशाचा अपव्यय केला असल्यास हे अधिकारी ही गोष्ट राजाच्या नजरेस आणून देत असत.

राजराज स्वत: शैव असला तरी सर्व धर्मांविषयी त्याने सहिष्णुतेचे धोरण ठेवलेले होते. सर्व धर्मांना तो मदत करीत असे. तंजावरमध्ये त्याने शिवमंदिर बांधलेले असले तरी कित्येक ठिकाणी विष्णूची देवालयेही बांधलेली आहेत. अशाच रीतीने बौध्द विहारांना देखील त्याने मदत केली.

कुटुंबातील व्यक्तींशी तो प्रेमळपणाने वागत असे. आपली बहीण कुंदबाई हिच्यावर त्याची खूप माया होती. आपल्या चुलत आजीवर त्याची अतिशय श्रध्दा होती.

राजराजाला लोक विष्णूचा अवतार समजत असत आणि त्याचा मंत्री जयंत यास बृहस्पतीची उपमा देण्यात येत असे. राजराज चोल किती लोकप्रिय होता, हे यावरून दिसून येते. भारताच्या थोर शासकांमध्ये राजराज चोल याचे स्थान अतिशय मानाचे आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

REFBK-0013845